
अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन २०२५, सिडनी
कथाविशेषांक

# शब्द रुची

४९

एप्रिल २०२५ | मूल्य १० रु. | पृष्ठे ६८


## कथासंगम



## ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सव सांगतासमारंभाची क्षणचित्रे...


















ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

एप्रिल २०२५, वर्ष बारावे
अंक बारावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ व आतील चित्रे : **प्रदीप म्हापसेकर**

**कार्यालयीन संपर्क**

**ग्रंथाली संगणक विभाग**
**shabdruchee24@gmail.com**

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग – समीर कदम**

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**गंगाधर गाडगीळ / ५**
खाली उतरलेलं आकाश

**विद्याधर पुंडलीक / १३**
मोठी आई

**जयवंत दळवी / २०**
रुक्मिणी

**वैशाली पंडित / २८**
तू तू मी मी

**भाग्यश्री परांजपे / ३१**
बर्फातल्या बॅलेरिना

**डॉ. सचिन जम्मा / ३८**
गेट-टुगेदर

**डॉ. स्मिता दातार / ४२**
राधेचं भ्रमरगीत

**विजय खाडिलकर / ४६**
आहुती

**शिल्पा गडमडे-मुळे / ५१**
अर्धविराम

**संजीवनी खेर / ५५**
चिमामांदा गोन्झी
लोकप्रिय (नायजेरियन) लेखिका

**वृत्तांत / ५९ ते ६२**

**चांगदेव काळे / ६३ ते ६६**
ग्रंथपाने

**अखिल** ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन सिडनी येथे २५ ते २७ एप्रिल २०२५ या कालावधीत होणार आहे. त्यानिमित्त 'शब्द रुची' मासिकाचा एप्रिल महिन्याचा अंक कथा-विशेषांक करत आहोत. नुकतेच ग्रंथालीने कथाकार, कादंबरीकार, नाटककार आणि 'ठणठणपाळ'कार जयवंत दळवी; नवकथेचे उद्गाते, अर्थतज्ज्ञ गंगाधर गाडगीळ आणि कथाकार, नाटककार, समीक्षक विद्याधर पुंडलीक या तीन नामवंत साहित्यिकांच्या जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले. त्याला अनुसरून, या अभिजात मराठी सारस्वतांच्या एकेक लघुकथा आणि त्यांच्यासह नव्याजुन्या लेखकांच्या कथा घेऊन 'कथासंगम' या शीर्षकाने हा अंक योजला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील लेखक आहेत तसे जर्मनी, ऑस्ट्रेलिया येथीलही लेखकांच्या कथा आहेत. या कथांमधून बदलत्या काळाचे संदर्भ, बदलती विचारधारा, मांडणी, बदलता बाज यांचे प्रतिबिंब दिसेल.


मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला तेव्हापासून मराठी साहित्यविषयक कार्यक्रमांची रेलचेल सुरू असलेली दिसते. त्याचे स्वरूप उत्सवी न राहता, खऱ्या अर्थाने मराठीला नव्या काळाच्या कसोटीवर सिद्ध करण्यासाठी नव्या विचारांनी वाटचाल केली पाहिजे, हे खरे असले, तरी आणि इतिहासात रमून तोच कुरवाळत राहणे इष्ट नसले, तरी अभिजात साहित्याची महती सांगत त्यातले उत्तम ते जाणून घेण्याची, त्यातून उलगडणाऱ्या जीवनधारणांची संगती लावण्याची मानसिकता ठेवायला हवी. तीस-तीस, चाळीस-चाळीस वर्षे समाजावर छाप पडणाऱ्या साहित्यिकांची, त्यांच्या साहित्याची ओळख करून घेताना, आता तसे कसदार लेखनसातत्य, लेखन विपुलता, वैविध्य, कमी दिसते का, याचाही विचार व्हायला हवा. आजची जीवनशैली गतिमान झाली आहे, स्पर्धात्मक झाली आहे, तीत होणारे सर्वांगीण बदलही आधीचे रुजण्याच्या आधी नवे काही धडकते असे आहेत, त्यामुळे स्थैर्य, निरीक्षण, विचारप्रक्रिया, मंथन याला लागणारे अनुभवविश्व तोकडे होत आहे का, हेही समजून घ्यायला हवे. इन्स्टंटच्या जमान्यात आजचे अधिकतर लेखन तात्कालिक संदर्भ घेऊन आलेले होत आहे का, सर्वच व्यंगचित्रे कालातीत होत नाहीत तसे लेखन प्रभावी असले तरी त्या काळापुरते मर्यादित होत आहे का, दर्जेदार लिहिणारे ठिकठिकाणी आहेत, ते विखुरलेले आहेत, वाचकांची ओढ कमी झाली आहे, साहित्यसंमेलनेही त्याला काही व्यासपीठ होताना दिसत नाहीत, असे प्रश्न असताना हा 'कथासंगम' म्हणजे मागचे एकदम तोडून न जाता, ती कडी धरून जावे, असा प्रयत्न आहे.

ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सांगता ४ एप्रिल २०२५ रोजी पद्मश्री अश्विनी भिडे-देशपांडे आणि भुवनेश कोमकली यांच्या मैफलीने पुण्यात झाली. त्याला जोडून जयवंत दळवी, गंगाधर गाडगीळ आणि विद्याधर पुंडलीक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या व्यक्तित्व आणि साहित्य याचा स्मृतिजागर साजरा झाला. त्याचा वृत्तांत अंकात आहे. सुनील महाजन (संवाद, पुणे), राजेश देशमुख, शुभांगी दामले (महाराष्ट्र कल्चरल सेंटर), पुणे महानगरपालिका, यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सारस्वत बँक, शाश्वत रिॲल्टी, बँक ऑफ महाराष्ट्र, वसंत विहार रिॲल्टी प्रा. लि., प्रशांत कॉर्नर, श्री बृहद् भारतीय समाज यांच्या सहयोगाने हे कार्यक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. याला पाठबळ दिले अभिजित गाडगीळ, कल्पना गुटमन आणि चित्रा गाडगीळ, गिरीश दळवी, मोनिका व अभिजित गजेंद्रगडकर यांच्या बहुमोल सहकार्याने. पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त राजीव नंदकर, मोहन काळे, एनसीआरएचे प्रशासन आणि लेखाप्रमुख डॉ. जे. के. सोळंकी, अजित कवडे, शाश्वत रिॲल्टीचे श्रीकांत सूर्यवंशी, वसंत विहार रिॲल्टी प्रा. लि.चे अंकुर पंधे, प्रशांत कॉर्नरचे सकपाळ यांच्या व्यक्तिगत आस्थेने कार्यक्रमांचे आयोजन करणे सोपे झाले.

या कार्यक्रमांनी अभिजात साहित्याचा पुनःप्रत्यय दिला तो सर्वच कलावंतांनी सादर केलेल्या तितक्याच अभिजात अभिवाचनामुळे, वाचिक अभिनयामुळे आणि नाट्यप्रवेशामुळे नव्या पिढीपुढे जुने साहित्य असे नव्याने प्रकट झाले, तर ही पिढी त्याकडे वळेल, अशी आशा करता येते. हाच तो साहित्यसंगम, ज्याचा प्रयत्न या अंकात केला आहे.

यापुढील अंक तीन महिन्यांनी डिजिटल स्वरूपात प्रसिद्ध होतील. दिवाळी विशेषांक छापील असेल.

**– अरुण जोशी**



# खाली उतरलेलं आकाश

गंगाधर गाडगीळ

नित्य घडणारा हा एक प्रसंग. अशा नित्य घडणाऱ्या छोट्या छोट्या प्रसंगांनी आमच्या जीवनाचा पट विणला गेला आहे. विणकाम तिचं, रेशमी धागा तिचा, रचना, कलाकुसर... सगळं तिचंच. माझा धागा जाडाभरडा–फटकन आपल्याच मर्जीनुसार वळणारा. हा परका धागा तिनं आपल्या विणकामात सामावून घेतला आहे.

**सकाळी** जाग आली, तेव्हा चांगलं टकटकीत उजाडलं होतं. तांबूस सोनेरी उन्हाचा पहिलावहिला फवारा खिडकीतून खोलीत आला होता आणि भिंतीवर ऐसपैस पसरला होता. त्यात बाहेरच्या झाडाची सावली अस्फुटशी उमटली होती.. लहान मुलानं काढलेल्या ढोबळ चित्रासारखी. मी बिछान्याशेजारच्या टीपॉयवरचं घड्याळ उचलून त्यात पाहिलं, तर चांगले सव्वासात वाजले होते.

म्हणजे पहाटेच उठून कुडकुडायला लावणाऱ्या गारठ्यात एकट्यानंच चांगला ब्रिस्क वॉक घ्यायचा आमचा बेत बोंबलला होता. इतका उशीर झाला तरी उठून जावं असं एकदा मनात आलं. उठण्यासाठी नेट लावून सरसावलोदेखील. पण मग पुन्हा अंग सैल सोडलं. मनाशी म्हटलं, जाऊ द्या झालं. सुट्टी घेऊन बाहेरगावी आल्यावर हे असं व्हायचंच. नाहीतर ती सुट्टी कसली?

मान वळवून शेजारी झोपलेल्या ऊर्मिलाकडे पाहिलं, तर अंगाचं मुटकुळं करून आणि पांघरुणात गुरगुटून ती कशी अगदी गाढ झोपली होती. आता हिनं पन्नाशी गाठली तरी अजून लहान मुलीसारखं अंगाचं मुटकुळं करून झोपते आणि तिची सकाळची साखरझोप काही केल्या तिला आवरत नाही. घरी सकाळी लवकर उठावं लागतं म्हणून रोज चिडत असते आणि इथे महाबळेश्वरला येताना तर तिनं मला ताकीद दिली होती की, ''सकाळी मला उठवायचं नाही. हे कबूल करत असाल तरच मी येते, नाहीतर येतच नाही मी महाबळेश्वरला.''

म्हणजे आता चहाची हुक्की आली, तरी हिला उठवायची सोय नव्हती. मलाही उठावंसं वाटत नव्हतंच म्हणा. गारठा असा शानदार पडला होता! मी पांघरूण वर ओढलं तेव्हा माझ्या ध्यानात आलं, की तिनं माझ्या पातळ पांघरुणावर एक ब्लँकेट घातलं आहे. तिच्या झोपेची ही गंमत आहे. रात्री गारठा पडायला लागला म्हणजे ती आपोआप जागी होते, मुलांच्या आणि माझ्या अंगावर पांघरूण घालते आणि ताबडतोब झोपी जाते.

मी तिचे गालावर आलेले केस मागे सारले आणि तिच्याकडे टक लावून पाहत राहिलो. आता केस कडेकडेनं पांढुरके होऊ लागले होते; पण रात्रीच्या विश्रांतीनंतर चेहरा कसा टवटवीत दिसत होता – आमचं लग्न झालं तेव्हा दिसत होता तसा. आणि केसांचं ते लाडिक वळण आता तितकंसं रेशमी आणि मुलायम दिसत नसलं, तरी आपला मूळचा डौल विसरलं नव्हतं.

वाटलं, की आता थोडंसं भांडण करायचं. म्हणून तिचा खांदा हलवत मी तिला म्हटलं, ''अहो बाईसाहेब! अहो, उठा म्हटलं!''

तिनं प्रयत्नपूर्वक डोळे ताणून उघडले. एकवार माझ्याकडे पाहिलं आणि मग माझा हात झिडकारून टाकून ती अंगाचं अधिकच मुटकुळं करून झोपली.

मी हसलो आणि थोडा वेळ तसाच पडून राहिलो. आता खरंच चहाची हुक्की यायला लागली होती, पण ती तशीच दाबून मी पडून राहिलो. तिची झोप मोडायचं जिवावर येत होतं.

तेवढ्यात मिटल्या डोळ्यांनीच ती म्हणाली, ''चहाची अगदी हुक्की आली असेल, होय ना?''

''छे बुवा! मी आपला शांतपणे पडलो आहे.'' मी निरिच्छपणाचा आव आणला.

''उगीच नाटक करू नका. मला सगळं माहीत आहे तुमचं.'' आता तिचे डोळे उघडले होते.

''म्हणजे काय? मला काय चहाशिवाय राहता येत नाही असं तू समजतेस? तुझाच तेवढा आपल्या मनावर ताबा, आमचा नाही, अं?''

''हु हु हु हु हु!'' ती छद्मीपणानं खांदे घुसळून खोटं खोटं हसली.

''ठीक आहे. आज मी चहाच पिणार नाही!'' मी निर्धारानं छातीवर हात बांधले. मला खरंच थोडासा राग येऊ लागला होता.

''अहो, पुरे आता. मागवा चहा.'' माझ्या कानाची पाळी कुस्करत ती माझ्याजवळ सरकत म्हणाली.

इथे खरं म्हणजे मी लुटुपुटीचं भांडण संपवायचं – पण माझा हटवादीपणा तसाच अंग ताठ करून राहिला. मी तिचा हात बाजूला सारला आणि राठ आवाजात म्हटलं, ''मला चहा नको आहे.''

''तुम्हाला नको असेल हो – पण मला हवा आहे. माझ्यासाठी मागवा ना.'' ती आणखी लाडीगोडी करत म्हणाली.

''तुला हवा तर तू मागव.'' अजून माझा हटवादीपणा अंग सैल सोडत नव्हता.

''असं काय? मागवा ना माझ्यासाठी. प्लीज!''

मी काहीच बोललो नाही.

ती खट्टू होऊन सुस्कारा सोडत म्हणाली, ''बरं बाई, मी मागवते.''

ती उठायला लागली. तेव्हा मी तिला थांबवलं आणि आवाजाची पट्टी खाली आणत म्हटलं, ''तू नको उठू. मी मागवतो चहा. पण तू अशी माझ्याविषयी चुकीची कल्पना का करून घेतली आहेस? इतकी वर्षं झाली...''

ती थिजलेल्या स्वरात म्हणाली, ''चुकलं माझं. सांगितलं ना एकदा?''

मी तिच्याकडे बघितलं आणि ओठावरचं बोलणं मागे घेतलं. कारण तिनं आपलं मन घट्ट करून घेतलं होतं आणि तिचा चेहरा उतरला होता.

मी उठलो आणि हॉटेलच्या पोऱ्याला आमच्या कॉटेजमध्ये चहा घेऊन यायला सांगितलं. मी खट्टू झालो होतो. अंगावर बॅगेच्या कोपऱ्याचा ओरखडा उठावा तसं झालं होतं. खरं म्हणजे ह्या लहानशा गोष्टीनं मला राग यायला नको होता, पण तो आला होता खरा. नेहमीच येत असे. आणि तो का येतो हे समजून घेण्याचा प्रयत्न तिनं कधीच केला नव्हता. आताही ती तसा प्रयत्न करत नव्हती. कधीच करणार नव्हती. ह्या बाबतीत दोन मनं एकमेकांकडे पाठ फिरवून कानांत बोटं घालून उभी होती.

तोंडात किंचित कडवट चव होती. मी तिच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि ती गिळून टाकली. पूर्वी भांडत, वाद घालत बसलो असतो. आता मी तसं करत नाही. का? आता शहाणपण आलं म्हणून! की तारुण्याची मस्ती उतरली म्हणून?

मी माझ्या ब्रशवर टूथपेस्ट घेतली. मग तिच्या ब्रशवर पसरली आणि ब्रश तिच्या हातात देत म्हटलं, ''चला, उठा आता.''

ती मुकाट्यानं उठली आणि दात घासू लागली.

आता सारवासारव मलाच करावी लागणार होती. तिला ते कधीच जमत नसे. ती एकदा बिनसली की हटूनच बसायची. फार झालं तर रडायला लागायची. इतकी वर्षं हे असंच चाललं आहे आणि अखेरपर्यंत हे असंच चालणार आहे.

मन नेहमीप्रमाणे दुखावलं; पण तिकडे दुर्लक्ष करत मी तिचा हात दाबला आणि म्हटलं, ''रागावू नको ग. मी इतकं ताणून धरायला नको होतं. पण असं होतं खरं.''

थोड्याशा विलंबानं तिनं माझ्या हाताच्या दाबाला प्रतिसाद दिला आणि हे छोटंसं वादळ संपलं असं मला आश्वासन दिलं.

आता माझी वृत्ती स्निग्ध झाली होती. तिच्याकडे बघत असताना मला आमची अनेक वादळी भांडणं आठवली. लाटा अशा उसळायच्या आणि धडका मारायच्या, वारे असे उलटसुलट घोंगावायचे, सुसाट कुठेतरी घेऊन जायचे, हिंस्र पशू जसे नखं काढून एकमेकांना ओरबाडायचे, लोळवायचे, लचके तोडायचे, विजांचे लोळ असे कोसळायचे आणि सारं काही पेटवून द्यायचे! सगळं पराकोटीला जायचं!

आणि मग दिलजमाई व्हायची तीदेखील अशीच वादळी, गुदमरून टाकणारी आलिंगनं, धगधगती न संपणारी चुंबनं, शरीराची उन्मत्त मीलनं, मिसळून दिलेली प्रीतीची आश्वासनं!

एकदा वाटलं, की ते तसलं वादळ पुन्हा एकदा अनुभवावं. अजून शरीरात मस्ती होती – मनात रग होती.

मी मान हलवली आणि स्वतःशीच हसलो.

खिडकीत उभी राहून ती दात घासत होती. मी एकदम तिच्याजवळ गेलो. तिचं तोंड माझ्याकडे वळवलं आणि टूथपेस्ट फासटलेल्या ओठांचं तसंच चुंबन घेतलं.

''शी! काय हा फाजीलपणा!'' तिनं मला ढकलून दिलं. पण तिचा चेहरा पुन्हा फुलला, मोकळा झाला. हालचालीत पुन्हा नेहमीचीच तरतरी आणि गडबडघाई आली. तिचं नेहमीच असं असतं. चटकन खट्टू होते, रागावते... आणि तितक्याच चटकन सगळं विसरून जाते... एखाद्या लहान मुलासारखं. आता इतकं वय झालं तरी वृत्तीचा हा निर्मळपणा, ताजेपणा तिच्यात टिकून राहिला आहे.

पण आता तिचा उत्साह तिलाच झेपत नाही. मनावरचा ताण पूर्वीसारखा सहन करता येत नाही. पूर्वीसारखी रागानं बेभान होत नाही. राग आवरते. आता ही काहीशी हळवी झाली आहे आणि मीदेखील थोडासा शहाणा झालो आहे. शहाणा म्हणजे म्हातारा!

गंमत असते नाही? आपण म्हातारे होऊ हे एके काळी मनाला पटतच नसतं आणि आपण पटकन म्हातारेच होतो की!

चहा आला. नेहमीसारखा तिनंच तो बनवला. साखर किती ते मला विचारलं. एक चमचा घातल्यावर मी पुरे म्हटलं, पण तिनं आणखी थोडी घातली. तिचंच बरोबर होतं. मला आणखी थोडी साखर हवीच होती. मला काय हवंय-नकोय ते तिला असं आपोआप समजतं; मी काय, कोणत्या स्वरात म्हटलं त्यावरून, चेहऱ्यावरच्या आविर्भावातून, नाहीतर नुसत्या एखाद्या अस्वस्थ हालचालीवरून.

चहाचा पहिला कप बशीत ओतून तिनं भराभरा पिऊन टाकला. मी सावकाश घुटके घेत चहा पीत होतो. तिला पुन्हा चहा घ्यायचा होता; पण नेहमीप्रमाणे ती थांबली. माझा चहा पिऊन झाल्यावर तिनं माझ्या कपात मला हवा तेवढा चहा ओतला आणि मग उरलेला आपण घेतला.

मी म्हटलं, ''अग, तुला फारच थोडा चहा उरला आहे. थांब, मी माझ्या कपातला तुला घालतो.''

''नको, नको.'' घाईनं समोरचा कप उचलून तिनं तोंडाला लावला.

नित्य घडणारा हा एक प्रसंग. अशा नित्य घडणाऱ्या छोट्या छोट्या प्रसंगांनी आमच्या जीवनाचा पट विणला गेला आहे. विणकाम तिचं, रेशमी धागा तिचा, रचना, कलाकुसर... सगळं तिचंच. माझा धागा जाडाभरडा-फटकन आपल्याच मर्जीनुसार वळणारा. हा परका धागा तिनं आपल्या विणकामात सामावून घेतला आहे.

कधी कधी अडकल्यासारखं वाटतं, आपल्याला नको असलेल्या दिशेनं मला ती कुठेतरी नेते आहे असं बोचकपणे जाणवतं. मग हेही ध्यानात येतं की असा अडकलो नसतो, आपल्या पटात तिनं मला सामावून घेतलं नसतं, तर एक भकास रितेपण वाट्याला आलं असतं. आयुष्यात जो एक झरा सतत झुळझुळु वाहत राहिला आहे – हिरवळ फुलवतो आहे, तो लुप्त झाला असता. सगळंच कसं उजाड झालं असतं.

आणि तिनं स्वत:ला कमी का अडकवून, बांधून घेतलं होतं? मूळची ही उच्छृंखल, बंडखोर, बेदरकार मुलगी. माणसांत रमणारी, समाजजीवनात रस घेणारी, मनस्वी, तिनं आपलं व्यक्तिमत्त्व आमूलाग्र बदलून टाकलं होतं. मला काय आवडतं ते करण्यात आपला सगळा जन्म वेचला होता. हे सगळं करताना तिला थोडे का कष्ट पडले असतील? स्वत:चं मन किती मारावं लागलं असेल! किती नकारांच्या बेड्यांनी स्वतःला जखडून घ्यावं लागलं असेल! कशासाठी केलं हे तिनं सगळं?

स्वत:साठी? मला आपल्या जीवनाचा केंद्रबिंदू केलं ते स्वतःसाठी? आपल्या आवडीनिवडी सोडल्या त्या स्वतःच्या सुखासाठी?

की माझ्यासाठी? मी तर हा असा कोरडा, स्वत:तच गुंतलेला – संतापाच्या वावटळींनी पुन्हा पुन्हा झपाटला जाणारा. असं काय गूढ काहीतरी घडलं होतं, की त्यामुळे या फुलपाखरी वृत्तीच्या मुलीनं माझं जीवन दोन्ही हातांनी हृदयाशी कवटाळलं?

चहा पिऊन झाल्यावर आम्ही दोघं बाहेर व्हरांड्यात आलो. ऊर्मिला अंगाभोवती शाल गुरफटून वेताच्या खुर्चीत बसली. मी व्हरांड्याच्या कठड्याला रेलून सिगारेट शिलगावली आणि बाहेरच्या दृश्याकडे पाहू लागलो.

सोनेरी ऊन वृक्षांच्या पर्णसंभारावर चकाकत होतं. खिडक्यांच्या काचांवर झळाळत होतं, दूरवर डोंगराच्या उतरणीवर लोळत होतं, सारा आसमंत उजळत होतं. त्या उन्हात धुकं तरंगत होतं, वितळत होतं. पर्वतशिखरं गूढ निळेपणात निमग्न होती. पाणी कुठेतरी झुळझुळ वाहत होतं, आपल्या गाण्याची नागमोडी लय शोधत होतं. ती लय पक्ष्यांच्या तारस्वरातल्या किलबिलाटात हरवत होती. मग पुन्हा उमटत होती. सोनेरी नाण्यांच्या वृष्टीत न्हाऊन निघत होती.

तेवढ्यात दोन पक्षी पानांच्या गर्दीतून तीरासारखे बाहेर पडले आणि पंखाला पंख लावून भरारत आकाशाच्या निळेपणात नेमके कुठेतरी निघून गेले.

मग एका झाडाच्या उंच शेंड्यातून एक घार उंच अवजडपणे झेपावत आकाशात चढली आणि त्या निळेपणाच्या आरपार जाऊन अदृश्य झाली.

मी ऊर्मिलाकडे पाहिलं. तिचा चेहरा प्रसन्न, उत्साही दिसत होता. नाचऱ्या कुतूहलानं, उत्सुकतेनं ती बाहेर बघत होती. ती माझ्याकडे चकाकत्या नजरेनं पाहत म्हणाली, ''फुलं किती छान फुलली आहेत नाही?''

आमच्या कॉटेजच्या आवाराच्या कडेला फुलझाडं लावलेली होती. खूप बहरणारी बोगनवेल, अनेक रंगांचे डेलिया, एक–दोन गुलाब, एक कॅक्टस, नाना प्रकारांची फुलझाडं लाल, पिवळ्या, पांढऱ्या, जांभळ्या फुलांनी बहरली होती. त्यांच्या कडेकडेनं दोन फुलपाखरं उडत, कोलमडत पुढे सरकत होती.

त्या फुलांत उठून दिसत होता गर्द लाल रंगाचा एक गुलाब. इतका लाल, इतका लाल, की त्याच्यावर एक काळी मखमली छटा चढली होती. आपल्या सुगंधाच्या मस्तीनं तो नुसता टचटचला होता आणि त्याच्या पाकळ्या उमलत होत्या अशा डौलानं, की जणू एखादी मानिनी आपल्या सौंदर्याचा नजराणा घेऊन सामोरी आली होती.

ती म्हणाली, ''किती मस्त फूल आहे नाही? जा ना. ते काढून आणा माझ्यासाठी.''

मी तिच्याकडे पाहिलं. लग्न झालं, तेव्हा ती अशी या गुलाबासारखी होती.

माझ्या नजरेतला अभिप्राय तिला समजला आणि पूर्वी लाजत असे तशी ती लाजली. आपली शाल तिनं घट्ट अंगाभोवती गुरफटून घेतली.

ती हसून म्हणाली, ''आता बायको म्हातारी व्हायला लागली तुमची!''

''छे! कोण लेकाचा म्हणतो असं?''

''पुरे, पुरे! खरंच वाटेल कोणाला! जा, फूल घेऊन या ते.''

''अग, पण असू दे की ते झाडावर.''

ती फणकारली. ''हे बघा, तुम्ही अगदी मोठे कायदेशीर वागणारे आहात ते माहीत आहे मला. पण इथल्या सगळ्या बायका फुलं तोडताहेत आणि मी ते पाहते आहे. तेव्हा तुम्ही तोडलंत तर तुम्हाला कोणी काही म्हणायचं नाही आणि पाप लागलं ना, तर लागू दे थोडं बायकोसाठी!''

मी हसलो आणि ते फूल तोडायला गेलो.

''नीट तोडा हं. लांब देठ ठेवा. ती वरची पानं आहेत ना, ती हवी आहेत मला.'' मला फूल नीट तोडता येणार नाही याची तिला खातरीच वाटत होती.

मी फूल घेऊन आलो आणि विचारलं, काय बुवा, तोडलंय का मी व्यवस्थित? तुझ्या मनासारखं?''

''कसं ते देठ पिळवटून टाकलंय! तुम्हाला काही म्हणता काही येत नाही.'' फुलाकडे बघत मानेला हेलकावा देत ती म्हणाली.

मी हसून म्हटलं, ''अग, इतकं होतं तर तू काढून

आणायचं होतंस.''

तिरप्या नजरेनं माझ्याकडे पाहत तिनं फूल केसांत खोवलं, ''अहो, किती वर्षांची माझी इच्छा, की माझ्या नवऱ्यानं माझ्यासाठी छान छान फुलं आणावी आणि मी ती केसात घालावी. पण तुम्ही काही कधी फुलं आणली नाहीत. म्हणून म्हटलं की आपली हौस पुरवून घ्यावी.''

''अग, इतकं होतं तर मला सांगायचं होतंस. मी रोज एवढी फुलं घेऊन आलो असतो.'' मी दुखावलेल्या स्वरात म्हटलं, का कोण जाणे, एकदम विषण्णतेचं पटल माझ्या मनावर पसरलं.

''सांगून आणली तर त्यात काय मजा राहिली?'' ती थट्टेखोरपणे हसली.

मीदेखील हसलो, पण माझ्या मनात विषण्णता अधिकच दाटली. अशा किती हौसा-मौजा करायच्या राहून गेल्या होत्या कोण जाणे! बरंचसं आयुष्य आता जगून झालं होतं. जे केलं नव्हतं, ते आता कधीच करता येणार नव्हतं. अशा कितीतरी वाटा होत्या की, ज्यांनी आता फेरफटका करता येणार नव्हता.

ती माझ्याकडे शोधकपणे पाहत होती.

मी हसून विचारलं, ''पण मी म्हणतो, तू असा अडाणी नवरा निवडलासच का?''

''कारण मला अडाणीच नवरा आवडतो म्हणून! चला, उठा आता. तुमची दाढी होऊ दे. मग आपण फिरायला जाऊ.''

''कशाला? इथेच करू या आराम.''

''खरंच वाटेल कोणाला! तुम्हाला आतून अगदी असं असं होतं असेल, की आता चला बुवा. फिरू या, थोडा व्यायाम करू या. होय की नाही?'' तिनं मान तुकवली.

मला हसू आलं. माझ्या मनातलं तिनं अगदी बरोबर ओळखलं होतं. मग मी एकदम निर्धारानं म्हटलं, ''हे पाहा, तू काही माझ्याबरोबर येऊ नको. तुला चालणं आवडत नाही हे मला माहीत आहे. उगीच माझ्यासाठी...''

''पुरे, पुरे! दाढी करा आता. अर्धा तास घासून-पुसून करू नका हं. लवकर उरका.''

''अग, पण का तू अशी उगीचच मनाविरुद्ध वागतेस माझ्यासाठी?''

''कारण आपल्या अडाणी नवऱ्यासाठी मनाविरुद्ध वागणं मला आवडतं म्हणून!'' ती मोठमोठ्यानं हसत सुटली. अशी ती मला नेहमी लहान मुलासारखी वागवते.

रमतगमत आम्ही फेरफटका करायला बाहेर पडलो होतो. तिला भराभरा चाललेलं आवडत नाही म्हणून मी सावकाश चालायचा प्रयत्न करत होतो. तरी मधूनमधून पावलं वेग वाढवत होतीच. मग ती मागे पडली, तिची धांदल उडायला लागली, म्हणजे मी थांबत होतो.

नेहमीसारखे आमचे लहान लहान गोष्टींवरून वितंडवाद चालले होते. पूर्वी हे वितंडवाद खूप लांबायचे. आम्ही अगदी हमरीतुमरीवर येत असू. कशी खमंग, झणझणीत चव असायची त्यांची! आता आम्ही दोघंही फार ताणून धरत नाही. जरा जास्त ताणलं म्हणजे आपलं म्हणणं सोडून देतो. तरीपण भांडायची हौस अजून संपलेली नाही. आता कालांतरानं तीदेखील संपेल का? मग आम्ही कशावर बोलू बरं? की नुसतं शेजारी शेजारी गप्प बसून राहू? कोण जाणे! ते सगळं घडायला अजून खूप वेळ होता.

माकडांची मुलं आणि माणसांची मुलं या विषयावर आमचा जोरदार वितंडवाद चालला होता.

तेवढ्यात ती एकदम थांबून डोकं घट्ट दाबून धरत म्हणाली, ''अहो, मी घरून निघताना दूध गॅसवर ठेवलं होतं. निघताना मी ते उतरवून गॅस बंद केला का? की तसाच राहिला?''

''मला काय माहीत?''

''तुम्हाला कधी काय माहीत असतंय?'' ती माझ्यावर संतापली.

''अग, पण तू घरातून निघताना काय ठरवलं होतंस, की घराची मुळीच काळजी करायची नाही. मुलांची तर अगदी मुळीच नाही. मग आता का डोकं धरून बसली आहेस?''

''शहाणेच आहात! एवढा मी एकेक भांडं घेऊन संसार उभा केला ते काय असा वाऱ्यावर सोडून द्यायला?''

''मग आता काय आठ दिवस डोकं धरून बसणार गॅसची चिंता करत?''

''अहो, ते दूध जळून त्याचा कोळसा झाला असेल.''

''असं करू या, हॉटेलवर गेल्यावर आपण घरी एक ट्रंककॉल करू या आणि गॅसचं काय झालं ते विचारू या मुलांना.''

''पण तुमची मुलं घरी पाहिजेत ना तुमचा कॉल घ्यायला! ती उनाडत असतील बाहेर!'' मुलांवर ती रागावली म्हणजे मुलं माझी असतात, एरवी तिची असतात.

''अग, मग आपण शेजाऱ्यांना फोन करू.''

''नको. लोक हसतील मला.''

''मग काय, तू अशीच इथे डोकं धरून बसणार?''

''हो, बसणार! तुमचं काय जातंय मी डोकं धरून बसले म्हणून?''

''अग, पण मी तुझा प्रॉब्लेम सोडवतोय.''

''आले मोठे प्रॉब्लेम सोडवणारे! मला नाही माझे प्रॉब्लेम सोडवायचे! राहू देत आमचे तसेच!''

मी हसलो आणि एका दगडावर बैठक मारली. ती अधिक चालली तर तिला त्रास होईल हे मला माहीत होतं. तीदेखील

बसली, आपल्या संसाराची काळजी करण्यात मग्न झाली.

मी गमतीनं तिच्याकडे बघत राहिलो. ती आपल्या संसारात वावरत असली, त्याच्यासाठी बाजारहाट करत असली किंवा त्याचा विचार करत असली म्हणजे तिच्या चेहऱ्यावर, हालचालीत एक वेगळाच गोडवा येतो. हा गोडवा मी पहिल्यानं पाहिला तो चार-आठ भांडी घेऊन तिनं संसार मांडला तेव्हा आणि अजून तो ओसरलेला नाही. तितकाच ताजा आणि देखणा आहे.

माझ्याकडे रागानं बघून ती म्हणाली, ''तुमचा मुलगा! एवढा घोडा झाला, पण खाली खेळून पाय काळे मिचकूट करून येतो आणि तसाच बिछान्यावर झोपतो! त्याची चादर नुसती काळी मिचकूट झालेली असेल मी जाईपर्यंत.''

मी काहीच बोललो नाही.

''थोडं रागवावं त्याच्यावर. शिस्त लावावी मुलांना. असे नुसते पाहुण्यासारखे घरात वावरता ते शोभत नाही तुम्हाला.''

आता मुलांवर रागावायचं मी सोडून दिलं त्याचं कारण हीच. त्यांना कडकपणे काही सांगितलं, की महिषासुरमर्दिनी-सारखी त्यांचं संरक्षण करायला धावायची. म्हणून मी बोलायचंच सोडून दिलं होतं. पण हे बोलण्यात काही अर्थ नव्हता. म्हणून मी हसून म्हटलं, ''कबूल बुवा! आता मुंबईला गेल्यावर मी त्याला चांगलाच दम देतो. कसा दम द्यायचा ते तू सांग मला. बरोबर तस्सा देतो!''

तिनं मानेला झटका देऊन माझं बोलणं उडवून लावलं.

थोडा वेळ आम्ही गप्पच बसलो. थोड्या वेळानं मी तिच्याकडे बघितलं तर तिच्या डोळ्यांतून पाणी आलं होतं.

मी घाबरून म्हटलं, ''काय ग, काय झालं?''

ती हसण्याचा प्रयत्न करत म्हणाली, ''काही नाही, मला आपली एकदम सुषमाची आठवण झाली. महिना होऊन गेला, अजून तिचं पत्र आलं नाही.''

सुषमा आमची सर्वांत मोठी मुलगी. परदेशात असते.

मी म्हटलं, ''अग, काय हा वेडेपणा! ती कशी धांदरट आहे ते माहीत आहे ना? तुझ्यासारखीच आपल्या नादात असते. त्यामुळे राहून गेलं असेल.''

''एक पत्र लिहायला असा कितीसा वेळ लागतोय?''

मी गंभीरपणे म्हटलं, ''अग, तू मुलांत इतका जीव गुंतवतेस ते बरं नव्हे. आता ती मोठी झाली. ती आपापल्या रस्त्यानं जाणार. तू आता दुसऱ्या कशात तरी मन गुंतव.''

''मलाही ते कळतं हो. पण, तुमच्या हे कसं लक्षात येत नाही, की ही मुलं, हा संसार That is all I have. माझं सगळं आयुष्य मी त्यातच घालवलंय. दुसरं आहे काय माझ्याजवळ?'' तिच्या आवाजात अश्रू मिसळले होते.

मी खिन्नपणे म्हटलं, ''माझंच चुकलं. मी तुला दुसरं काही करू दिलं नाही त्यामुळे असं झालं.''

ती हसून म्हणाली, ''तुम्ही आता आणखी वाईट वाटून घेऊ नका. मला वाटतंय तेवढं पुष्कळ आहे.''

आम्ही दोघं थोडा वेळ गप्पच बसून राहिलो.

मग ती एकदम प्रसन्नपणे म्हणाली, ''चला आता. मला बरं वाटलं. आपण जाऊ या आता. हॉटेलातलं चांगलं चमचमीत जेवण जेवायचं. दुसऱ्यांनी केलेलं जेवण कसं छान लागतं!''

मला तिचं कौतुक वाटलं. माझ्या दुःखांचा मी केवढा बडेजाव माजवतो! आणि ती? चार अश्रूंबरोबर आपलं दुःख गाळून टाकते आणि मोकळी होते.

महाबळेश्वरची दुपार कशी एखाद्या प्रचंड क्षितिजापर्यंत पसरलेल्या हिरव्या पुष्पासारखी पूर्णपणे फुलली होती. सारी हालचाल, सारे आवाज थांबले होते. लखलखीत ऊन हवेच्या कणाकणात चमचमत होतं, वृक्षांच्या माथ्यांवर विसावलं होतं. सारं आकाश त्याने भरून टाकलं होतं. आकाशाचं निळेपण अगदी दूर गेलं होतं. ते अगदी निर्विकार आणि तटस्थ होतं.

तेवढ्यात गर्भात गारवा साठवलेली वाऱ्याची झुळूक आली. शेकडो चिमुकले कवडसे थरकले आणि प्रसन्नतेचा शिडकावा सर्वत्र झाला.

एक पक्षी चिवचिवला. झुळुझुळु वाहणाऱ्या जलप्रवाहाला आपली ओली, नागमोडी लय सापडली.

तिच्या अंगावर एक प्रसन्न शहारा उमटला. आपले केस सावरत ती म्हणाली, ''आपण जाताना बाजारात थांबून मधाची बाटली घ्यायची हं. तुम्हाला चपातीबरोबर मध आवडतो ना?''

संध्याकाळ झाली होती. महाबळेश्वरच्या तलावात मी होडी वल्हवत होतो. पसरलेल्या पंखासारखी वल्ही हवेत थबकत होती आणि मग लयबद्धपणे पाण्यावर झेप घेत होती. फेसांच्या ताटव्यातून पाणी दुभंगत होडी पुढे सरकत होती. खोल श्वास घेत मी वल्ही मारत होतो.'ा लयबद्ध हालचालींच्या नशेत मश्गूल होत होतो.

समोरच्या फळीवर ती बसली होती. मधुचंद्रासाठी आलेल्या तरुण जोडप्यांची पहिल्यानंच होडी वल्हवताना उडणारी गंमत पाहत होती, खूप हसत-खिदळत होती.

कुणाची होडी गरागरा स्वत:भोवतीच फिरत होती, कुणाची किनारा सोडायलाच तयार नव्हती. कुणाचं एक वल्हंच पाण्यात पडून दूर तरंगत गेलं होतं, तर पाण्याशी खूप मारामारी करूनही कुणाची होडी पुढे सरकत नव्हती. फक्त त्या दोघांना पाण्याची अंघोळ घडत होती.

त्यातलं एक जोडपं खूप हसत होतं. दुसऱ्या जोडप्यातला

वल्हवणारा तरुण खूप घामाघूम झाला होता. त्याचे केस कपाळावर लोंबत होते, दुमडलेल्या बाह्या सुटून लोंबत होत्या – आणि तो मनातून चिडला होता. त्याची बायको घाबरून, अंगाभोवती हात बांधून टकटकत्या नजरेनं हा प्रकार पाहत होती. तिसऱ्या तरुणाची होडी स्वत:भोवती गरागरा फिरत होती; आणि त्याची बायको अधिकारवाणीनं त्याला सल्ला देत होती. त्यामुळे त्याचा अधिकच गोंधळ उडत होता. एक तरुण विचारपूर्वक वल्ही तोलून धरत पाण्यावर आघात करत होता आणि तरी आपला का घोटाळा होतो आहे ते त्याला कळत नव्हतं. त्याची बायको निश्चिंत होती. हात बुडवून पाण्याशी खेळत होती. आणखी एका जोडप्यानं ही भानगड नको म्हणून एक नावाडी बरोबर घेतला होता आणि तो सपासप वल्ही मारत त्यांना घेऊन चालला होता. त्या जोडप्यातली बायको धडपडत वल्ही मारणाऱ्या इतरांकडे कौतुकाने बघत होती आणि नवऱ्याला बोटानं टोचून 'तू वल्हव' म्हणून सांगत होती.

''अहो, तो बघा. तो बघा – कसा पाण्याशी मारामारी करतोय. अयाई ग! अंघोळ झाली त्याच्या बायकोला आणि तो बघा – तो बघा पाण्यात पडलेलं वल्हं पकडण्याचा कसा प्रयत्न करतो आहे. अयाईऽ! उलटणार त्याची होडी... ऊर्मिला बोट दाखवत होती, मध्येच किंकाळ्या फोडत होती. मग डोळ्यांतून खूप पाणी येईपर्यंत हसत होती.

''हसतेस काय? आपलीसुद्धा पहिल्यानं अशीच फजिती झाली होती.'' मी हसत तिला दटावलं.

''इतकी नाही हं, थोडीशी झाली होती. तुम्ही लवकर शिकलात. सकाळपासून डोक्यात थिअरी तयार करत होतात.'' माझ्याकडे तिनं अर्धवट थट्टेनं, अर्धवट कौतुकानं दृष्टिक्षेप टाकला.

थोड्याच वेळात किनाऱ्याजवळ लडबडणाऱ्या त्या होडक्यांपासून आम्ही दूर आलो. सगळेच किनारे आता दूर राहिले होते. चोहोबाजूंना पसरलेलं पाणी डोळ्यांच्या कडांवरून आत शिरत होतं. किनाऱ्यावरचा कोलाहल दूर गेला होता आणि मग निश्चल शांतता आमच्याभोवती अलगद उतरली होती. सारं आसमंत तिनं व्यापून टाकलं होतं. ती शांतता स्निग्ध होती, काहीशी खिन्न होती, स्वत:तून स्वत:ला दूर नेणारी होती. तीत एक हुरहुर होती, श्वास आवरून राहिलेली भीती होती, बिनचेहऱ्याची प्रश्नचिन्हं होती.

मला थकल्यासारखं वाटू लागलं. पूर्वी एका दमात तळ्याच्या दुसऱ्या टोकाला जाऊन मी परतत असे आणि खोल श्वास घेत आपल्याच मस्तीत किनाऱ्यावर उतरत असे. आता इथेच जरा विसावावं असं वाटत होतं.

मी वल्ही आत ओढली आणि खोल श्वास घेत दम खाऊ लागलो. आमची होडी पाण्यावर अलगत तरंगत राहिली. आकाशातून सुवर्णवृष्टी होत होती. पाण्याला सोनेरी मुलामा चढत होता. हवेत थंडी फुटत होती, किनारे सगळे दूर राहिले होते.

तिनं विचारलं, ''दमलात का?''

मी हसलो, ''अग, आता म्हातारा होत चालला नवरा तुझा!''

ती नापसंतीनं मानेला झटका देत म्हणाली, ''छट्! असं नाही बोलायचं. मला नाही आवडत.''

मी हसलो. ती हातानं पाण्याशी चाळा करत राहिली.

शांतता मस्तकात, अंगात भरत होती – सारं काही व्यापून टाकत होती. तिला एकदम काय काय वाटलं कोण जाणे! ती उठून तोल सावरत माझ्या जवळ आली आणि मला मिठी मारून तिनं माझं एक चुंबन घेतलं.

मी हसलो आणि कडेकडेनं पांढऱ्या होऊ लागलेल्या तिच्या केसांवरून मायेनं हात फिरवला. माझा कंठ दाटल्यासारखा झाला. डोळ्यांच्या कडांतून सामावलेलं पाणी भराभरा आत शिरू लागलं.

ती पुन्हा तोल सावरत आपल्या जागेवर जाऊ लागली. मी तिला हाताने आधार दिला.

ती म्हणाली, ''सांगू नका हं कोणाला. लोक हसतील.''

मी हसून मान हलवली.

पाहता पाहता आकाशातलं सोनं विरून गेलं. असंख्य काळी पारखं आता आकाशात सर्वत्र जागच्या जागी पंख हलवू लागली. क्षितिजाच्या कडा म्लान झाल्या. पाणी एकदम गंभीर आणि दाट झालं. एक औदासीन्य सर्वत्र साकळलं. माझं अंग कसल्याशा भीतीनं थरकलं. मी वल्ही उचलत म्हटलं,

''चला, आपण परत जाऊ या.''

परतीचा प्रवास खूप लांब वाटला.

होडीतून उतरताना मी म्हटलं, ''थकलो मी. पण मजा आली, नाही?''

ती म्हणाली, ''खूप! अगदी मस्त!''

मला तिला विचारावंसं वाटत होतं, ''काय ग? आपण इतकी वर्षं हा जो प्रवास केला, तोदेखील असाच मस्त होता का?''

पण मी तो प्रश्न तिला विचारलाच नाही. असले प्रश्न विचारायचे नसतात.

रात्रीचं जेवण उरकून आम्ही आमच्या कॉटेजकडे परतत होतो. काळोख मखमली होता. त्यात ठासून भरलेली थंडी चोहोबाजूंनी झोंबत होती – एखाद्या अस्वलानं कवटाळावं तशी. आकाशात तारकांचा नुसता खच पडला होता आणि ते इतकं खाली उतरलं होतं, की वाटत होतं, हात वर केला की त्याला लागेल आणि त्या साऱ्या लकाकत्या तारकांचा अंगावर वर्षाव होईल.

''हु हु हु हु हु हु'' करत मला घट्ट बिलगून ती चालत होती. आम्ही कॉटेजमध्ये पोहोचलो तेव्हा तिनं घाईनं दार बंद करून घेतलं.. तरीपण बरीचशी थंडी आत आलीच.

तिनं चटकन पांघरुणं जोडून घेतली आणि बिछान्यावर उडी मारली.

''अहो, मला माझं पुस्तक द्या ना.''

मी तिला पुस्तक दिलं आणि आरामखुर्चीत पडून बाहेरच्या काळोखाकडे बघत राहिलो. मखमली काळोख खिडकीला अगदी बिलगला होता आणि तिथून दिसणारा बाहेरचा एकाकी दिवा थंडीत अगदी काकडला होता.

पुस्तक वाचता वाचता ती म्हणाली, ''तुमची पांघरुणंपण जोडून ठेवली आहेत. ती नीट अंगावर घ्या. नाहीतर मग रात्री माझ्या अंगावरचं ओढाल.''

मी हसून मान हलवली.

थोड्या वेळानं ती पुन्हा पुस्तक बंद करून म्हणाली, ''अहो, मी ठरवलं आहे की, तुमच्या आधी मरून जायचं.''

''अरे बाप रे! केव्हा?''

''मघाशी आपण बोटिंग करत होतो, तेव्हा.''

''पण मी म्हणतो. इतकी घाई काय? खूप वर्षं आहेत अजून!''

''नाही – पण आपलं सांगून ठेवलं. नाहीतर मागून कटकट करत बसाल!''

''अग, पण मग माझं कसं होईल? माझ्या अंगावर पांघरूण कोण घालील? आणि...'

''हे पाहा, तुम्ही आता माझ्या डोक्यात गोंधळ उडवू नका हं. तुम्ही नेहमी असं करता.'' आणि एकदम तोंड फिरवून ती गुरगुटून झोपली.

मी आरामखुर्चीत तसाच बसून राहिलो. बाहेरचा मखमली अंधार अगदी खिडकीला बिलगला होता, आणि तिथून दिसणारा बाहेरचा एकच दिवा थंडीत अगदी काकडला होता.

पण जरा वाकून पाहिलं की तारकांचा खच पडलेलं आकाश दिसत होतं आणि असं वाटत होतं, की जरा हात वर केला की तो आकाशाला लागेल आणि त्या तारकांची आपल्या अंगावर वृष्टी होईल. ●



ग्रंथाली


सुनंदा भोसेकर

लिखित


पेरिप्लस ऑफ हिंदुस्थान

खंड १ व खंड २




**दोन खंडांची मूल्य १५०० रुपये**
**सवलतीत ८०० रुपये. टपालखर्च १०० रु.**



# मोठी आई

**विद्याधर पुंडलीक**

परवा त्या स्वप्नात आल्या होत्या. ‘मला तुझ्या घरी यायचंय– मी केव्हाची वाट पाहते आहे’ असं म्हणाल्या म्हणून त्यांना बोलावलं. खरं म्हणजे हा सगळा संसार– हे वैभव त्यांचंच. ही नकटी त्यांची. हेही त्यांचंच. मी वेडी आपली नुसती लग्नाची!

**मी** ड्रेसिंग मिररपुढे उभी राहिले. कंगवा घेतला अन् माझ्या केसांवरून फिरवला.

आहेच मी सुंदर!

इतक्यात आरशातून मोठी आई दिसली. मी दचकून हळूच पाहिलं. ती कपाटातून आपली कुंकवाची पेटी काढत होती. तिनं ती पेटी काढली. कपाटाला चांगलं घट्ट कुलूप लावलं. मग पुन्हा पुन्हा ओढून ती कुलपाशी बोलू लागली,

'हं! आता जागच्या जागी गप्प बस. निसटून जाऊन तोंड उघडायचं नाही. हळूच बाहेर नाही पडायचं.'

मोठी आई असंच काहीतरी विचित्र बोलते, विचित्र करते. वाईट वाटतं, पण कुणाला काही करता येत नाही.

आता मोठी आई माझ्याकडे टक लावून पाहत होती. तिचा एक हात नेहमीप्रमाणे छातीशी, तिच्या चोळीच्या गळ्याशी होता. असा का ती ठेवते? चोळीचा बंद आत सरकवण्यासाठी?

मी आरशातून हसले. त्याबरोबर तीही हसली. मोठी आई हसली की एकदम वेगळी दिसते. कशी ते नाही सांगता येत. पण दिसते.

''मोना, आज मी वेणी घालणार तुझी.''

अगबाई! मोठ्या आईची वेणी? मोठी आई आपले केस असे तडतडून बांधते. मी आग्रह करते. पपा सांगतात. शेजारच्या बायकापण. ही ऐकत नाही. एकदा तिच्या देखतच पपा मला म्हणाले,

''मोन्या! हिचे हे घट्ट आवळलेले केस काही आपल्याला पाहवत नाहीत. गुदगुल्या करून, हसायला लावून, तिची ती वेणी सोड आणि तिचं डोकं एकदाचं मोकळं कर-''

मोठी आई पपांसमोर कधी हसायची नाही. ती पपांना भितेच थोडी. पण त्यावेळी इतकी काही हसली म्हणता. पण वेणी आपली पुन्हा घट्ट - अन् तशीच तडतडलेली!

तर काय, मोठ्या आईला माझी वेणी जमत नाही. नेहमी बिघडवते. तिचे पेड तरी सारखे नसतात. कुठे बटच निघालेली असते. नाहीतर भांग तरी वेडावाकडा निघतो.

इतक्यात मोठी आई म्हणाली,

''हो म्हण, नाही म्हण. आजतरी माझं ऐकलंच पाहिजेस तू.''

''का? आज काय आहे?''

''मागून सांगेन-वेणी झाल्यावर.'' आणि मोठी आई गंभीर झाली.

चटई घालून मी वेणीला बसले. कारण मोठी आई कधी ड्रेसिंग मिररपुढे उभी राहून वेणी घालत नाही. कुंकूसुद्धा लावत नाही. तिची एक काळी कुळकुळीत पण चकचकीत देव्हाऱ्यासारख्या लाकडाची पेटी आहे. तिच्यावर कुंकवाच्या रंगाची दोन छान कमळं आहेत. आत लहान लहान डब्या - मेणाच्या आणि लाल पिंजरीच्या. एक हळूच छुमकन् वाजणारा घुंघराचा करंडाही आहे त्यात. पेटी मला आवडत नाही. मोठ्या आईची काहीतरीच टेस्ट. पण पेटीला एक छान वास आहे. कसा तो सांगता येत नाही. मोठी आई म्हणते तो वास तिच्या आई आजीच्या, पणजीच्या केसांचा आहे.

माझ्या केसांचा झुपका पंजात पकडून मोठी आई म्हणाली, 'कसे ग लाल गवतासारखे केस आहेत माझ्या नकट्या सोनपरीचे. '

मोठ्या आईला माझे काय आवडत नाही? मला एक आठवण आहे. माझ्या चेहऱ्यावरचे तपकिरी वांग मला मुळीच आवडायचे नाहीत. लहानपणी तर मी रडायची. बाबा म्हणायचे, 'मूर्ख! रडायला काय झालं? लोकांना साफ सांगावं, आहेत माझ्या गोऱ्या आईसारखे!'

मी गप्प बसायचे. पण समाधान व्हायचं नाही. मग मोठी आई मला म्हणाली, ''तुझ्या मैत्रिणींना सांगत जा-ब्रह्मदेवानं माझ्या चेहऱ्याला आणि केसांना रंग दिला. आणि चुकून ब्रश झाडला तो तोंडावर. त्याचे ठिपके आहेत ते!''

अशीच हळूहळू मोठी आई मला आवडू लागली. नाहीतर मी फार दुष्ट होते. (अजून आहे. पण फार नाही.) तिला वेडावूनसुद्धा दाखवायचे मी!

पण आज काय झालं कुणास ठाऊक, मोठ्या आईनं कधी नाही ती छान वेणी घातली. सैलसर सरऽऽऽळ भांगाची आणि सारख्या पेडाची. बटसुद्धा निघाली नाही. मान मागे करून तिच्या गळ्यात हात घालून मी विचारलं-

''मोठी आई, कमालच केलीस की!'' मोठी आई हसली. माझं तोंड कुरवाळून माझ्या डोळ्यांत खोल पाहत म्हणाली, ''लबाड! पूर्वजन्मीची मांजरी होतीस असं म्हणते ते खोटं का?''

मला वर्गातसुद्धा 'जर्मन कॅट' म्हणतात. कारण माझे डोळे निळे घारे आहेत. माझ्या जर्मन आईसारखे!

''अग मोठी आई, पूर्वजन्म वगैरे काही नसते.'

''पत्र आलं वाटतं तुला स्वर्गातून! शेवटी तू तुझ्या गोऱ्या रक्तावरच जाणार. त्या बयाचा विश्वास नसणार. तुझाही नाही.'' आणि तिनं मला हातानं पुढे ढकललं-

''असं काय मोठी आई! रागावलीस?''

''मला माहीत आहे. तुम्हाला कळत नाही पण माझे सगळं लक्ष असतं. ते जर्मन का फर्मन शिकवताना, तुझे पपा तुला फूस देतात. बाकी त्यांनाही तिनंच पाखंडी केलं असेल म्हणा! आम्हा अर्धवटांना वाटतं सगळं काही आहे. माणसं

आहेत. त्यांचा आत्मा आहे. तो पुन्हा जन्म घेतो आणि मोने, तुला सांगू का? एकदा मागला जन्म म्हटला की अशी मज्जा येते'' अन् मोठी आई ही ही करून चमत्कारिक आवाज काढून हसली!

''मज्जा.''

मोठी माणसं मज्जा म्हणतात का! असं विचित्र हसतात का? ही असं करते अन् मग शेजारच्या सगळ्या काकूबाई, मावशीबाई आमची अलकाआत्या हसतात. पदराला तोंड लावून,

''मोना, एकदा मागला जन्म म्हटला की मग आपल्याला खूप मागे जाता येतं, खूप पुढे जाता येतं. कितीतरी जन्म घेता येतात. सोडता येतात.''

''म्हणजे ग काय?''

''मला वाटतं त्या गोष्टीतली झोपडीत राहणारी, उष्टी-खरकटी करणारी, फाटकी-तुटकी पातळ नेसणारी नावडती राणी ती मीच! दागिने पाटावर मांडून त्याला जेवू घालून श्रीमंत भावाची खोडी जिरवणारी गरीब बहीण मीच होते! आणि कृष्ण जिच्याकडे पहाटे गेला ती कुब्जासुद्धा बहुतेक मीच असली पाहिजे-

''कुब्जा म्हणजे काय? ती कोण होती?''

''एक म्हातारी-कुरूप गोपी! पण कृष्णाचं तिच्यावर गुपचूप प्रेम होतं.''

मोठ्या आईकडे पाहून मला पुन्हा वाईट वाटलं.

मी कुरकुरत म्हटलं,

''मोठी आई, नको ग असं काही बोलूस. तू असं बोललीस की लोकं-''

''वेडी म्हणतात. स्क्रू ढिला आहे असं म्हणतात. हो ना? - हा बघ मी तो घट्ट केला. झालं समाधान? झाली शहाणी?'' - आणि तिनं कानापाशी हात लावून स्क्रू पिळल्यासारखा केला.

''तसं नाही ग, मोठी आई. मला आवडतं तुझं बोलणं. पण...''

मोठी आई एकदम गप्पच झाली. तिचे डोळे आता वेगळे झाले. आमची अलकाआत्या चष्मा घालते. तिने चष्मा काढला की तिचे डोळे कसे निराळे हरवलेले दिसतात. मोठ्या आईचे डोळे अगदी तसेच बिचारे दिसू लागले. पपा हवे होते आता. तिनं असे डोळे केले की ते 'हं-हं' रमा करून तिला दटावतात. मगच ते डोळे अदृश्य होतात. मग मी विचारलं, ''मोठी आई, मी मांजरी-माझी आई मांजरी मग पपा कोण होते? बोका?''

''अगबाई! चांगला पिवळ्या पट्ट्यांचा लडदू बोका! वाघाचा भाचा. साध्याभोळ्या बायकांचं दूध-दुभत्याचं कपाट उघडं राहिलं की त्यात तोंड घालणारा!''

अन् मोठी आई एकदम घाबरली.

''सांगू नकोस हो त्यांना. नाहीतर-''

''अग, असं कसं सांगेन मी? पण मोठी आई! तू कोण होतीस ग त्यावेळी?''

''तुम्ही ज्या घरात होता, त्या घरात मी नव्हतेच ग मोना! मी लांब होते - तुमच्यापासून खूप दूर-''

बोलता बोलता मोठ्या आईचे डोळे भरून आले.

''नाही नाही-मोठी आई तू होतीसच.''

''कोण असेन? तूच सांग.''

''जवळच्या गोठ्यातली गाय असली पाहिजेस तू!''

''आमच्या शेतावर एक गाय होती. बाबांची फार आवडती. तिला चारा टाकल्यावाचून ते कधी जेवायला बसायचे नाहीत-''

पण माझं लक्षच नव्हतं. मला एकदम पुस्तकातला आमचा धडा आठवला - And then the cat went to the cow and said, 'My dear cow! will you please give me a little milk in exchange for some grass?'

इतक्यात टेबलावरचा रूळ आपटून पपांनी हाक मारली, 'मोन्या, सोन्या, टोन्या Come here. '

पपा आपल्या टेबलावर बसून हॉलमध्ये झपाझपा टायपिंग करत होते. आमचा हॉल टॉप आहे. काळा सोफा सेट, लांब हिरवा गालिचा, भिंतीवर छान छान नक्षीनक्षीचे दिवे. कोपऱ्यात मात्र एका नागड्या बाईचा घाणेरडा पुतळा आहे. भिंतीवर मोठमोठ्या चित्रकारांची चित्रं आणि फोटो. त्यात एक माझ्या आईचा. तिच्या शेजारी माझ्या गोऱ्या आजोबा-आजीचा.

''गुटेन मारगेन मोना.''

''गुटेन मारगेन पपा-''

पपांना जर्मन छान येतं. माझ्या आईशी ते म्हणे जर्मनमधूनच बोलत.

पपांनी विचारलं, 'येस?' आणि मग त्यांना आठवण झाली आपणच बोलावल्याची! टाइपरायटरची घंटी खणखणली. उजव्या हातानं टाइप करता करता, डाव्या हातानं मला जवळ ओढत ते पुन्हा म्हणाले,

''डुम! गन्स् उनगोझेयने!''

''म्हणजे काय पपा?''

पी.टी.चे हात शिकवणाऱ्या बाईप्रमाणे त्यांनी पुन्हा तेच शब्द खाडखाड उच्चारले.

''डुम! गन्स् उनगोझेयने!-फेरफ्युकट् शुरके!''

''असं हो काय? सांगा ना!''

''सोन्या, सांगितलं तर रडशील हो-''

''का बरं?''

''अग, जर्मनमधल्या भयंकर शिव्या आहेत त्या!''

आणि पपांनी बाजूच्या आईच्या फोटोकडे बघितले. मग खाली वळून समोरच्या टाइपरायटरवरून त्यांनी पियानोसारखा

हात फिरवला. हळूच शीळ घालून हसून ते म्हणाले,

''मोन्या, तुझ्या आईवर मी एकदा खूप रागावलो होतो.''

''का?''

''ती कुंकू लावायची नाही. मंगळसूत्र घालायची नाही. साडी नेसायची नाही. मला रोज सक्तीनं व्यायाम करायला लावायची. नुसतं तेच नाही, त्यानंतर बंपर भर दूध! फार हट्टी होती ती. मग एक दिवस चिडलो. म्हटलं–

'तू मंगळसूत्र घातलं तरच व्यायाम करेन आज!'

ती म्हणाली, 'नाही.'

मी म्हटलं, ''गाढव आहेस. मूर्ख आहेस.'' तशी ती हसली आणि म्हणाली, ''डार्लिंग, मला जर्मनमध्ये रागावना. म्हणजे मला ते समजेल. आणि मग मी रडेन.''

''मग तुम्ही जर्मनमध्ये रागावलात?''

''माझ्या डोळ्यांकडे पाहत अन् डोळे मिचकावत म्हणाले,

''तशी तुझी आई 'मिश्चिव्हसही' होती! तोपर्यंत मला जर्मनमधले प्रेमाचेच शब्द शिकवले होते तिनं!''

मी वर पाहिले, ''अशी होती माझी आई? मी जन्माला आले आणि दोन महिन्यांत बिचारी गेली.''

पपा सांगत होते–

''माझ्याजवळ फार पैसे नव्हते, तेव्हा सगळे कपडे ती शिवायची. रफूसुद्धा करायची. तेव्हा म्हणायची, मी गेले की चांगले दिवस येतील तुम्हाला –

अन् खांदे उडवून ते हसले.

''ओके मोना! मोठ्या आईला विचार–ब्रेकफास्ट तयार आहे?''

मोठी आई दरवाजातून आत येत म्हणाली, ''आहे.''

''म्हणजे काय रमा, तू इथेच ऐकते आहेस होय चोरून?''

''ऐकते आहे सगळं! सवतीची आरती संपली असली तर येते!''

मोठी आई रागावली होती. ती पुढे म्हणाली,

''मी गेले असते तर माझी काही अशी आरती केली नसती.''

''केलीच असती.'' मी म्हणाले.

''कसं बोललीस पोरी!'' पपा माझ्या पाठीवर शाबासकी देत म्हणाले.

''अग मोना, आम्ही कुठे आहोत हुशार? फाडफाड जर्मन बोलायला येतं का पियानो वाजवायला येतो–का गळ्यात टाय बांधून पापे घ्यायला येतात का पत्रं टाइप करता येतात? का नवऱ्याचं ऑफिस चालवायला येतं?''

''काय करणार आता?'' पपा खोटा उसासा टाकून म्हणाले, ''इलाज आहे का? म्हणूनच मोना, मला जग म्हणत असतं...''

''की कशाला या वेडीबरोबर नांदतो हा एवढा मोठा माणूस! कुठे ती आणि कुठे ही!''

''मोना, इतकं सगळं ओळखणाऱ्याला कसं ग वेड म्हणायचं?''

पपा मग हसत हसत मोठ्या आईजवळ गेले. नेहमीप्रमाणे मोठ्या आईचा पदर घोळ होऊन पडत आलेला होता. तो उचलून ते म्हणाले,

''खरोखरीच शहाणी आहेस! पण हे पातळ जरा खाली नेसलीस तर–म्हणजे तो परकरही दिसणार नाही. परवाच्या आमच्या कॉन्फरन्सच्या पार्टीला माझ्याबरोबर अशीच येणार आहेस?''

''तुमच्या म्हणण्याप्रमाणे परवा खाली नेसले तर पायात काठ अडकून पडले. मी पडावं अशीच तुमची चोरून इच्छा असते!''

मग मोठ्या आईनं पातळ खाली पायात ओढलं आणि ती म्हणाली,

''माझंच चुकलं. तेव्हा आणि पूर्वी.''

''पूर्वी आणि तेव्हा म्हणजे काय?'' पपा आश्चर्यानं म्हणाले.

''पूर्वी म्हणजे लग्न करताना आणि तेव्हा म्हणजे तुम्ही मला घरी परत न्यायला आलात तेव्हा–मोनाची आई गेल्यावर.''

''पण काय चुकलं?''

''भयंकर चुकलं.''

''अग, भयंकर म्हणजे काय?''

''मी या घरी परत यायचंच नाही. तसंच तुम्हाला परत धाडायचं – सवतीची एक तारखेची मनीऑर्डर जशी शेवटपर्यंत परत धाडत होते तसंच तुम्हालाही परत धाडायचं.''

''मग का आलीस ग परत मोठी आई?''

''तुझ्या पपांनी डोळ्यांतनं पाणी काढलं आणि विरघळले! माझी खात्री आहे–जर्मनीला यांनी असंच सोंग आणलं असेल म्हणून तुझी आई विरघळली–''

''मोने, खरं म्हणजे उलट झालं होतं हे...!''

''मुळीच नाही. ती आमच्यासारखी रडूबाई नव्हतीच. पुरुषाला नेमक्या वेळी पाणी काढता येतं–तसं बाईला सारखं रडल्यामुळे येत नाही. मग करायचं काय? अग मोना, आपण बायका अशाच जन्मभर फसायच्या.''

पपा खूप हसत सुटले. ते थकल्यावर म्हणाले–

''अन् हे बघ रमा, सवतीचे पैसे परत केल्याचा पश्चात्ताप तुला अजून होतोय का? मार्थानं तुझे सगळे पैसे बँकेत जसेच्या तसे ठेवले आहेत. मी उधळेन म्हणून डिपॉझिटमध्ये ठेवले आहेत.

''मला नकोत ते पैसे!''

''का ग, मोठी आई?''

''रागावू नकोस मोना, पण मी ते कधी घेणार नाही.''

''खूप असतील ना पपा?''

''खूप आहेत. You greedy bitch! तुझ्या आईसारखी तू काही बाणेदार नाहीस मोना.''

''नसू दे. होऊ दे तिला माझ्यासारखी. मी नाही - संसाराच्या हावेनं परत आले?''

पपा हात जोडून म्हणाले-

''रमा, यू आर रिअली इंपॉसिबल. बरं चला. ब्रेकफास्ट आणायला सांग.''

''सांगते.''

मी अन् पपा टेबलापाशी जाऊन बसलो. पण आश्चर्य म्हणजे मोठी आईच एकेक गोष्ट आणू लागली.

''हे काय? तू का आज ब्रेकफास्ट सर्व्ह करते आहेस? शिवराम आला नाही?''

''नाही. मीच त्याला येऊ नको म्हणून सांगितलं...''

''का?''

''आज ब्रेकफास्ट मला करायचा होता!''

मोठी आई आत गेल्यावर पपांनी कपाळावर हात मारून आपलं डोकंच धरलं!

प्रथम टोस्ट आले. पण ते जळाले होते. मागून स्क्रम्बल्ड एग्ज आले, पण त्यांना इतकं काही पाणी सुटलं होतं-विचारू नका!

''कसं झालंय? जमलंय का थोडेफार तरी सवतीसारखं?''

''वा.'' पपा मोठ्याने हसून म्हणाले,

''मोना, सगळे लोक बेकऱ्या, टोस्ट तपकीरी करतात, पण काळ्या रंगाचेही टोस्ट असतात बरं का! आणि अंड हा इतका पाणीदार पदार्थ आहे हे तुला माहीत होतं का आजपर्यंत?''

''मग नसतात एवढी अंडी पाणीदार? मग ते पाण्यासारखं चिकट काय असतं अंड्यात? आई ग आई!''

आम्ही दोघं खूप हसलो. काय म्हणावं आता मोठ्या आईला? मग पपांनी मोठ्या आईला विचारलं,

''रमा, पण खरंच तू हे सगळं केलंस? अग, अंडी म्हटली की त्यांच्या नुसत्या वासानं ओकणारी तू!''

''केलं झालं... करते काय?''

पपा माझ्या खांद्यावर डोके टेकून खूप हसले. म्हणाले, ''मोना, तुझ्या आईनं एकदा श्रीखंडाच्या वड्या केल्या होत्या. पण त्याची तार जवळजवळ एक फूट लांबत गेल्यामुळे त्या मला खाताच आल्या नाहीत!''

पपा उठले. मोठ्या आईच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनी विचारलं, ''का लहर आली तुला ही रमा! वेडाबाई!''

तेवढ्यात मला आठवण झाली, ''खरंच की ग मोठी आई, मघाशी माझी वेणी घातलीस, आज स्वत: ब्रेकफास्ट केलास. काय आहे काय आज?''

''आज तुझ्या आईचा दिवस आहे.''

''म्हणजे काय? पपांनी विचारले. मग आठ्या घालून ते पुटपुटले,

''नो, नो, पाऊ कॅन इट बी?''

''मोना, तुझी आई जेवायला येणार आहे आज!''

मी टेबलावर हात आपटून रडवेली होऊन विचारलं, ''मोठी आई! बघ पुन्हा बोलू लागलीस तू काहीतरी विचित्र, माझी आई कशी जेवायला येईल?''

''अग आज अविधवा नवमी आहे. आज तिचा दिवस म्हणून प्रथम तिचं जेवण मी तुम्हाला दिलं. आता माझं जेवण ती जेवेल.''

''अग, पण कशी?''

''मोना, सवाष्ण बोलावली आहे आज. सवाष्णीच्या रूपानं माझी सवत जेवायला येणार आहे आपल्या घरी. समजलं?''

''रमा, कुणाला बोलावलं आहेस सवाष्ण म्हणून?''

''घरचीच आहे. आपल्या वन्सं.''

''ती तयार झाली? आश्चर्य आहे!''

''प्रथम अजिबात होईनात. मीच आग्रह धरला.''

''ग्रेट! वंडरफुल!''

''पण ती भांडणं-ते कान किटेतोपर्यंत वादविवाद-काही करू नका हं आज!''

''नाही करणार-आज ती फक्त सवाष्ण आहे!''

-पपा हळू आवाजात म्हणाले.

मोठी आई मग स्वयंपाकघरात आली. सबंध स्वयंपाकघरात भाजीपाल्याचा आणि फळांचा केवढा तरी पसारा पडला होता. तिकडे बघत बघत मोठी आई मध्येच पायाचे अंगठे धरूनच बसली! प्रत्येक भाजीकडे नजर फिरवून बघत होती. मग मान हलवत दमल्यासारखं करून म्हणाली,

''कसं ग व्हायचं हे मला!''

''अग, का व्हायचं नाही?''

''होणार नाही. नाही व्हायचं. ती पुन्हा तेच ते पुटूपुटू लागली. मग मध्येच डोक्यावर हात ठेवून ती म्हणाली, ''लागला ग माझा चेंडू गरगरायला.'' मग पपांकडून मी तिला नेहमीची गोळी दिली. तेव्हा तिला जरा बरं वाटलं. पपा ओरडले-

''मोना, बघू नकोस नुसती - हेल्प हर.

मी पुढे झाले. मीठ, दाणे, कोथिंबीर, आलं जे तिनं मागितलं... ते मी दिलं. मोठ्या आईनं मग सगळं बारीक-सारीक केलं-आमसुलाची चटणी, काकडीचा कायरस, वाटली डाळ-पुरण वाटून गोळा तयार केला. उडदाचे वडे तळले. हे

करताना ती सारखी बोटं मोडमोडून पदार्थ मोजत होती.

मी हसून विचारलं,

''मोठी आई, काय हवंय काय तुला?''

''मोज ग मोने! पाच पक्वान्न आणि सोळा भाज्या झाल्या की नाही?''

मी चटकन् सगळी भांडी मोजली. आणि सांगितलं,

''फक्त खीर राहिली.''

आणि हे सगळं मोठी आई किती हळूहळू करत होती. किती वेळा हात धूत होती. किती वेळा पुसत होती. किती वेळा गॅस पेटवत होती, पुन्हा विझवत होती. नाकानं सू सू करत होती. डोळे पुसत होती!

बरोबर बाराच्या ठोक्याला अलकाआत्या आली. आत्या कॉलेजात प्रोफेसर आहे. तिचा सोनेरी काड्यांचा ऐटीचा चष्मा आहे. त्या भिंगांतून तिचे काळे डोळे आणखीनच छान दिसतात. तिच्या हातात नेहमी एक पुस्तक अन् केसांतसुद्धा नेहमी एकच चाफ्याचं फूल असतं! तिचा हात सारखा आपल्या केसांवरून फिरत असतो–माहीत आहे आम्हांला, कुरळे केस आहेत ते! आत्या अगदी नाटकातल्या आईसारखी गोड हाका मारते. मोनिऽऽऽका म्हणून! पण आहे चिकू. कधी खाऊ आणायची नाही! कधी फ्रॉकचं कापड द्यायची नाही! फक्त जाताना मात्र एक वरवरचा पापा घेऊन जाते. 'व्हॉट अ स्वीट गर्ल' म्हणते!

आत्या आली तीच मनगटावरच्या घड्याळाकडे पाहत पाहत.

''रमावहिनी, मला बरोबर दीडला मोकळी कर हं! पीरिअड आहे मला.

''म्हणजे रजा काढली नाही? असं हो काय वन्सं? तरी मी सांगितलं होतं तुम्हाला.'' आत्या किनरी किनरी हसली. म्हणाली,

''रजेचं कारण काय लिहू? सातासमुद्रापलीकडच्या माझ्या जर्मन वहिनीची अविधवा नवमी आहे म्हणून?''

''अजून कॉलेजात फोन करा. पण थांबा दुपारभर.''

''यू आर सो हॅपी वहिनी! सगळी दुपार कधी निवांत छान मिळते. जेवणं करावी. यथेच्छ लोळावं. सावकाश चहा घ्यावा. वाचन नको, व्यासंग नको, डोक्याला कधी त्रास नाहीच कसला! कधी कधी असा हेवा वाटतो तुझा रमावहिनी!''

''मग दे राजीनामा – हो सुखी!'' पपा हसत हसत म्हणाले.

''करेन विचार–'' आत्या म्हणाली आणि आठ्या घालून पपांबरोबर आतल्या खोलीत गेली. पपांशी बोलू लागली.

इकडे बिचाऱ्या मोठ्या आईची गडबड चालू होती. मध्येच चांदीचं ताट अन् तांब्याभांडं पुसता पुसता मोठ्या आईनं मला जवळ बोलावलं,

''मोने,'' अन् पुढे ती काहीच बोलेना.

काय घाबरली होती! ''काय ग मोठी आई? सांग ना.''

''बाहेरच्या खोलीत जा आणि बघ बरं आत्या काय म्हणतीय ते.''

''का?''

''सारखे प्रश्न विचारू नयेत. माझ्या संबंधी काय बोलताहेत बघ.''

''सारखा आपला तुझा संशय! मी पुटपुटत गेले. दाराशी कान लावून ऐकू लागले. आत्या हळूच म्हणत होती, ''It is all absurd. I was not willing to come.''

''मग का आलीस? दुसरी सवाष्ण मिळाली नसती काय?''

''तुझा विचार केला.''

अन् आश्चर्य म्हणजे आत्याच्या डोळ्यांत पाणी आलं.

''अलका! तू माझा जितका विचार करतेस तितकाच रमेचाही करत जा.''

''मला ते जमणार नाही. पण मला तुझ्याबद्दल वाईट वाटतं. का आणि कशासाठी सहन करतोस हे सगळं? आजच्या ह्या अविधवा नवमीला का संमती दिलीस? अर्थ आहे का याला काही? संताप येतो. तुझी बायको एक अर्धवट अन् तू दुसरा–''

अन् आत्यानं हळूच डोळे पुसले. पपा मात्र हसले. त्यांनी खूप वेळ तोंडाने चकचक केली!

''अलका, आज तू सवाष्ण आहेस रमेची. आज तरी तिच्याबद्दल वाईट बोलू नकोस.''

आत्या गप्प बसली. कुठलंस इंग्लिश मासिक वाचू लागली. मी आत आले. खोटंच सांगितले.

''मोठी आई, काही नाही ग. ती आपल्या कॉलेजचे सांगते आहे काहीतरी.''

इतका वेळ मोठी आई भिंतीला टेकून उभी होती. नेहमीप्रमाणे तिचा हात चोळीच्या गळ्यापाशी होता. मी हे सांगितल्यावर तो सुटला.

आत्यासाठी आज रंगीत पाट मांडला होता. चांदीचं ताट होतं. समोर उदबत्त्यांचं झाड होतं. भोवतालची रांगोळी मात्र काहीतरीच जाड ढबोळ्या रेषांची होती. पानंफुलंसुद्धा वेडीवाकडी आली होती.

आत्या आली, बसू लागली इतक्यात मोठ्या आईनं तिला कुंकू लावलं.

''नीट सावकाश जेवा! मनापासून, पोटभर! किती वर्षांनी येता आहात!''

''चांगलीच आहेस की ग वहिनी. अग, दोन महिन्यांपूर्वीच नव्हते का आले. आमचा कढीलिंब द्यायला?''

पपा तिच्याजवळ गेले. मोठ्या आईच्या खांद्यावरून गळलेला पदर त्यांनी पुन्हा नीट केला. आणि तिचा खांदा थोपटून ते म्हणाले,

''रमा, इकडे बघ!''

''काही चुकलं कां माझं?'' मोठ्या आईनं बावरून विचारलं. आणि तिचे डोळे पुन्हा चष्मा हरवलेल्या माणसासारखे झाले! पपांनी पुन्हा तिचा खांदा थोपटला.

''कोण म्हणतं? तू जिला बोलावलं आहेस ती आली आहे ना आपल्या घरी?

''हो हो-आली आहे.''

''मग आता वेळ कशाला घालवतेस?''

''नाही घालवत.''

सगळा स्वयंपाक पण बिघडलाच होता. पुरणपोळीचे तुकडे पडत होते. बटाट्याची भाजी तिखट झाली होती. खिरीत साखरच नव्हती.

आत्या जवळजवळ जेवलीच नाही. घास असा घेतच नव्हती ती. जणू बोटांनी जेवत होती. मोठ्या आईला फार वाईट वाटलं.

''काहो वन्स, स्वयंपाक चांगला नाही झाला?''

''नाही ग, खरंच छान झाला आहे.''

''खोटं. मग आणखी पोळी घ्या.''

''नको नको. अग मी थोडं येता येता खाऊन आले आहे.''

''का आलात? मी बजावलं होतं.''

''जाऊ दे ग. मला आग्रह करू नकोस. मला आग्रह अगदी आवडत नाही. त्यातून आणखी काही वाढलंस तर ते तसंच राहील. सांगून ठेवते.'' आत्याचा हात ताठ झाला होता.

''पण त्यांना आपली पुरणपोळी म्हणे फार आवडायची-''

''रमा! नको आग्रह करूस तिला! आग्रह मला कर-मोनाला कर!'' पपा म्हणाले.

जेवण झालं. मोठ्या आईनं आत्याची खणा-नारळानं ओटी भरली. अन् तिला नमस्कार करून ती म्हणाली-

''घडी मोडा अन् ते नेसा. कॉलेजात घालूनच जा!''

आत्या पुन्हा किनरी किनरी हसली.

''आज नको हं! आणि आता बदलायला वेळ तरी कुठे आहे? पुन्हा एकदा नेसूनच येईन तुझ्याकडे-अं? रागावू नकोस.''

अन् आत्या'स्वीऽऽटी' करून माझा पापा घेऊन गेली.

पपा अन् मोठी आई बाल्कनीत गेले. आत्या दिसेनाशी होईतो ती दोघं तिथे उभी राहिली. अन् मग आत आली.

पपांनी मोठ्या आईला थापट मारून विचारलं, ''अच्छा रमा! गुड बाय! जातो आता ऑफिसमध्ये! झालं ना सगळं मनासारखं तुझ्या?''

''एक राहिलंय.''

''काय?''

मोठी आई आत गेली. तिनं एक हार आणला.

''तो हार घ्यावा! अन् त्यांच्या फोटोला घालावा!''

मी पपांना खुर्ची दिली. ते चढले. त्यांचा हात थरथरत होता. हार घालून झाल्यावरही

ते थोडा वेळ तिच्याकडेच बघत होते. मग ते खाली उतरले.

मोठी आई मागून म्हणाली-

''परवा त्या स्वप्नात आल्या होत्या. 'मला तुझ्या घरी यायचंय- मी केव्हाची वाट पाहते आहे' असं म्हणाल्या म्हणून त्यांना बोलावलं. खरं म्हणजे हा सगळा संसार-हे वैभव त्यांचंच. ही नकटी त्यांची. हेही त्यांचंच. मी वेडी आपली नुसती लग्नाची! पण कधी उतले नाही, मातले नाही. त्यांच्या लेकीला स्वत:च्या दुधावर वाढवलं-काही कमी पडू दिलं नाही-''

''मोठी आई'' मी हाक मारली अन् रडतरडत तिला मिठी मारली.

आम्ही सगळेच डोळे पुसत होतो. पण प्रथम थांबली मोठी आई. मला थोपटत थोपटत पपांना म्हणाली-

''बघा! हिचं प्रेम आहे माझ्यावर. तुमचं नाही.''

''बरं बुवा! नाही तर नाही. मला पपांबद्दल असं वाईट वाटलं. इतकं वाईट वाटलं! रागावूनच म्हटलं-

''असं काय ग मोठी आई. पपा-तुम्ही असं कसं ऐकून घेता? खरंच तुम्ही तरी कशाला आणलंत मोठ्या आईला परत?

''पण मोना, मी आणलं नाहीच रमाला.''

''मग कुणी आणलं?''

''मोना, तुझ्या आईनं-''

''हो?''

''ती शेवटी शेवटी म्हणायची-मी गेल्यावर तुम्ही मला हळूहळू विसरणार. काळ सगळ्यांना विसरायला लावतो. तेव्हा तुम्ही रमाला आणा. तिच्यामुळेच तुम्हाला भरभराट येईल. ती तुम्हाला सांभाळेल. मोनाला सांभाळेल अन् मलाही-विसरणार नाही. पण माझं नाव तिला सांगू नका. रमा यायची नाही. मला माहीत आहे ती यायची नाही. ऐकलं तर तुमचंच ऐकेल ती-''

''तिला माहीत नव्हतं. माझ्या सोन्याच्या मंगळसूत्रात या वाटीशेजारी ती बसली आहे ना या जिवतीच्या रूपानं!'' मोठी आई आपलं मंगळसूत्र चाचपत म्हणाली.

''पण काय हो! इतके दिवस का तिचं हे बोलणं गुप्त ठेवलंत माझ्यापासून?''


आईच्या फोटोकडे पाहत पाहत पपा म्हणाले-

''तिची शपथ होती रमा! पण आजचा दिवस तिचा आहे म्हणून मोडली ती!''

मोठी आई एकदम तोंड फिरवून आत गेली. पपाही बाल्कनीत गेले.

मी मात्र एकटी हॉलमध्ये उभी होते. हार घातलेल्या माझ्या आईकडे पाहत होते.

●



# रुक्मिणी

**जयवंत दळवी**

पुन्हा एकदा मन मोठे करायला पाहिजे. तिला पुन्हा एकदा हृदयाशी धरून सांगितले पाहिजे–बये, मनाविरुद्ध मुले झाली असतील! रूपसुद्धा माझे डावे असेल! मी जसे खूपसे पोटात घातले तसे तूही घाल. मला क्षमा कर. झाले गेले विसर आणि तुझ्या हातांनी मला कडकडून जवळ घे!

**विठ्ठलराव** ओट्यावर उभे होते. कंबरेवर हाताच्या मुठी टेकवून तब्बल अठ्ठावीस युगे उभे राहिल्यासारखे ते ताटकळून उभे होते. बराचसा वेळ तसाच गेला. पाहून पाहूनसुद्धा समोर काही दिसत नाही अशा नजरेने ते समोर पाहत होते. थोड्या वेळाने त्यांच्या लक्षात आले, आपण निष्कारण ताटकळलो आहोत. म्हणून त्यांनी कंबरेवरचे हात खाली सोडले, धोतराची कनवट सैल केली, निऱ्या हाती धरल्या, आणि घोतर घोळवून, पुढून पुनः पुन्हा उघडे करून मग त्यांनी कनवट घट्ट आवळली.

एकदम कुणाची तरी चाहूल वाजल्याचा त्यांना भास झाला. त्यांनी चोरट्या नजरेने इकडेतिकडे पाहिले. आसपास कुणी नव्हते. पण माधवचे पाय वाजले असावेत अशा कल्पनेने त्यांची छाती धडधडली. बराच वेळ छाती धडधडत राहिली. कारण, ओट्यावर, उघड्यावर उभे राहून असे धोतर उघडे करून पुनःपुन्हा कनवट घट्ट करण्याच्या त्यांच्या सवयीबद्दल माधवने त्यांना अनेकवार झाडले होते. खरोखरच माघव आला असता आणि त्याने ते पाहिले असते, तर त्याने पुन्हा एकदा निश्चितच फैर झाडली असती.

''तुम्हाला शरम नाही वाटत?'' तो एकदम वसकन् अंगावर यायचा.

''झालं काय?'' विठ्ठलराव ओशाळून विचारायचे.

''कसली सतरांदा कनवट आवळता? आणि धोतर सारखं करायचं असलं, तर आतल्या खोल्या ओस पडल्या आहेत! तिथं जाऊन कडमडा.''

''अरे पण...''

''पणबिण काही नाही. उघड्यावर हे चालायचं नाही. समोरून मोलकरीण जाते त्याचंसुद्धा तुम्हाला भान राहात नाही!

''अरे पण...''

विठ्ठलरावांना सरळ बोलणेसुद्धा कठीण होई. ते आतल्या आत तडकल्यासारखे होत.

मग काही न बोलता, दोनचार क्षण माधव तिरस्काराने, हेटाळणीने त्यांच्याकडे बघत गप्प उभा राही. त्यामुळे तर विठ्ठलरावांना मेल्याहून मेल्यासारखे होई. वाकडी मान करून ते नजर गेल्यासारखे समोर कुठेतरी बघत राहात. आगपेटी काढून आतल्या काडीने दात कोरू लागत आणि सुपारीचा तुकडा जिभेवर आला नसला तरी थूः थूः थूः करत वेड्यासारखे खांबलीला टेकत. मग एक तुसडा हुंकार टाकून माधव पाय आपटत निघून जाई.

क्षणभर विठ्ठलरावांनाही वाटे, ही सवय बरी नाही. पण ती सवय नक्की कशी लागली कोण जाणे! सवयीचे हे असेच. ती पक्की लागेपर्यंत काही कळत नाही. आणि कळते तेव्हा ती सवय सुटता सुटत नाही. ते पुनःपुन्हा निर्धार करीत– ही सवय मोडली पाहिजे. च्यामारी! धोतर सुटले तरी चालेल– आणि कशाला सुटते? नसती सवय लागली आहे झाले. कनवटीला पुनःपुन्हा हात म्हणून लावायचा नाही...

पण दुसऱ्या क्षणीच त्यांची मान ताठ व्हायची. त्यांना वाटायचे, हो, जडली ही सवय. ती माझी खाजगी बाब आहे. त्याच्याशी माधवला काय करायचे आहे? हा कालचा पोर स्वतःला समजतो तरी कोण? म्हणे, समोरून मोलकरीण जाते. जात असेल! मुद्दाम समोरून जा असे का मी सांगतो तिला? आणि नीतिमत्तेच्या गोष्टी या चोराने कसल्या सांगाव्यात मला? मग याने कसे त्या वासंतीशी लग्न ठरवले? परजातीतली पोर... कुळशीलाची चौकशी नाही. बापासारखा बाप जिवंत असूनसुद्धा त्याच्याकडे एका शब्दाने विचारणा नाही. डॉक्टर झाला म्हणजे काय जास्त अक्कल येते? मूर्ख लेकाचा... इडियट...

त्यांना पुन्हा धोतर सैल झाल्यासारखे वाटले. सावित्री अंगणातल्या दांडीवरचे वाळलेले कपडे काढून घड्या करीत होती. आता हिला का कुणी बोलावून आणली अंगणात? बोलूनचालून मोलकरीण ती. आपले काम करीत राहणार... त्यांनी कंबरेकडे गेलेले हात लक्षपूर्वक वर घेतले. मेजावरची आगपेटी उचलली. त्यातली एक काडी काढून दाताखाली चावली. आणि काडीच्या अणकुचीदार टोकाने ते दात कोरू लागले.

त्यांना एकदम खोकल्याची उबळ आली. आणि खोकता खोकता पोट हालल्यामुळे धोतराची कनवट बेंबीखाली घसरल्याचा त्यांना भास झाला. पण त्यांनी ती सोडून घट्ट केली नाही.

काही सुचेनासे झाले म्हणून ते ओट्यावर येरझारा घालू लागले. जांभई आली नव्हती, पण जांभई आल्यासारखे त्यांनी ताणून तोंड उघडले. आणि आपल्या उघड्या अंगावर त्यांनी हात आवळून घेतले. अंगावर घामाची लव उठली आहे याची त्यांना जाणीव झाली. अजून आपली छाती निष्कारण धडधडते आहे हे त्यांच्या लक्षात आले. तुका झाला सांडा... विटंबिती पोरें रांडा... येरझारा घालताघालता त्यांना एकाएकी भास झाला : भिंतीवरचा रुक्मिणीचा फोटो एकदोन दिवसांत कुणीतरी ओल्या फडक्याने पुसून चकचकीत केला होता–आणि खुद्द त्यांचा फोटोसुद्धा. तोही खूप दिवसांनी नवा दिसला.

मध्येच शतपावली थांबवून त्यांनी ध्यान एकाग्र केले. मान वाकवून कान दिला. आतल्या खोलीत गोष्टी चालल्या होत्या. पण त्यांना काही निश्चित असे ऐकू आले नाही. हे असेच चालले आहे. गेला आठवडाभर ही खलबते चालली आहेत – त्यांची सहा मुले आणि वसंतराव यांच्यात निश्चित काय शिजत होते त्याचा वास येत नव्हता. वसंतराव रुक्मिणीचे

थोरले बंधू. त्यांनी आपल्याला डावलून मुलांशी संगनमत करावे हे विठ्ठलरावांना आवडले नाही. वसंतराव येतात, माधव आणि इतर मुले आपल्या खोलीत चर्चा करतात. पण एकदाही या बाबतीत बापाचा सल्ला घ्यावा असे मुलांना वाटले नाही. मेहुण्याला विश्वासात घ्यावे असे वसंतरावांना वाटले नाही. एवढा समंजसपणा निदान वसंतरावांनी तरी दाखवायला हवा होता.

रुक्मिणी वेड्याच्या इस्पितळात गेल्यापासून आपण आयुष्याच्या बाहेर पडलो, आपल्याला काही जीवन उरलेले नाही अशी विठ्ठलरावांची भावना झाली. त्यांचे डोळे आतून चुरचुरू लागले. डोळ्यांच्या कडा तणतणत आहेत असे वाटले. गळा चिंबल्यासारखा झाला. आपण तेवढे ओट्यावर एकटे पडलो आहो, आणि बाकीची माणसे आतून कड्या लावून घरात मजा करत आहेत असे वाटून त्यांच्या मनात परकेपणा अंकुरला, चमत्कारिक अस्वस्थपणे त्यांना डोक्याचे खवले उडत आहेत असे वाटले. त्यांनी करकरा केस खाजवले आणि फावडे-खुरपे घेऊन ते अंगणात उतरले.

बागकाम करणे हा त्यांचा वेळ घालवण्याचा, मन गुंतवण्याचा एक आवडता छंद होता. ते स्वतःशी म्हणत, ही रोपटी बरी. त्यांना जीव तोडून वाढवा, हवा तसा आकार द्या, मनात आले तर फांद्या छाटा. बिचारी कसली म्हणून कुरकूर करणार नाहीत. मुले वाढविण्यापेक्षा ही रोपटी वाढविलेली बरी.

फावडे बाजूला ठेवून त्यांनी गुडघ्यावर धोतर ओढले. उकिडवे बसले, आणि खुरप्याने मुळातली माती सैल करत ते हळूहळू तण उपटू लागले. तेवढ्यात तेथे अरविंद आला. हा त्यांचा तिसरा मुलगा. त्याने झाडांवरचे बरेचसे गुलाब खुडले आणि तो क्षणभर तिथेच रेंगाळला.

''अरविंदा... रे अरविंद...'' त्यांनी हाक मारली.

''काय?''

''प्रभाकर कुठं गेलाय?''

'' पुण्याला-''

''का? सहज?''

अरविंद नीटसा काही बोलला नाही. तोंडातल्या तोंडात काहीतरी बोलला. पण विठ्ठलरावांना काही ऐकू आले नाही.

''काय म्हणालास?''

पण फुलांचा गुच्छ बांधत तो निघून गेला. काही बोललाच नाही. विठ्ठलरावांना संताप आला. त्यांचे सारे शरीर थरथरल्यासारखे झाले. या पोरांना लहानाची मोठी केली. तीळतीळ जीव तोडून त्यांचे संगोपन केले. पण आपल्या पायांवर उभी राहताच ताठ झाली साली! बापाची किंमत नाही. काय कमी केले या पोरांचे, म्हणून त्यांनी असा दुष्टावा करावा? असे वैऱ्यासारखे वागावे? आता घरातून तेवढे हाकलून द्या. तेवढेच बाकी राहिले आहे... दोन दिवसांपूर्वी प्रभाकर गाडी घेऊन गेलाय. पण जाताना शिंच्याने सांगितले नाही कुठे जातोय म्हणून! अरविंदाला विचारले, तर साल्याची दातखीळ बसली. माझ्यापासून कशाला लपवून ठेवायला पाहिजे? मी काय वैरी आहे?

कोयतीच्या टोकाने ते माती उकरत राहिले. त्यांना माहीत होते, आपली मुले रूपाने बरी नाहीत. रूपाने ती बापासारखी झाली. रुक्मिणीसारखी झाली असती, तर देखणी झाली असती. माधव हे पुनःपुन्हा म्हणून दाखवतो. इतर मुले स्वतःच्याच रूपाची मुद्दाम कुचेष्टा करतात. आता बापाचे रूप आले तर तो काय माझा दोष? माझ्या रूपाबद्दल मी काय माझ्या आई-वडिलांना शिव्या देत बसू? यायचे होते आईचे रूप घेऊन जन्माला! आणि बापाचे डोके सर्वांना आले त्याचे कोणी बोलत नाही. बापाचे डोके आले म्हणूनच ना चोरांनो, शिकलात? आईचे डोके आले असते, म्हणजे बसला असता वेड्याच्या इस्पितळात. आणि कसले रूप घेऊन बसलात? काय आहे एवढे रूपात? हृदय बघा... तोंड कसले बघायचे? म्हणे, माझ्या विद्रूप तोंडामुळे मुले विद्रूप झाली... कशाला विद्रूप होतील? आणि सारीच माणसे का सारखीच सुंदर असतात?

विठ्ठलरावांचे मन ताणू लागले. मनातल्या मनात बडबडता बडबडता ते आतून एकदम हालल्यासारखे झाले. खुरप्याने एकाच जागी आपण खूप खणले आणि खड्डा पाडला हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून गुडघ्यावर हाताचा भार टाकून ते तेथून उठले आणि दुसरीकडे गेले. एका कोपऱ्यात त्यांनी खड्डा खणायला सुरुवात केली. तिथे त्यांना पेरूचे रोप लावायचे होते. फावड्याने खड्डा खणत राहिले. वीत-दीड वीत खड्डा झाला नाही तोच त्यांना दम लागला. म्हणून थोडा वेळ ते खरस टाकत उभे राहिले. कंबरेवर एक हात आणि फावड्याच्या दांड्यावर दुसरा हात. उभ्या उभ्या त्यांना आठवण झाली, ती बाग रुक्मिणीने प्रथम लावली. दुपारतिपार ती सारखी बागेत खपायची. पण पुढे पुढे तिचे मस्तक फिरत गेले. दिवसातून पाचसात वेळा अंघोळ करायची आणि बागेत फावड्याने खड्डे खणायची. आणि मग...

विठ्ठलराव शून्य नजरेने समोर बघत राहिले... एकाएकी रुक्मिणीला असे वेड का लागावे? ते पुनःपुन्हा विचार करीत राहिले!

...नाही तरी रुक्मिणीचा स्वभाव विक्षिप्तच. एका पोराने तिला सपशेल फशी पाडले. पहिल्या फटक्याला अशी जबरदस्त ठेच बसल्यानंतर दुसरी बाई शहाणी झाली असती! पण रुक्मिणी वेडीच राहिली!... झाले गेले विसरलो आहे, तूही विसरून जा. मी तुला सुखी करीन. आपण सुखी होऊ! - अनेकदा तिला सांगून पाहिले. शेवटी सांगून सांगून मीच दमलो. मग हे पुनः पुन्हा सांगून तिला झाल्या प्रसंगाची आठवण करून देणे बरे नव्हे, असे वाटून मीच सारे विसरून गेलो. पण बहुधा ती विसरली नाही. आतल्या आत तिचा हट्ट चालूच होता.

झाले गेले पोटात घालून मी तिला हृदयाशी धरले. मनापासून प्रेम केले. माझ्या हृदयाचा मोठेपणा मी दाखवला. पण तिने कधी मनापासून साथ दिली नाही. ती खळखळून कधी हसली नाही. संसारात रुळली नाही, असे नाही. खूप मळली. माझ्या आवडीसारखे तिने जेवण केले. मला खरपूस चपात्या आवडतात म्हणून त्या ती करायची. सेथीची भाजी मला आवडते म्हणून तीही ती करायची. याच बागेच्या कोपऱ्यात तिने मेथी पेरली होती. मुले झाली. मुलांचेही तिने खूप केले. पण रमली नाही.

...कुठेतरी पाहत बसायची. तिचे डोळे हेलकावत राहायचे. कसल्यातरी स्वप्नात रमून जायची. डोळ्यांत खिन्नतेचे सावट असायचे... त्यामुळे मलाच चोरासारखे वाटायचे. तोच पोरगा तिच्या मनात आहे? की माझ्या रूपाचा डावेपणा तिला खुपतो आहे...? जीव कातावून जायचा...

मला मात्र तिच्या सौंदर्याने वेड लावले होते. वेडा होऊन तिला जवळ ओढावे तर ती शिळेसारखी थंड असायची. ओठ गार असायचे. तिच्या नाकावर नाक ठेवून तिच्या डोळ्यांत हावरटपणे पाहावे तर डोळे रिते दिसायचे. डोळ्यांतून नजर उडून गेलेली असायची. हिच्या हृदयात शिरायला आता आणखी काय करायला पाहिजे - असा वर्षोन् वर्षे विचार करता करता मन अक्षरशः पिंजून जायचे. मी थंड डोक्याचा म्हणून मला वेड लागले नाही.

तिला वेड लागले तेव्हा निदाने झाली. कुणी सांगितले, तिची एकामागून एक अशी सहा बाळंतपणे तिच्या मनाविरुद्ध झाली, म्हणून तिच्या मनावर परिणाम झाला... विठ्ठलरावांचे मन किसल्यासारखे झाले... बाळंतपणे एकामागोमाग झाली खरी. व्हायला नको होती, पण झाला मूर्खपणा. राहवले नाही. मलाच असे नाही. कुणीही रुक्मिणीचा नवरा झाला असता, तरी त्याला राहवले नसते. संयम हवा हे खरे! पण सांगणे जेवढे सोपे तेवढे तो ठेवणे सोपे नाही. विशेषतः रुक्मिणीच्या बाबतीत. तिचे नाक... तिचे डोळे... स्तन आणि मांड्या ... मुद्दाम खुणावणाऱ्या, खिजवणाऱ्या गोऱ्यापान गुबगुबीत मांड्या... त्यावर तिने चांद आणि चांदण्या गोंदवून घेतल्या होत्या. कुणी गोंदल्या ते सांगितले नाही - तरीसुद्धा मनावर ताबा ठेवायला हवा होता हे खरे! पण ते जमले नाही.

त्यांची कानशिले तापल्यासारखी झाली. पश्चात्तापाने मन पोळल्यासारखे झाले. खरस टाकण्याच्या निमित्ताने त्यांनी कितीदा तरी तोंडातून गरम वाफा टाकल्या. आणि ते स्वतःशीच म्हणाले, - पण म्हणून वेड लागतेच असे नाही. अठरा अठरा बाळंतपणे झालेल्या बाया माझ्या पाहण्यात आहेत. चांगल्या धडधाकट असतात. मग सहाच बाळंतपणांमुळे हिला वेड का लागावे?

तिच्या रूपाला साजेसा नवरा तिला मिळाला नाही म्हणूनही तिच्या मनावर परिणाम झाला असावा, असे एका डॉक्टराने सांगितले. डॉक्टर काही सांगतील ते खरे! पाच बोटे काय सारखी असतात? असते एखाद्याचे रूप डावे! म्हणून काय तेवढ्याने बायकोला वेड लागावे काहीच्या काही निदाने.

रूपाचे तेवढे बोलले गेले. पण रुक्मिणीचे लग्नाआधीचे प्रकरण मी उदार मनाने पोटात घातले त्याबद्दल मात्र कुठे कृतज्ञता नाही! ज्या खूबसुरत पोराशी ती नाचली त्यानेच शेवटी फसवलंन् ना? काय त्या रूपाची किंमत राहिली? काय चाटायचे आहे असले रूप? झाले गेले विसरून, मी तिला प्रेमाचा आधार दिला. ते कुठच्या कुठे गेले... आणि तो रूपवान भामटा पळाला तेव्हा बरे वेड लागले नाही!... पण त्यांच्या निदानांमुळे एक झाले. तिला वेड लागले त्याला मी कारण ठरलो.

डॉक्टरांनी निदाने करताना थोडी अक्कल दाखवायला हवी होती. या निदानामुळे पोटची सहा पोरे अकारण वैरी झालीत, याची त्यांना कल्पना नव्हती.. सुंदर आईला वेड्याच्या इस्पितळात मी पाठविले असा सर्वांनी ग्रह करून घेतला आणि त्यामुळे या भरल्या घरात मी तेवढा सर्वांना नकोसा झालो. घरातल्या घरात परका झालो. कुत्र्या-मांजराएवढीसुद्धा किंमत राहिली नाही या घरात - मीच खरा वेडा ठरलोय...

विठ्ठलराव पचकन थुंकले. धोतराचा सोगा सोडून त्यांनी तोंड पुसले. कनवट सोडून धोतर सारखे केले आणि पुन्हा फावडे घेऊन ते खड्डा खणत राहिले. फावड्याच्या शुभ्र गुळगुळीत दांड्यावरून हात फिरवताना त्यांच्या अंगातून कंप थरथरला. अंगात बळ आल्यासारखे वाटले. झपाझप फावडे मारून ते खोल खड्डा खणत राहिले.

''काय चाललंय, भाऊराव?'' वसंतरावांनी विचारले.

''खड्डा खणतोय!'' दातओठ चावत विठ्ठलरावांनी उत्तर दिले आणि ते तसेच जोरजोराने खड्डा खणू लागले.

''काय लावताय त्याच्यात?''

''मला पुरून घेतोय!''

विठ्ठलराव तिरस्काराने उद्गारले. त्यांना वाटले होते, वसंतराव म्हणतील, कशाला त्रागा करून घेताय भाऊराव? काय झाले एवढे?- आणि मग वसंतरावांना चार गोष्टी सुनावता येतील!... कुणाचे घोडे मारले मी या घरात? बायकोला वेड लागले त्याचे का मला दुःख नाही? गेल्या चारसहा दिवसांत घरात खलबते चालली आहेत, पण एका शब्दाने मला कोणी विचारले नाही. दोन दिवसांपूर्वी प्रभाकर मोटार घेऊन गेलाय. कुणाची मोटार ती? माझीच ना? पण विचारलंन मला? सांगितलंय मला, कुठे आणि का गेलाय ते? तुम्ही वसंतराव, तुम्ही माझे मेहुणे! पण कधी बोललात या बाबतीत माझ्याशी? काय मी अपराध केलाय? कुणाचा गुन्हा केलाय? बोला... बोला... आता का दातखीळ बसली?

पण नाही. तेवढासुद्धा योग नव्हता. 'मला पुरून घेतोय या खड्ड्यात!' असे म्हणताच वसंतराव माघारी फिरले, आणि तेथून डोळ्यांआड झाले. त्यांना बरे वाटले असेल. मी स्वतःला पुरून घेतले, तर तेवढीच कटकट गेली!

विठ्ठलराव आतल्या आत कुढत, तडफडत राहिले. बंद तोंडात जीभ तडतड उडू लागली. डोळ्यांत रक्त साकळले. जीव घुसमटल्यासारखा झाला.

इस्पितळात तिला वसंतराव भेटून येतात, मुले भेटून येतात. प्रभाकरसुद्धा तिलाच भेटायला गेला असला पाहिजे. मलाच तेवढी तिला भेटायची बंदी. गेली दहा वर्षे मी तिला भेटलेलो नाही. तिला पाहिलेली नाही. एकदासुद्धा तिचे डोळे पाहिले नाहीत, तिचे नाक पाहिले नाही. एकदाही तिच्या केसांतून हात फिरवता आला नाही. माझे भरलेले डोळे तिला दाखवता आले नाहीत. एवढे मी काय केले?

ते एकदम घळघळा रडू लागले.

या घरात कधी रडलो, तर नखाएवढीसुद्धा सहानुभूती नाही. उलट हा कालचा पोर माधव म्हणतो,

''आता कशाला रडतोय?''

का-का? मी रडलो तर तुझे काय जाते? रुक्मिणीसाठी रडतो मी. तुमच्यासाठी नाही. तुम्ही कर्मदरिद्री पोरे!

माझे वय झाले असेल! याही वयात लोक लग्न करतात. पण दुसरे लग्न करण्याचा विचारसुद्धा माझ्या मनात आला नाही. रुक्मिणीला भेटावे, तिला पाहावे, तिच्याशी चार घटका बोलत बसावे असे वाटले, तर त्यात काय चुकले? ...पण माझ्या मनाची कुणाला कल्पनाच नाही. मी दुःखी आहे याची कुणाला जाणीवच नाही. माझे अस्तित्वच सर्वांना बोचते आहे, खुपते आहे.

''भाऊराव-'' माधवने हाक मारली.

फावडे तिथेच टाकून भाऊरावांनी धोतराचा सोगा खाली सोडला आणि ते ओट्यावर आले, त्यांना दम लागला होता.

तिथे माधव बसला होता. बाजूला वसंतराव बसले होते. बाकीची चार मुले तिथे उभी होती. सर्व जण दबा धरून राहिले आहेत असा विठ्ठलरावांना भास झाला.

''काय म्हणतोस?''

त्यांनी भयभीत नजरेने सर्वांची तोंडे न्याहाळली.

''अंगात शर्ट घाला.'' माधव म्हणाला.

विठ्ठलरावांनी खुंटीवरला शर्ट अंगात चढवला.

''बसा इथं!''

विठ्ठलराव एका खुर्चीत बसले.

''भाऊराव, तुम्ही थोडे दिवस मामांच्या घरी मुक्काम करा!''

''वसंतरावाच्या घरी? विठ्ठलरावांच्या तोंडात जीभ सुकली.

''हो!''

''तुमची कसलीही अडचण व्हायची नाही तिथं!'' वसंतराव म्हणाले.

''पण का म्हणून?''

विठ्ठलरावांच्या आवाजात धार आली ती त्यांनाच जाणवली.

''आज संध्याकाळी आई येणार आहे!'' माधव म्हणाला.

विठ्ठलरावांनी प्राण जाण्यापूर्वी पाहावीत तशी गरीब नजरेने सर्वांची तोंडे पाहिली. त्यांच्या गळ्याकडले हाड आतून अडकल्यासारखे झाले.

''तुम्ही आत चला-''

माधवने आपल्या भावंडांना आत पिटाळले.

''प्रभाकर तिला आणायला गेलाय, संध्याकाळी येईल इथं.'' वसंतराव म्हणाले.

विठ्ठलराव उठले आणि धाडकन् खाली वाकून त्यांनी माधवाचे आणि वसंतरावांचे पाय धरले. एकदम हुंदका फोडून ते कळवळून रडले आणि चिंबलेल्या आवाजात म्हणाले,

''माधवा, वसंतराव, मी तुमच्या पाया पडतो. मला आता इथनं बाहेर काढू नका. गेली दहा वर्षं रुक्मिणीच्या आठवणीनं मी जळतो आहे. अरे, माझी बायको ती! मला डोळेभरून पाहू दे. माझ्यामुळे तिला वेड लागलं हे मनातून काढून टाका. माझं तिच्यावर अतोनात प्रेम आहे रे! माधवा, असा वैऱ्यासारखा वागू नकोस. मी या पडवीत राहीन. पण मला बाहेर काढू नकोस ..

माधव आणि वसंतराव सर्द झाले.

वसंतरावांचा गळा गहिवरून आला. त्यांच्या नाकपुड्या फुलू लागल्या. गळ्यावरल्या शिरा टवटवीत झाल्या. काहीएक न बोलता ते माधवाच्या तोंडाकडे पाहत राहिले. विठ्ठलरावांना उठवण्याचेही भान त्यांना राहिले नाही.

''असं काय करता भाऊराव?'' माधवाने त्यांना वर उठवले.

''मी तुमच्या पाया पडतो. माझ्या वयाची थोडी कदर ठेवा.''

विठ्ठलराव हात जोडून रडत राहिले. त्यांच्या डोळ्यांची बुबुळं लालभडक तापलेल्या गोळ्यांसारखी दिसत होती. नाकातून पाणी झिरपत होते. सारे अंग थरथरत होते.

''नाही-नाही. मी वसंतरावांच्या घरी जाणार नाही. हवं तर बागेत मला जिवंत पुरून टाका. पण या घरातून मी बाहेर पडणार नाही.''

बैठकीच्या गादीवर त्यांनी आपले अंग टाकले आणि वेड लागल्यासारखे ते त्या गादीवर लोळू लागले.

स्फुंदून स्फुंदून रडत लोळत राहिले.

''खड्डा खणलाय, मला पुरून टाका-'' असे ते परत परत

म्हणत राहिले. आणि मग जीव गेल्यासारखे तिथेच निश्चेष्ट पडून राहिले.

या अनपेक्षित प्रकाराने काय करावे ते माधवला सुचेनासे झाले. तो बराच वेळ खुंटासारखा तिथेच उभा राहिला.

''आई इथं आली म्हणजे तिला कसलाच त्रास होता नये!''

माधवने माघार घेत अट घातली.

''अरे, काय बोलतोस माधवा? मी तिला कधी कसला त्रास दिलाय? मी तिच्यासाठी काय काय पोटात गिळलंय ते तुला नाही माहीत. विचार या वसंतरावांना...''

वसंतरावांनी चटकन तोंड फिरवले.

''आई माडीवरच्या खोलीत राहील. तिथं कोणी फिरकायचं नाही. इस्पितळात जसा तिला एकांत मिळत होता तसा इथं मिळाला पाहिजे...''

''होय होय! ती बरी होऊ नये असं का मला वाटतं? अरे, तिला बरं वाटलं, तर माझ्यासारखा भाग्यवान दुसरा कुणी नाही. हे घर पुन्हा एकदा फुलून येईल. तुझं लग्न व्हायचं आहे. यजमानपण करायला आम्हाला किती आनंद होईल. तुझं ठरलंय ते कळवलंय तिला! मुलीला आणून तिच्या पायांवर घाल–''

ते तडक उठले आणि माडीवर गेले. तिथली खोली सजवलेली पाहून त्यांना आश्चर्य वाटले. पलंग सजवून ठेवला होता. पलंगावर शुभ्र सफेद चादर होती. बाजूला आरशाचे कपाट होते. एका स्टुलावर रहस्यकथांची पुस्तके होती. फ्लॉवरपॉटमध्ये गुलाबाच्या फुलांचा गुच्छ होता.

मागोमाग माधवही आला.

''हे सारं असंच असू द्या.'' तो म्हणाला.

''असू दे, असू दे! सारं तिच्या मनासारखं असू दे. पण हे आरशाचं कपाट खालून वर का आणलं?'' विठ्ठलराव म्हणाले.

''तिला आरसा हवा. इस्पितळात आरसा होता मोठा तिच्या खोलीत.''

''असू दे, असू दे!''

विठ्ठलराव पलंगावर वाकले आणि गादीवर हात फिरवीत त्यांनी चादरीच्या सुरकुत्या सरळ केल्या. चादरीच्या वासाने त्यांचे मन एकदम तरारल्यासारखे झाले.

''या एकावर एक दोन उशा कशाला? तिला उंच उशी चालत नाही!'' असे म्हणून त्यांनी वरची उशी बाजूला लावून ठेवली. बाजूची उशी पाहून त्यांचे मन हिंदकळून गेले.

''या रहस्यकथा वाचते ती?'' विठ्ठलरावांना आश्चर्य वाटले. गेल्या दहा वर्षांत तिने हा नवा छंद जडवून घेतला होता हे त्यांच्या लक्षात आले. त्यांना आश्चर्य वाटले.

धोतर नीट करून विठ्ठलराव खाली आले. त्यांनी स्वच्छ हातपाय धुतले. तोंड धुतले. आरशात पाहून केसांवर कंगवा ओढला. शर्टाला बटणे नव्हती, ती लावून ते ओट्यावर उभे राहिले. कुणीतरी मोठ्या असामीच्या स्वागताला उभे राहावे तसे ते उभे राहिले, पुनःपुन्हा त्यांनी शर्ट ताणून खाली ओढला. शर्टाच्या कॉलरीवर हाताची बोटे चेपली. ती येणार हे सकाळीच कळले असते, तर दाढी नीट केली असती, असा एक विचार त्यांच्या मनात येऊन गेला.

मध्येच ते आतल्या खोलीपाशी गेले, आणि हलक्या प्रेमळ आवाजात म्हणाले,

''मंदे, अग मंदे, तिला ओवाळायला हवं दारात. ताम्हन तयार ठेव.''

आपल्या आवाजात आज अचानक प्रेमळपणा आला आहे, याची त्यांना जाणीव झाली.

दिवेलागणीला फाटकाच्या दाराशी मोटार उभी राहिली.

त्यासरशी वसंतराव, माधव, अरविंद, मंदा सारी माणसे फाटकापाशी घोळका करून धावली. मंदेने पिठाचे गोळे ओवाळून टाकले. ताम्हनातले पाणी ओवाळून टाकले. माधवचा आणि मंदेचा हात धरून रुक्मिणी आत आली.

विठ्ठलराव पुतळा उभा केल्याप्रमाणे माडीच्या दारापाशी कोपऱ्यात उभे होते. त्यांनी घाबऱ्याघुबऱ्या नजरेने चोरून रुक्मिणीला पाहून घेतले. त्यांना अंतर्यामी आनंद झाला. हृदय उमळून गेले. त्यांना नवल वाटले. गेल्या दहा वर्षांत इस्पितळात राहूनसुद्धा तिची तब्येत बरी राहिली होती. उलट थोडी सुधारलीच होती. फक्त थोडा स्थूलपणा आला होता. आणि कानशिलांकडे केस थोडे पिकले होते. बाकी सारे अंग तुकतुकीत नि नितळ होते. डोळे होते तसेच. आणि नाकही! ... प्रवासाच्या त्रासाने तेवढी थोडी सुकली होती.

ओट्यावर येताच तिने आपल्या मुलांचे चेहरे न्याहाळले, ओळख नसल्यासारखी ती काही क्षण त्यांना पाहत राहिली. मग तिने सर्वांना पोटाशी घेतले आणि ती हसली.

विठ्ठलराव मात्र जिन्याच्या दारात होते तसेच ताठ उभे होते. मान वळवून सारे पाहत होते. त्यांचा गळा दाटून आला होता.

वसंतराव पुढे झाले. त्यांनी तिला कुशीत घेतले आणि गालावरून हात फिरवीत ते म्हणाले,

''बये, बरी राहा. मनाला त्रास करून घेऊ नकोस. माधवाचं लग्न आहे...''

पुढे त्यांना बोलता आले नाही.

''आई, थोडा वेळ तू माडीवर विश्रांती घे. मग बरं वाटलं, तर खाली ये. पण श्रम करू नकोस...'' माधव म्हणाला.

विठ्ठलरावांना आपल्या काळजातला धडधड आवाज ऐकू आला.

ती माडीवर जायला निघाली,

जिन्याच्या दारात खांब उभा केल्यासारखे विठ्ठलराव उभे

होते. कुणाशी ओळख नसल्यासारखे ते तिऱ्हाइतपणे उभे होते. चोरट्या नजरेने त्यांनी तिच्या डोळ्यांकडे पाहिले, तिने मान वर करून पाहिले नाही. ती एकदम खाली वाकली. आणि हात जोडून काकणाचा आवाज करीत तिने विठ्ठलरावांना नमस्कार केला. खुदकन् विठ्ठलरावांच्या गळ्यातून हुंदका फुटला. त्यांना वाटले, तिला जवळ ओढावी, कुशीत घ्यावी, तिचे केस कुरवाळावे... किमान खाली वाकून तिच्या हाताला स्पर्श करावा...

ती उठली आणि तडक जिना चढून वर गेली.

मागोमाग वसंतराव गेले. मुले गेली.

विठ्ठलराव डोळे पुसत तिथेच उभे राहिले.

नमस्कार करताना तिची काकणे खुळखुळ वाजली. त्या एका आवाजाने घरात जीव धुगधुगला असे त्यांना वाटले.

ओट्यावर कुणी नव्हते. त्यांनी एक खुर्ची उचलली आणि भिंतीपाशी ठेवली. ते खुर्चीवर चढले आणि अत्यंत भावनावेगाने त्यांनी रुक्मिणीच्या भिंतीवरल्या फोटोवर आपले ओठ टेकले. डोळे, नाक, गाल घासले. फोटोची काच ओली झाली.

थोड्या वेळाने वसंतराव खाली आले.

ते खाली येताच विठ्ठलराव लहान मुलासारखे त्यांच्याजवळ थांबले आणि म्हणाले,

''काय करते आहे?''

''बोलते आहे मुलांशी!''

विठ्ठलराव एकदम हसले.

''काय बोलते आहे?''

''माधवच्या बायकोची चौकशी करते आहे.''

'' तिला बोलावून आणायला हवी. वसंतराव, तुम्ही निरोप पाठवा तिकडे.'' विठ्ठलराव वसंतरावांचा हात दाबत म्हणाले.

''बोलावू-बोलावू!'' असे म्हणत वसंतराव आपल्या घरी गेले.

थोड्या वेळाने मुले खाली आली, त्यांच्या तोंडाकडे बघत विठ्ठलराव अर्भकासारखे हसले. मुलेही हसली, त्यांना धन्यता वाटली. आतून सुख झाले.

''काय करते आहे?''

''कपडे बदलते आहे.''

''विश्रांती घे म्हणावं-''

विठ्ठलराव चुटक्या वाजवत ओटीवर येरझारा घालू लागले, मुले आत गेली.

तेवढ्यात जिन्यावर पावलांची चाहूल वाजली.

विठ्ठलराव एकदम ताठ उभे राहिले,

रुक्मिणी शुभ्र सफेद नऊवारी पातळ नेसून खाली आली. त्यांना ती कितीतरी सुंदर दिसली. नजर भारल्यासारखी झाली.

ती समोरून जाता जाता ते म्हणाले,

''प्रवासाचा त्रास झाला?''

ती काही बोलली नाही. पण हसली. तेवढ्यानेसुद्धा विठ्ठलरावांचे मन फुलून गेले.

''तुझ्या बागेत फुलं फुललीत-'' ते पुन्हा म्हणाले.

बागेकडे बघत ती आत गेली. तिच्या गोऱ्या पोटऱ्या बघत ते तसेच उभे राहिले.

सातआठ दिवसांत घराचे स्वरूप पालटले. अन्नाची चव बदलली.

विठ्ठलरावांना दोन घास जास्त जाऊ लागले. त्यांच्या आवडीच्या खरपूस पोळ्या पानात पडू लागल्या. तिने मुद्दाम खरपूस केलेल्या पोळ्या त्यांच्या पानात टाकताच तिला ऐकू जाईल अशा आवाजात ते म्हणाले,

''दहा वर्षांत अशा पोळ्या मिळाल्या नव्हत्या!''

एखादी पोळी, दोन भजी ताटात ठेवून ते उठू लागले. मागाहून सुपारी घेण्याच्या निमित्ताने आत येऊन ते चोरून पाहू लागले. आपल्याच उष्ट्या ताटात ती जेवते हे पाहून त्यांना धन्यता वाटली. दहा वर्षे दुःख भोगले, कळ काढली, त्याचे शेवटी सार्थक झाले.

एकदा रात्री ते ओट्यावर आपल्या बिछान्यात बराच वेळ बसून राहिले. रुक्मिणी पाण्याचा तांब्या घेऊन माडीवर चालली होती. तिच्याकडे त्यांनी हसत हसत पाहिले. पण ती इकडेतिकडे न बघता तडक वर गेली. ते बिछान्यात आडवे झाले. पण त्यांना झोप येत नव्हती. गेले आठ दिवस ते धड झोपलेच नव्हते. पण आज तर त्यांची तळमळ विलक्षण वाढली. बराच वेळ ते बिछान्यात लोळत पडले. भिंतीवरल्या घड्याळाचे ठोके पडत होते. ते क्रमाक्रमाने मोजत ते तसेच लोळत होते.

सारी मुले आतल्या खोल्यात झोपली होती.

मध्यरात्र टळून गेली होती. सारे वातावरण खोल पाण्यासारखे थंड, स्तब्ध झाले होते.

तेवढ्यात माडीवर फुलपात्र पडल्याचा आवाज झाला. रुक्मिणी अजूनही जागी असावी, तीही आपल्यासारखीच तळमळत असेल का? तिला पश्चात्ताप होत असेल का? आपणहून मला वर बोलवायला ती लाजत असेल का? अनेक प्रश्न मनात येऊन ते तडफडले.

पुन्हा एकदा मन मोठे करायला पाहिजे. तिला पुन्हा एकदा हृदयाशी धरून सांगितले पाहिजे-बये, मनाविरुद्ध मुले झाली असतील! रूपसुद्धा माझे डावे असेल! मी जसे खूपसे पोटात घातले तसे तूही घाल. मला क्षमा कर. झाले गेले विसर आणि तुझ्या हातांनी मला कडकडून जवळ घे! ग्वाही देतो, जे झाले ते पुन्हा होणार नाही. उरल्यासुरल्या हयातीत तरी आपण सुखी होऊ... सुना यायच्या आहेत, जावई यायचा आहे... नातवंडे यायची आहेत... घर भरणार आहे... आपण सुखी होऊ!

ते बिछान्यातून उठले. त्यांची छाती कमालीची धडधडली. तळहातांना घाम फुटला. त्यांनी इकडेतिकडे चोरून पाहिले. सारे शांत होते. ते हळूच पुढे झाले. पाय न वाजवता माडीवर गेले. तिच्या खोलीत दिवा जळत होता. खोलीचा दरवाजा बंद होता. दोन्ही खिडक्या ओढून घेतल्या होत्या. खिडकीच्या फटीतून त्यांनी चोरून आत पाहिले. धडधडीमुळे छातीचा पडदा फाटेल की काय अशी त्यांना भीती वाटली. त्यांनी फटीला डोळा लावला. बिछान्यावर दोन रहस्यकथांची पुस्तके उघडी पडली होती. पण बिछान्यात रुक्मिणी नव्हती. त्यांना धक्का बसला. त्यांनी हळूच दार लोटले आणि मान वाकडी करून आत पाहिले.

आरशासमोर रुक्मिणी नग्न उभी होती. मांड्यांवरील चांद-चांदण्यांचे गोंदण पाहत होती.

विठ्ठलरावांची नस नि नस थरथरू लागली. कान तापले. डोळे आतून पेटू लागले, श्वास वाढला, नाकात उन्मादक गंध दरवळला. उभ्या अंगावर रवा फुलला. त्यांना स्थिर राहून पाहवेना. शांतपणे तिथे उभे राहवेना.

त्यांनी हळूच खिडकी लोटली आणि आपले कावरेबावरे तोंड आत खुपसले,

''बये, झालं गेलं विसर आणि मला जवळ घे. क्षमा-क्षमा-''

रुक्मिणी एकदम भयभीत झाल्यासारखी मोठ्याने किंचाळली आणि तिने झर्रकन पातळ अंगावर ओढले.

''बये, ओरडू नकोस. मी काही करीत नाही. मला जवळ धर मी नवरा तुझा - बये...''

ती किंचाळत राहिली.

''एकदाच! एकदाच, बये! मी जातो खाली... ओरडू नकोस...''

विठ्ठलराव झरझरा विरघळत गेले...

झपाझप पातळ अंगावर ओढत ती कासावीस होऊन हसल्यासारखी मोठ्याने ओरडली. ती मोठमोठ्याने हसते आहे की रडते आहे, हेच क्षणभर कळेना. तिचे विस्फारलेले डोळे गरगरा फिरत राहिले.

''जातो... जातो मी... ओरडू नकोस...''

ते दुभंगून गेले. त्यांनी झटकन् खिडकी ओढून घेतली. घामाघूम होऊन ते मागे फिरले. कुणाला कळण्याआधी बिछान्यात शिरावे म्हणून झपाट्याने जिना उतरू लागले.

जिन्याच्या पायऱ्या उतरता उतरता सहाही मुलांचा तांडा धावत जिना चढत होता.

''काय झालं? झालं काय आईचं?'' सारी मुले एकदमच ओरडली.

त्यांना काही ऐकूच गेले नाही. ते बिछान्यावर आडवे पडले.


''एवढ्यासाठीच मामांच्या घरी जाऊन राहा म्हणून सांगितलं होतं!'' वरून माधव ओरडला.

पण विठ्ठलरावांना काहीच ऐकू आले नाही. रुक्मिणीच्या किंकाळीमुळे अंगावर वीज पडल्यासारखे ते जळून-पोळून खाक झाले होते.

नकळतच ते बिछान्यात आडवे झाले, त्यांनी डोक्यावरून पांघरूण घेतले आणि माती ओढण्याची वाट पाहत खड्ड्यात पडून राहिल्यासारखे ते निश्चेष्ट पडून राहिले.

●



॥ग्रंथाली॥




**काळवेळ**

**स्टीफन परेरा**

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**



# तू तू मी मी

**वैशाली पंडित**

''अहो, आता नाही सहन होत. जीव उचलपाचल झालाय. ओलांडली की शहाऐंशी आता. झोपेतच पटदिशी दिवा विझावा आता.''

''दिवा काय विझतोय? स्वीच माझ्या हातात आहे बायको! आपली परवानगी नाही हां तुला एकटीला पाठवायला. मीपण लगेच हजर होणार बघ.''

''**मी** तुझ्याजवळ असताना तू विन्याकडे बघून हसायचं कारणच काय?''

''अहो, सहज हसले. तो हसला मग मी ओळखही दाखवू नको? काय तुम्हीपण! शेजारी तो आमचा.''

''ते शेजारीबिजारी मला नको सांगू. कोणाकडे बघून फी फी हसणं चालायचं नाही मला लग्नानंतर. मी म्हणजे मीच तुझ्यासाठी.''

''कळ्ळं. चला आता. एवढं नकोय फुगायला.''

✻ ✻ ✻

''हा हा हा! काय तूपण?... श्रीखंड आणि पाव? आमच्या घराण्यात नव्हतं खाल्लं कोणी! माझे मित्र तसलेच बिचारे म्हणून चार पुऱ्या आणि दहाबारा पाव श्रीखंडाबरोबर हादडलेत गपचूप. पण साले नंतर माझी खेचत राहतील आता.''

''झालं? संपलं बोलून? दोघं जण जेवायला येणार असं आधी कळवून आयत्यावेळी साताठ जणांची टोळधाड आमच्या घराण्यातही नव्हती पडली कधी. म्हणे बिचारे मित्र... हूं. पुऱ्यांची कणीक संपली मग मी काय करू? आणला ब्रेड शेजारच्या बेकरीतनं.''

''अंदाज! अंदाज हवा गृहिणीला परफेक्ट. आमच्या आईला बघ.''

''काही नकोय आईचं कौतुक एवढं. असं होतं तर त्यांच्याकडेच न्यायचं ना तुमच्या बिचाऱ्यांना.''

''हं! लग्न आपलं झालंय नवंनवं. आईचं झालंय का?''

''डोकं फिरवू नका फालतू बोलून. खरकटवाडा निस्तरू द्या आधी मला. मेलं मदत नाही काडीची नि बडबड किती?''

✻ ✻ ✻

''काय द्यावं तुला खायला तेच कळत नाही. कौतुकानं तुला आवडते म्हणून ओली भेळ आणली तर वासानंच धावलीस बेसीनपाशी. आमची आई नाही कधी अशी करत.''

''तरी म्हटलं आई कशी नाही आली अजून बाळाची? ही ही... हसवतपण नाही माझ्याच्यानं. मळमळतंय अजून. तुमची आई कशाला असं करील? तिला काय डोहाळे लागलेत?''

✻ ✻ ✻

''अहो, उठा. पिल्लूला धरा जरा. मी दूध गरम करून आणतेय. मांडीवर घ्या त्याला.''

''हूं.''

''अहो, काय हे? किती किंचाळतोय तो! घ्या ना त्याला. आई ग लेकरू लाल झालंय रडून.''

''हे काय मांडी हलवतोय मघापासून. तुटली मांडी माझी. तुझंच पोरगं ते. रडायचं माहित्ये थांबायचं माहीत नाही.''

''कर्म. नुसती रिकामी मांडी हलवताय. तो तसाच गादीवर रडतोय. झोप म्हणायची का काय ही? जर्रा म्हणून सांभाळता येत नाही पोराला.''

''पण त्याला तरी रात्रीचं दूध कशाला लागत असतं? चांगलं झोपावं नि दुसऱ्या दिवशी काय त्या बाटल्या दोन बाटल्या दूध हाणावं की. तूच सवयी लावून लाडावून ठेवलंस त्याला. आमची आई बघ.''

''झोपा आता गपचूप. तुमची आई उद्या बघते.''

✻ ✻ ✻

''असा कसा नाकात शेंगदाणा घातला पण? तुझं लक्ष कुठे होतं?''

''मी ना? खेळत बसले होते खेळत. समजलं? डोकं खाऊ नका. एक तर कामावाली आली नाही. दोन दिवसांची धुणीभांडी निस्तरतेय . तुम्हाला बोलायला काय?''

''कामं टाकून ऑफिसातनं धावत आलो. तू फोन केलास तसाच निघालो. साहेब बोंबलत असेल. काय काय उपद्व्याप करून ठेवतं...''

''होऽऽ पाठ झालंय. काय काय उपद्व्याप करतं 'माझं ' कार्टं, झालंस्तर तुमच्या आईनं कधी नाकात शेंगदाणा घातला नव्हता... सगळं पाठ झालंय माझं. तर आता काही खाताय का? घाईघाईत तसेच लंचअवरमध्ये आलात. गरम पिठलंभात वाढते.''

''वाढा. उपकार होतील. गिळतो आणि जातो.''

✻ ✻ ✻

''हे बघ. काही नकोय इंग्लीश मिडियम. शिवराय मराठी विद्यालयात नाव घालू. बारावीपर्यंत काळजी नाही. माझं शिक्षण तिथेच झालंय. शहरातली नंबर एकची शाळा आमची.''

''स्सूक... स्स्सूक... माझं कधी काही ऐकलंयत? माझ्या ताईची मुलगी इंग्लीश मिडियममध्ये शिकतेय. दादाचा ह्रतिकपण डॉन बास्कोत जातो. काय तोंड दाखवू माहेरी?''

''ती कौतुकं नको सांगूस. धड मराठी नव्हेत नि धड इंग्रजी नव्हेत तुझ्या माहेरची पोरं. भाराभर पैसा ओतावा लागतोय. मी काही एवढा लँडलार्ड नव्हे बाई..!''

✻ ✻ ✻

''मान खाली घालायची वेळ आणली या कार्ट्यानं. नुसता खेळ हवा खेळ. प्रगतिपुस्तकात जेमतेम काठावर नेहमी. तुझं लक्ष कुठे असतं?''

''माझाच उद्धार करा नेहमी. एकदिवस कधी अभ्यास घेतलात त्याचा? चुकून कधी घ्यायला सांगितला तर, या चिरंजीव, कितवीत आहात आपण? इथपासून सुरुवात. पहिल्याच गणितापासून त्या पोराला चापट्या सुरू. जर्रा म्हणून पेशन्स नाही. आणि खेळात अव्वल आहे तो. शाळेला

एकट्यानं ट्रॉफ्या मिळवून दिल्यात.''

''काय ते दिवे लावू दे एकदाचे खेळात तरी.''

✻ ✻ ✻

''दृष्टच काढायला हवी पठ्ठ्याची. खेळाच्या सर्टिफिकेटांवर केवढा मोठ्ठा जाब चालून आलाय! बघितलं का बायको, कसा आहे माझा लेक?''

''तर! बघितला हो बघितला. आताच झालाय तो तुम्हाला. मला एकटीला कधीचाच झाला होता.''

✻ ✻ ✻

''सूनबाई म्हणतायत, आईबाबा इकडेच या आता. काय करू या हो?''

''चल ग. महिन्याभारासाठी परक्या प्रदेशात जाणं वेगळं नि कायमसाठी वेगळं. एवढ्यात तिथे जाऊन करायचं काय? टाळ्या वाजवत बसायचं?''

''होऽऽ तुमचे टोळभैरव इथ्थेचेत ना सगळे. त्यांच्यात बसून ह्या ह्या करायची सवय झालेली! तुम्हाला काय चैन पडणाराय तिथे?''

''तू जा ना एकटी. तुला अडवतोय मी? हां तेवढी रोज तुझ्याहातची आमटी आणि लुसलुशा पोळ्या पार्सल कर रोज म्हणजे झालं.''

''कळलं. म्हणजे मी जाऊ नको. मेली कळतात नाटकं. माझाही एकटीचा जीव राहवेल तेव्हा ना!''

''मग?आता कसं? ते बघ आपलं नंगुडं नातवंड कशं लांगत लांगत आलं ते! झ्याली का झ्योपी शोनू? चला. शोनूऽऽ चला चला फिलायला. आज्जीला म्हनावं नंगू नको, कपले घाला. फिलायला ज्यायच्यंय...

''श्शू.. इस्स.. हळू बोला की. आजीला म्हणावं काय आजीला म्हणावं? कोणी ऐकलं तर काय समज होईल?''

''हा हा हा...''

✻ ✻ ✻

''अहो, आता नाही सहन होत. जीव उचलपाचल झालाय. ओलांडली की शहाऐंशी आता. झोपेतच पटदिशी दिवा विझावा आता.''

''दिवा काय विझतोय? स्वीच माझ्या हातात आहे बायको! आपली परवानगी नाही हां तुला एकटीला पाठवायला. मीपण लगेच हजर होणार बघ.''

''तिथ्थेसुद्धा सोडू नका मला... आई गं.''

''थांब.. मी पाजतो तुला औषध. पाण्याचा घोट घे जरा. आणि ये. थोपटतो तुला. झोप लागेल शांत.''

''तुमची बीपीची गोळी घेतलीत? असं कसं विसरता हो?''

''तुझी ही दटावणी ऐकावीशी वाटते गं मला. विसरल्याचं नाटक करतो मी.''

''अहोऽऽऽ''

''हं...''


''????''

''!!!!''

**– वैशाली पंडित**

भ्रमणध्वनी : ९४२२०४३०२५


ग्रंथाली




# तिसरा पंच

**सॅबी परेरा**

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**



# बर्फातल्या बॅलेरिना

**भाग्यश्री परांजपे**

एके दिवशी कोकोला फारसे काम नव्हते म्हणून ती जरा लवकरच घरी आली. शिनजी त्या दिवशी घरीच होता आणि बेडरूमचे दार त्याने आतून बंद केले होते. अशा वेळी त्याचा एकांत भंग करायचा नाही हे तिला चांगलेच माहीत होते. म्हणून ती बाहेरच थांबली. तिची चाहूल लागली तसा शिनजी घाईघाईने बाहेर आला आणि मासेमारीसाठी नदीवर जायचेय असे सांगून निघाला.

**थंडी** असह्य झाली तसा कोकोने तिचा मफलर गळ्याभोवती नीट गुंडाळून घेतला आणि कानटोपी डोक्यावरून पुढे, कपाळ झाकेल अशा बेताने ओढून घेतली. हातमोजांच्या आतले तिचे हात तिच्या नशिबासारखेच गारठले होते. ते एकमेकांवर घासून तिने त्यांना ऊब आणण्याचा प्रयत्न केला आणि कॅमेरा नीट सरसावून ती जराशी उंचावर, झाडीच्या मागे दडून बसली. इथून तिला समोरचे बर्फाच्छादित माळरान, त्याजवळची गोठलेली नदी आणि आजूबाजूची उंच झाडं स्पष्ट दिसत होती. त्सुरूंचा थवा आकाशातून उडत येऊन बर्फावर अलगद उतरत असतानाचे फोटो तिला आज घ्यायचे होते. तिच्या नोकरीचा एक भाग होता तो.

दर हिवाळ्यात कुशिरो गावात मोठ्या संख्येने सारस अथवा स्थानिक लोकांच्या भाषेत त्सुरू पक्षी राहायला येत. जपानमध्ये त्यांना फारच मान होता. दोनेकशे वर्षांपूर्वी जंगलतोडीमुळे त्यांचे अधिवास उद्ध्वस्त होऊन त्यांची संख्या नगण्य झाली होती. इतकी की ते नामशेषच झाले असावेत असे लोकांना वाटू लागले. पण एका हिवाळ्यात कुशिरोतल्या एका शेतकऱ्याला त्याच्या मक्याच्या कोठाराजवळ खुडबुड ऐकू आली. बाहेर बर्फाचे वादळ सुरू असल्याने त्याने प्रथम तिकडे दुर्लक्ष केले, पण मग तो कोठाराची पाहणी करायला बाहेर पडला. थोडेसे रोडावलेले त्सुरू कोठारापाशी सांडलेले मक्याचे दाणे टिपण्याच्या प्रयत्नात असलेले त्याला दिसले. कोठार उघडून त्याने त्यांना भरपूर धान्य टाकले. पूर्ण हिवाळाभर हा कार्यक्रम सुरू राहिला आणि पुढच्या वेळी ते पक्षी परत आले तेव्हा त्यांच्याबरोबर काही पिल्लेही होती. हिवाळ्यात या पक्ष्यांना जगण्यासाठी खाद्य मिळवणे कठीण जातेय हे गावकऱ्यांच्या लक्षात आले. मग त्या शेतकऱ्याच्या शेतातच त्सुरू पक्ष्यांसाठी एक अधिवास निर्माण करण्यात आला आणि भोवतालचा निसर्ग त्यांना पूरक होईल अशा तऱ्हेने जोपासण्यात आला. हळूहळू कुशिरोतला हा अधिवास आणि तिथले त्सुरु जगप्रसिद्ध झाले, आणि दर हिवाळ्यात साऱ्या जगातले पक्षीप्रेमी त्याला भेट देऊ लागले.

कोको कुशिरोतच लहानाची मोठी झाली होती. काट्याकुट्यात उगवलेल्या एखाद्या कोवळ्या झाडाकडे सगळ्यांचे दुर्लक्ष होऊन ते खुरटेच राहावे तशी. ती बाळ असतानाच तिचे वडील तिला आणि तिच्या आईला सोडून गेले. मूळच्या सधन घराण्यातल्या पण कमी शिकलेल्या तिच्या आईवर मग हलकीसलकी कामे करण्याची पाळी आली. लहानग्या कोकोवर चिडत, आपल्या प्रियकराला शिव्याशाप देत तिने काही वर्षे जिवापाड कष्ट ओढले आणि शेवटी ते असह्य होऊन ती दारूच्या आहारी गेली. त्या दरम्यान तिच्या पायाला कसलीशी इजा झाली आणि तीवर वेळेत उपचार होऊ न शकल्याने त्यात कायमचे व्यंग राहून गेले. तिच्या आईचा दारूच्या व्यसनातच प्रचंड यातनामय अंत झाला आणि कोकोला एका दरिद्री अनाथालयात भरती व्हावे लागले. तिथल्या बाकीच्या मुला-मुलींसारखी ती भरभर चालू किंवा धावू शकत नसे, मग बर्फावर स्केटिंग करणे आणि नृत्य करणे तर दूरच राहिले. लंगडी, हळूबाई असे टोमणे तिला कायम ऐकावे लागत. ते टाळण्यासाठी तिने चित्रे काढणे, पुस्तके वाचणे असे एकट्याने करता येण्यासारखे छंद सुरु केले.

ती दहा वर्षांची होती तेव्हा तिला अनाथालयाच्या लायब्ररीत त्सुरू पक्ष्यांवर लिहिलेले एक जीर्ण पुस्तक सापडले. त्यात त्यांच्याबद्दल अनेक आख्यायिका होत्या. त्सुरू अमर असतात. ते हजारो वर्षे जगतात. भव्यता, उदात्तता, सौंदर्य आणि जिद्द यांचे ते जणू प्रतीकच. त्यांचे दर्शन झाल्यास नशीब फळफळल्याशिवाय राहत नाही. त्यांना दुखावले, तर त्याची शिक्षा मिळते. पण, त्यांच्यावर कोणी उपकार केले, तर ते त्या उपकारांची शतपटीने परतफेड करतात. त्सुरू आयुष्यभर एकच जोडीदार करतात, आणि त्या जोडीदाराबरोबर ते बर्फावर बहारदार नृत्य करतात - एक ना दोन. कोको त्या सगळ्या गोष्टींनी चांगलीच प्रभावित झाली. त्सुरू हाच तिच्या आयुष्यातला एकमेव विरंगुळा झाला. हिवाळा आला, की त्सुरूंचा थवा आकाशात उडताना दिसावा म्हणून ती भरथंडीत अनाथालयाच्या अंगणात तासन्‌तास रेंगाळे. हिवाळा संपला आणि त्सुरू दुसरीकडे गेले की कोको त्या पुस्तकाची पारायणे करे, आणि त्यातले फोटो बघून त्सुरूंची रेखाटने करे. हळूहळू त्सुरूच तिचे जवळचे मित्र आणि नातेवाईक झाले. ती सतत त्यांच्याशी बोले. तिला काही हवे असले, किंवा तिच्या मनाला काही दुःख झाले ती चित्रातल्या त्सुरूंनाच सांगे.

कोको साधारण पंधरा वर्षांची झाली तेव्हा अनाथालयाकडून तिच्या वयाच्या मुला-मुलींना मिळेल त्या छोट्या-मोठ्या कामांवर पाठवण्यात येई तसे तिलाही पाठवण्यात येऊ लागले. सगळ्यांना नको असलेली घाणेरडी कामे तिच्या वाट्याला येत, आणि बाकीचेही त्यांची कामे बिनदिक्कत तिच्यावर टाकत. खूप सोसल्यावर होतो तसा निर्विकार चेहरा घेऊन ती सगळी कामे विनातक्रार करे आणि कौतुकाचा एखादा तरी शब्द ऐकू यावा म्हणून मनातून तडफडे. पण ती जिथे जाई तिथे तिच्या वाट्याला फक्त थट्टा आणि उपेक्षा येई. ती एखाद्या फर्निचरचा निर्जीव भाग असल्याप्रमाणेच लोक तिच्याकडे दुर्लक्ष करत. कदाचित यात कधीच काही बदल झाला नसता आणि हे सगळे असेच राहिले असते. परंतु एक दिवस तिला त्सुरूंच्या अधिवासात कामाला पाठवण्यात आले आणि त्सुरूंची घाण

काढून ते वावरतात तो भाग स्वच्छ करण्याचे काम तिच्यावर टाकण्यात आले.

त्या दिवशी कोकोने प्रथमच त्सुरूंना अगदी जवळून पाहिले. ते माणसांइतकेच उंच होते आणि काळ्या शिडशिडीत पायांवर डौलदारपणे चालत होते. लांब काळी-पांढरी मान, डोक्यावरचा लाल मुकुटासारखा भाग, पांढऱ्याशुभ्र पंखांना खालच्या बाजूला असलेली झुळझुळीत काळ्या पिसांची झालर......खरोखर, असे देखणे पक्षी कुठेच नसतील, तिच्या मनात आले. ती फाटक उघडून त्यांच्या कुंपणात गेली तशी सारे पक्षी जागच्या जागी थबकले आणि कोणीतरी आदेश द्यावा तसे माना वळवून तिच्याकडे बघू लागले. त्यांचा किलबिलाट थांबला आणि भोवताली जाणवण्याइतकी शांतता पसरली. मग त्यातला सर्वात उंच-वयस्क भासणारा पक्षी हळूहळू पावले टाकत कोकोच्या समोर आला आणि त्याचे भलेथोरले सात फुटी पंख पसरून उभा राहिला. एखादा नवखा माणूस असता तर चांगलाच बिचकला असता. कोको न घाबरता बिनधास्त पुढे झाली आणि तिने नम्रपणे वाकून त्या पक्ष्याला अभिवादन केले.

नमस्कार. कसे आहात बाबा? बरे आहात ना? मी हा भाग आता अगदी स्वच्छ करणार आहे. तोपर्यंत तुम्ही सगळे थोडा वेळ त्या कोपऱ्यात उभे राहाल का? आपल्या जवळच्या नातेवाईकांशी गप्पा कराव्या तशा थाटात ती म्हणाली.

आणि काय आश्चर्य! तिचे बोलणे कळल्याप्रमाणे सगळे पक्षी दूर कोपऱ्यात जाऊन उभे राहिले. मग कोकोने भराभर त्यांची वावरण्याची जागा अगदी लख्ख केली आणि जाताना परत सगळ्यांना वाकून अभिवादन केले. त्या रात्री त्सुरूंना भेटल्याच्या अत्यानंदात तिला झोपच लागली नाही.

कसा कोण जाणे, पण दुसऱ्या दिवशी पहाटेच त्सुरूंना खाणे देणारा माणूस अचानक खूप आजारी पडला. नाइलाजाने कोकोला परत त्यांच्या अधिवासाकडून बोलावणे आले. सगळ्या पक्ष्यांना प्रेमाने चुचकारत, त्यांच्या पिल्लांना हलकेच गोंजारत तिने त्यांना खायला घातले. असे वारंवार होऊ लागले. एव्हाना कोकोला पक्षी काही त्रास देत नाहीत, त्यांच्या पिल्लांनाही ती बिनदिक्कतपणे हात लावते, सांगितलेली सगळी कामे - त्सुरू पक्ष्यांना खाद्य टाकणे, त्यांची मोजदाद करणे, अधिवासाच्या वेबसाईटसाठी त्यांचे फोटो काढणे, कार्यालयाचा हिशोब बघणे अशी एक किंवा अनेक कामे ती लीलया करू शकते हे व्यवस्थापकांच्या लक्षात आलेले होते. मग दोन-तीन वर्षे काम केल्यानंतर त्यांनी तिला तिथेच तुटपुंज्या पगाराची का होईना, पण नोकरी दिली.

अठरा वर्षांच्या कोकोचे बरेचसे प्रश्न आता मिटले होते. खरे तर लोकांची तिच्याशी असलेली वागणूक फारशी बदलली नव्हती. पण एक काळकोठडी भासावी अशी कळकट, प्रकाशहीन खोली तिने भाड्याने घेतली होती. पूर्वी गावातल्या बेकरीसमोरून जाताना येणारा खमंग दरवळ ती खोलवर श्वास घेऊन छातीत भरून घेत असे आणि केक खाल्ल्याची कल्पना करत असे. आता तो केक विकत घेऊन प्रत्यक्षात खाणे तिला कधीमधी परवडू लागले. तसे तर अनेक लहानसहान आनंद तिला मिळत होते, पण अर्थातच सर्वात मोठा आनंद त्सुरूंजवळ वावरण्याचा, आणि त्यांच्याशी बोलता येण्याचा होता. त्सुरूंना तिचे बोलणे समजते यावर तिचा ठाम विश्वास होता. जगाला भारून टाकणारे त्यांचे प्रियाराधनाचे नृत्यही त्यांनी तिला, खास एकटीला कितीतरी वेळा करून दाखवले होते. प्रेम असावे तर असे असावे आणि जोडीदार असावा तर त्सुरू पक्ष्यासारखा एकनिष्ठ असे तिला वाटे. आणि त्यांच्यासारखे नृत्य करता आले असते तर....

बरोब्बर ठरलेल्या वेळी दूर क्षितिजावर पांढरे ठिपके दिसू लागले. हळूहळू त्यांना चित्रात दाखवतात त्याप्रमाणे इंग्रजी 'व्ही' अक्षराचा आकार आला आणि त्याबरोबरच त्सुरूंचा विशिष्ट कलकलाट ऐकू येऊ लागला. निळ्याभोर आभाळात उडणारे ते राजसी पक्षी आता स्पष्ट दिसू लागले. जमीन जवळ येऊ लागली तसे त्यांनी उडण्याचा वेग कमी केला आणि त्यांचे लांबलचक, शुभ्रधवल पंख खाली-वर करत ते जणू तरंगू लागले. सरतेशेवटी पोटाशी घेतलेले लांब पाय त्यांनी सरळ केले व डौलदारपणे हलकेच ते टेकवत त्यांचा थवा बर्फावर उतरता झाला. तो क्षण नेमका साधत कोकोने भराभर त्यांचे अनेक फोटो टिपले.

थवा उतरल्यावर त्यातला एक पक्षी चांगलाच लंगडतोय हे कोकोच्या अनुभवी डोळ्यांना लगेच दिसले. हातात थोडेसे धान्य घेऊन ती त्याच्याजवळ गेली. त्याला चुचकारत तिने त्याच्या पायाची तपासणी केली. कुठल्याशा तीक्ष्ण वस्तूने त्याच्या पायावर चांगलीच जखम झाली होती. कोकोने अधिवासाच्या पशुवैद्याच्या नजरेस ती गोष्ट आणून दिली आणि त्या पक्ष्याच्या जखमेवर वेळीच उपचार झाले. पूर्ण हिवाळा लागला त्याचा पाय बरा व्हायला. हा सगळा वेळ कोकोनेच त्याची देखभाल केली. त्याला ती निवडक मासे खायला आणून देई आणि त्याच्याबरोबर हळूहळू चालत गप्पा मारत असे. त्याचे नाव तिने त्सुयोई ठेवले.

मित्रा त्सुयोई, तुझ्या पायावर वेळीच उपचार झाले हे बरे झाले ना? नाहीतर माझ्याकडे बघ, काय अवस्था आहे माझ्या पायाची ती. मला भरभर चालता येत नाही, धावताही येत नाही मग नाच करता येणे तर दूरच. सगळे हसतात मला. पण तुझ्या बाबतीत ती काळजी नाही. लवकरच तू पूर्ण बरा होशील, आणि या निळ्या आकाशात स्वच्छंद भरारशील. एक सुंदरशी बायको मिळेल तुला आणि सुरेखसे नृत्य कराल दोघे. आणि मग मी खूप खूप आनंदाने ते बघेन. पण माझ्या नशिबात

काय लिहिलेय कोणास ठाऊक रे .... माझ्याशी कोण लग्न करणार? नाही का? मला तुझ्यासारखे पंख नसल्याने मी उडूपण शकणार नाही. बहुधा मी अशीच कष्ट करत माझ्या अंधाऱ्या काळकोठडीत दिवस घालवणार आणि एक दिवस मरणार. हे असेच आणि बरेच काही, मनात जे येईल ते ती त्याच्याशी बोले. आणि तो तरणाबांड, देखणा पक्षी जणू काही लक्ष देऊन, एकटक तिच्याकडे बघत ते ऐके. ज्या दिवशी त्याचा पाय पूर्ण बरा झाला त्या दिवशी कोकोने त्याला आनंदाने मिठी मारली आणि तिच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले.

'तू बरा झालास! तू माझ्यासारखा लंगडणार नाहीस!!' असे पुन्हा पुन्हा ती त्याला म्हणत राहिली.

हिवाळा संपल्यावर काही त्सुरू पक्षी परत गेले. त्यात कोकोचा आवडता त्सुयोईही होता. सगळे पक्षी अधिवासात कायम राहत नसत हे कोकोला ठाऊक होते, तरीही ती अत्यंत उदास झाली. अन् ध्यानीमनी नसताना एक दिवस एक चमत्कार घडला. तिचा कुठलासा, तिला माहिती नसलेला मामा निपुत्रिक वारला आणि तिच्यासाठी बरेचसे पैसे ठेवून गेला. त्या पैशांतून तिने एक लहानसे घर घेतले. त्सुयोईची आणि इतर त्सुरूंची अनेक चित्रे तिने काढली होती. ती तिने नवीन घराच्या भिंतींवर लावली. आता कोकोला कसलीच चिंता नव्हती पण त्सुरूंच्या अधिवासातले काम तिने सोडले नाही. पुढच्या हिवाळ्यात त्सुयोई नक्की येईल या आशेवर ती दिवस काढत होती.

हिवाळा आला तोच बर्फाचे भयंकर वादळ घेऊन. त्या दिवशी अख्ख्या गावात सगळे काही बंद असल्याने कामावर जाण्याचा प्रश्नच नव्हता. कोको न्यहारीसाठी काही गरमागरम बनवण्याच्या विचारात होती तोच तिच्या घराचे दार कोणीतरी जोरात ठोठावले. दारात एक तरुण पुरुष कुडकुडत उभा होता.

माफ करा. मी आजच या गावी त्सुरू पक्ष्यांचे निरीक्षण करायला आलो आणि नेमका वादळात सापडलो. गावात सर्व काही बंद आहे. थोडा वेळ तुम्ही मला आसरा देणार का? अजीजीच्या स्वरात तो बोलता झाला.

या की. आधी पायात या गरम स्लीपर घाला, आणि मग हीटरजवळ बसा. जराशी ऊब येईल तुम्हाला, तोपर्यंत मी काहीतरी गरमागरम न्याहारी करून आणते. सुस्वभावी कोको नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता.

तो तरुण आत आला आणि त्याने त्याचा ओलेता काळा कोट आणि लोकरीची लाल टोपी दारालगतच्या स्टॅण्डवर नीट अडकवून ठेवली. शेकोटीजवळच्या खुर्चीत तो बसला तेव्हा तो चांगलाच दणकट आणि उंचनिंच असल्याचे कोकोच्या लक्षात आले. न्याहारी करताना त्याने कोकोला त्याचे नाव शिनजी असल्याचे सांगितले. त्याचा व त्याच्या परिवाराचा मासेमारीचा व्यवसाय होता. त्याला त्सुरू पक्ष्यांचे लहानपणापासून आकर्षण असल्याने तो कुशिरोत आला होता. हिवाळा संपेपर्यंत राहण्याचा त्याचा मानस होता. कोकोने काढलेल्या चित्रांचे त्याने खूप कौतुक केले. तिचे त्सुरूंबद्दलचे प्रेम व ज्ञान ऐकून तो चांगलाच प्रभावित झाला आणि पक्षिनिरीक्षणासाठी सोबत करण्याची त्याने कोकोला आदराने विनंती केली. कोकोने अर्थातच ती मान्य केली. दोघेही वारंवार भेटू लागले. काही दिवसांतच शिनजी अत्यंत सभ्य आणि सुसंस्कृत असल्याचे कोकोच्या ध्यानात आले. इतरांप्रमाणे तो तिची हेटाळणी करत नसे आणि तिचे बोलणे अगदी लक्ष देऊन ऐकत असे. शिवाय दोघांच्याही आवडीचा विषयही एकच होता – त्सुरू पक्षी.

आणि मग ती संध्याकाळ उगवली. सहज बोलण्याच्या ओघात शिनजी वॉल्ट्झ नृत्यात चांगलाच कुशल आहे हे कोकोला कळले.

''मलापण नृत्य करायला खूप, खूप आवडले असते... पण माझ्या पायामुळे मला ते कधीच जमणार नाही. दुसऱ्यांचे नृत्य बघूनच मी आनंदी होते.'' कोकोच्या आवाजातली खिन्नता तिला लपवता आली नाही.

''माझे पाय वापरून तू चांगले नृत्य करू शकशील. कसे ते मी शिकवू तुला?'' शिनजी अगदी मृदू स्वरात म्हणाला.

''माझी थट्टा तर करत नाहीयेस ना तू?'' कोको चांगलीच साशंक झाली.

शिनजी उठून उभा राहिला, ''असली थट्टा मी करेन असे तुला वाटले तरी कसे?''

रेकॉर्डप्लेयरवर कुठलेसे जीवघेणे संगीत लावून तो कोकोसमोर दोन्ही पाय जुळवून उभा राहिला. मग त्याने वाकून तिला अभिवादन केले आणि डावा हात डौलदारपणे लांबवून तिच्यासमोर धरला. कोकोही उठली आणि त्याच्या निमुळत्या बोटात तिने तिची बोटे गुंतवली. मग त्याच्या डाव्या पायाच्या भक्कम पावलावर त्याने कोकोला तिचे अधू उजवे पाऊल ठेवायला सांगितले आणि तो आधार घेऊन पावले जोडीने कशी टाकावी हे तिला शिकवू लागला. बहुधा तोच क्षण असावा जेव्हा कोकोला कळले की तिचे शिनजीवर प्रेम आहे व ती त्याच्याशिवाय जगू शकणारच नाही. ती जराशी अडखळली.

''पाय नीट टाक कोको. मी तुला फक्त नृत्य शिकवतोय. जे शक्य नाही त्याचा विचार करू नकोस.'' तिच्या मनातले समजल्याप्रमाणे तो बोलला.

''मनकवडा आहेस. खरं सांग, प्रेमात पडणे चुकीचे आहे का?''

''मुळीच नाही. माझेही तुझ्यावर प्रेम जडलेय हे मी नाकारणार नाही. पण फायदा काय?''

''मी आयुष्यभर तुझी साथ देईन याची मला खात्री आहे. तुला?'' डोळ्यात प्राण आणून कोको विचारती झाली.

''स्पष्टच सांगतो, मला कशाचीच खात्री देता नाही येणार.''

''म्हणजे? तुझ्या आयुष्यात कुणी स्त्री आहे का आधीपासून??''

''मुळीच नाही. ते तसले काम माणसे, आय मिन वेगळ्या तऱ्हेची माणसे करतात. मी त्यातला नाही. मात्र मी कधीच तुझ्याशी लग्न करू शकणार नाही. आपल्या दोघांची विश्वं फारच वेगळी आहेत.''

''मी अनाथ, गरीब आणि लंगडी आहे म्हणूनच ना?'' कोकोच्या डोळ्यांत टचकन पाणी आले.

''वेडीच आहेस.'ा सगळ्याला मी जराही महत्त्व देत नाही. माझ्या दृष्टीनं तू अत्यंत सुंदर आहेस, परिपूर्ण आहेस.'' कोकोच्या डोळ्यांतले पाणी अलगद पुसत तो म्हणाला.

''मग का? का शिनजी, का?'' कोकोने विचारले.

''ते तू विचारू नकोस. खरं मी तुला कधीच सांगू शकणार नाही आणि खोटं तुझ्याशी कधीच बोलू शकणार नाही. तुझ्या भल्यासाठी मात्र नेहमीच झटेन.'' शिनजी समजावणीच्या आवाजात म्हणाला.

''शिनजी, माझ्या वडिलांना मी कधीच पाहिलं नाही, आणि आईला पुरतं ओळखलंही नाही. जो भेटला त्यानं मला कस्पटासमान वागवलं. आतापर्यंतच्या आयुष्यात मी फक्त दोनच वेळा अगदी मनापासून प्रेम केलं. पहिल्यांदा त्सुयोईवर – इतका देखणा त्सुरू मी कधीच पाहिला नव्हता. एक ना एक दिवस तो उडून जाणार हे मला आधीपासून माहीत होतं. तरीही ते वांझोटं प्रेम मला पुरेसं होतं. मग तू भेटलास – मी कधीच प्रेमात पडणार नाही आणि मला कुणाचंही प्रेम कधीच मिळणार नाही याची खात्री झालेली असताना. माझ्या आयुष्याला कुठल्याच इच्छा पूर्ण न होण्याचा शाप असल्यानं मी अमुक एक हवं असं आतापर्यंत कधीच माझ्या मनाला वाटू दिले नाही. पण माझं तुझ्यावर इतकं प्रेम आहे, इतकं प्रेम आहे की खरं सांगते, या क्षणाला त्यानं माझं काळीज अक्षरशः फाटून निघालंय. हे घर, हे पैसे...'ा चैनीच्या गोष्टी आयुष्यात असो वा नसो, मला त्यानं काहीच फरक पडणार नाही. पण तू हवास....तूच. तू नसलास तर कशालाच काहीच अर्थ उरणार नाही. छे! यापेक्षा मी गरीब होते आणि तुला भेटले नव्हते तेच बरं होतं.'' सहसा कधीही न रडणारी कोको हुंदके देऊ लागली आणि शिनजी विरघळला.

''हे सोपं असणार नाही कोको. तुला माझ्याशी लग्न करायचं असेल तर माझ्या काही अटी तुला पाळाव्या लागणार. माझ्या कामाच्या निमित्तानं मला भरपूर फिरायला लागते. मी कधीही, कुठेही गेलो तरी तू मला अडवायचं नाहीस आणि माझ्या मागे तर मुळीच यायचं नाही. कधी कधी तुझ्याबरोबर असतानासुद्धा मला एकटे राहायची हुक्की येईल. तेव्हा माझा एकांत भंग झालेला मला चालणार नाही. शिवाय इतके पैसे कुठून येतात हे मला कधीही विचारायचे नाही. जर यातली एकही अट तू मोडली, तर मी कायमचा निघून जाईन. पटत असेल तर सांग.'' कधी नव्हे तो त्याचा आवाज धारदार झाला.

''मान्य आहे. मीही त्सुरूंच्या देखभालीचे काम सोडणार नाही. माझी ही एकच अट आहे.'' कोको मवाळ आवाजात म्हणाली.

''ठीक. तू जितकी व्यग्र राहशील तितके बरं. सांगितलं होतं त्यांनी मला... हे असं होईल म्हणून.... पण मलाच राहावलं नाही.'' शिनजी पुटपुटला.

आणि दोघांचे लग्न झाले. सुरुवातीचे काही दिवस फारच गुलाबी होते. शिनजीइतका बायकोची काळजी घेणारा आणि तिच्यावर प्रेम करणारा माणूस दुसरा सापडला नसता, आणि कोकोइतकी नवऱ्याची प्रत्येक आवडनिवड जपणारी बाई. शिनजीला मासे फारच आवडत आणि तो रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ ते खायला तयार असे. म्हणून कोको कितीही कष्ट पडले तरी मासेच रांधे. अर्थात तिने ते रांधले पाहिजेत असा त्याचा आग्रह कधीच नसे, तर तिला मासे फारसे आवडत नाहीत म्हणून तो तिच्या आवडीचे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ बाजारातून आणून देई. शिनजीच्या शुभ्र कपड्यांना कोको लख्ख धुवे, आणि त्याला आवडते तशी इस्त्री करे. त्याची आवडती लाल टोपी ती रोज झटकून व्यवस्थित स्वच्छ ठेवे. तर शिनजी तिच्यासाठी गावात कुणाकडे नसतील इतके भारी रेशमी कपडे आणायला विसरत नसे. तो घरी असे तेव्हा संध्याकाळी ती दोघे धुंद करणाऱ्या संगीताच्या तालावर वाल्ट्झ नृत्य करत. कोकोचे आयुष्य आमूलाग्र बदलून गेले होते. ती स्वतःला आरशात पाही तेव्हा तिचा स्वतःच्या प्रतिबिंबावर विश्वास बसत नसे, इतके.

एके दिवशी कोकोला फारसे काम नव्हते म्हणून ती जरा लवकरच घरी आली. शिनजी त्या दिवशी घरीच होता आणि बेडरूमचे दार त्याने आतून बंद केले होते. अशा वेळी त्याचा एकांत भंग करायचा नाही हे तिला चांगलेच माहीत होते. म्हणून ती बाहेरच थांबली. तिची चाहूल लागली तसा शिनजी घाईघाईने बाहेर आला आणि मासेमारीसाठी नदीवर जायचेय असे सांगून निघाला. तो आता बराच वेळ येणार नाही हे तिला माहीत होते. वेळ घालवायला म्हणून तिने घर स्वच्छ करणे, कपडे धुणे वगैरे कामे काढली. बेडरूमची स्वच्छता करताना तिने पलंगावरच्या उश्या जोराने झटकल्या, तो काय! काही पांढरी पिसे त्यांच्याखालून निघून हवेवर इतस्ततः उडू लागली. मुलायम अशी ती पिसे तिने कुठेही ओळखली असती – ती त्सुयोईची पिसे होती! इतकेच नाही, तर काही पिसांच्या खालच्या बाजूला थोडेसे रक्त लागले होते. कोको प्रथम आश्चर्यचकित झाली आणि मग चांगलीच घाबरली. ती पिसे तिथे कुठून आली, आणि त्यांना रक्त कसे लागले हे तिला कळेना. पलंगाच्या बाजूच्या टेबलावरची फुलदाणीही खाली पडून फुटलेली दिसत होती.

त्या क्षणी त्सुयोईला काहीतरी झाले असावे आणि त्याला वाचवायला हवे हा एकच विचार तिच्या डोक्यात आला. आणि त्यात तिला मदत फक्त एकच माणूस करू शकला असता – शिनजी. त्याला शोधण्यासाठी म्हणून पायात पादत्राणेही न घालता ती नदीच्या दिशेने तिला जमेल तितक्या भराभर, लंगडत चालू लागली. शिनजीने घातलेल्या अटींचा तिला पूर्ण विसर पडला. नदीच्या पात्रात चारही बाजूंनी उंच दगडांनी वेढलेला, प्रचंड खोल असा एक डोह होता आणि त्या डोहात दुर्मिळ जातींचे मासे भरपूर मिळत. त्यात बुडी मारणे धोकादायक असल्याने गावातल्या कोणाचीही तिथे जायची हिंमत होत नसे. शिनजी तिथेच असेल हा कोकोचा होरा होता आणि तो काहीसा खराही ठरला. त्याचे कपडे, बूट व टोपी तिथेच नदीच्या काठावर अगदी नीट रचून ठेवलेली होती, प्रत्यक्ष डोहात मात्र खोल पाण्यावर उठणाऱ्या तरंगांशिवाय काहीच नव्हते.

दमलेल्या कोकोचा पाय आता दुखू लागला होता. डोहाकाठच्या एका उंच दगडाच्या आडोशाला ती जराशी टेकली आणि नकळत तिचा डोळा लागला. जरा वेळाने पाण्याच्या प्रचंड खळबळाटाने, आणि त्याचबरोबर होणाऱ्या पंखांच्या फडफडाटाने तिला जाग आली. समोरचे विचित्र दृश्य बघून ती अत्यंत घाबरली आणि तोंडातून किंकाळी फुटू नये म्हणून तिने तिचे ओठ घट्ट मिटून घेतले. डोहातले पाणी समुद्रावर लाटा याव्यात तसे खळबळत होते आणि पिळदार देहाचा शिनजी त्यातून खोल बुडी मारून बाहेर यावे, तसा वर येत होता. त्याच्या तोंडात त्याने एक भलामोठा रक्तबंबाळ मासा पकडला होता आणि त्याच्या हातांच्या जागी चक्क भलेथोरले असे पांढरेशुभ्र पंख होते! झोळीसारख्या पसरलेल्या त्या पंखांतही अनेक मासे तडफडत होते.

आणि कोकोच्या लक्षात आले – ते पंख त्सुयोईचे होते! शिनजीच त्सुयोई होता!

''अजाणता का होईना कोको, तू माझी अट मोडलीस. तू माझ्या मागे आलीस आणि मला माझ्या अशा रूपात बघितलेस. जमेल तितके दिवस तुझ्याबरोबर राहून तुझ्या आयुष्यात आनंद निर्माण करायचा माझा प्रयत्न होता. पण आता दुसरा काहीही उपाय नाही. मला परत माझ्या दुनियेत जायलाच हवे.'' अत्यंत दु:खाने शिनजी म्हणाला.

''शिनजी! शेवटी माझ्या दरिद्री नशिबानं माझ्यावर मात केलीच. तू नसशील, तर मी कसं जगू? मी कदाचित जिवंतही राहणार नाही.''

''तसं झालं, तर माझाही मृत्यू अटळ आहे. आम्ही त्सुरू पूर्ण आयुष्यभर एकाच जोडीदाराबरोबर राहतो. जोडीतला एक जण मृत्यू पावला, तर दुसराही झुरुन झुरुन मरतो हे तुला माहीत आहेच. आता आपल्या दोघांच्या नशिबी विरहात झुरणंच आहे. तू इथे आलीच नसतीस तर? पण तुला तरी कशाला दोष देऊ? हे सगळं तू आमच्या कुंपणात आलीस त्याच्या आधीपासूनच ठरलं होतं. तुला आठवत असेल, तर तुला बघताच सगळे पक्षी अगदी शांत झाले होते, आणि एका वयोवृद्धशा पक्ष्यानं तुझ्यासमोर येऊन आपले पंख पसरले होते – माझ्या वडिलांनी केलेलं तुझं स्वागत होतं ते.

''माझ्या पायाला दुखापत झाली तेव्हा तू वेळीच केलेल्या मदतीमुळे आणि सुश्रुषेमुळे मी पूर्ण बरा झालो. खरं सांगायचं, तर तेव्हाच मी तुझ्या प्रेमात पडलो होतो. तुझ्या निष्पाप, निरागस आणि जराही किल्मिष नसलेल्या प्रेमळ हृदयाशी माझं हृदय तेव्हाच जुळलं होतं. त्यामुळे एक ना एक दिवस मनुष्य रूप घेऊन येणं भागच होते मला. तसंही आम्ही त्सुरू माणसांसारखे कृतघ्न नसतो. त्यामुळे आमच्या उपकारकर्त्याची मदत करण्यासाठी आम्ही हरतऱ्हेनं प्रयत्न करतो, प्रसंगी मानवी रूपही घेतो. मी तुला कधीच काहीही खोटं सांगितलं नाही. शिनजी या नावाचा अर्थच मुळी राज्यकर्ता आहे. त्सुरूंचा राजा आहे मी. त्सुरूंना मासे अतिशय आवडतात आणि मासेमारीमध्ये ते निष्णात असतात हेही तुला माहीतच असेल.'। आणि अशा अनेक डोहांमधले दुर्मिळ मासे पकडून आणि विकून मी मनुष्यरूपात भरपूर पैसे कमावत होतो – फक्त तुझ्यासाठी. त्या दिवशी तू अचानक घरी आलीस तेव्हा मी माझ्या मूळ रूपात विश्रांती घेत होतो. मानवी रूपात यायच्या घाईत असताना माझा धक्का लागून पलंगाशेजारची फुलदाणी फुटली आणि माझ्या पंखाला जराशी इजा झाली. ते रक्त लागलेली पिसे तुला दिसली असतील ना? खरं तर ती लपवण्याचा मी जरा आळसच केला... पण असे एक दिवस होईल हे मला सगळ्या वृद्ध त्सुरूंनी सांगितलंच होतं. मला निघायला हवं आता राणी.''

''नाही! शिनजी, मला सोडून जाऊ नकोस. मी माणसांच्या या दुष्ट जगात तुझ्याशिवाय राहू शकणार नाही. मी काय हवं ते प्रायश्चित्त घ्यायला तयार आहे, कुठलाही त्याग करायला तयार आहे. आपण बरोबर राहू शकू यासाठी दुसरा काहीच उपाय नाही का?'' कोको कळवळली.

''तुझी तयारी असेल तर एक उपाय आहे. नंतर मात्र त्यात काहीही बदल होणे शक्य नाही. चालेल तुला?'' कोकोकडे एकटक बघत शिनजी विचारता झाला.

''हो! मला चालेल!'' शिनजीच्या संमोहित करणाऱ्या नजरेत कोकोची नजर मिसळली.

पुढच्या आठवड्यात त्सुरूंच्या अधिवासात दोन तरुण त्सुरूंची जोडी प्रियाराधनाचे नृत्य करताना सगळ्या लोकांनी पाहिली. जोडीतला नर मादीपुढे वाकून अभिवादन केल्यासारखी पोझ घेत होता आणि प्रत्युत्तरात ती मादीही तशीच पोझ घेत

होती. मग एकदम हवेत थोडेसे उंच उडून, परत जमिनीवर येऊन दोघे एकमेकांभोवती गिरकी मारल्यासारखे गोल फिरत होते. मधेच माना वर करून, चोची उंचावून एकसुराने गात होते.

"आम्ही अधिवासात येणाऱ्या पक्ष्यांची नोंद ठेवतो.'तला नर पक्षी मागच्या हिवाळ्यात एकटाच आला होता.'ा हिवाळ्यात तो आपल्यासाठी छानशी जोडीदारीण घेऊन आलाय. काय सुंदर नृत्य करताहेत ना दोघं? जणू बर्फातला वॉल्ट्झ." अधिवासाचा गाईड आलेल्या पाहुण्यांना माहिती देऊ लागला.

तळटीप – त्सुरू म्हणजे सारस, म्हणजेच क्रौंच पक्षी. साधारण पाच फूट उंच असलेल्या ज्या सुंदर पक्ष्यांचे पंख अडीच मीटर इतके लांब असतात. जपानमधील कुशिरो, भारतात आणि जगात अनेक ठिकाणी हे पक्षी आता मोजकेच उरले आहेत. हे पक्षी आयुष्यभर एकाच जोडीदाराबरोबर राहतात, व त्यांचे प्रियाराधनाचे नृत्य प्रसिद्ध आहे.


जपानीज रेड क्राऊन क्रेन गुगलवर सर्च केल्यास त्यांचे फोटो व नृत्याचे अनेक व्हिडीओ सापडतील.

जपानमध्ये त्यांच्याबद्दल अनेक आख्यायिका आहेत. त्यातली एक लोककथा मी फार पूर्वी वाचली होती – पारध्याच्या जाळ्यात अडकलेल्या एका त्सुरू पक्षिणीला एक गरीब तरुण वाचवतो, आणि काही दिवसांनी त्याच्या दारावर ती एका देखण्या तरुणीचे रूप घेऊन येते. त्याच्याशी लग्न करते, आणि एकांतात बसून तिच्या पिसांची तलम वस्त्रे विणून विकायला पाठवते. ती विणकाम करत असताना त्याने मुळीच आत येऊ नये अशी तिची अट असते. दोघांची भरभराट होते, पण एक दिवस तो तरुण ती वस्त्रे कशी बनतात हे बघण्याचा मोह न आवरून तिच्या एकांताचा भंग करतो. त्याला एक त्सुरू पक्षीण तिच्या पिसांची वस्त्रे विणत असलेली दिसते. तिचे मूळ रूप त्याला दिसल्यावर ती त्याला सोडून उडून जाते अशी काहीशी कथा आहे, आणि त्या कथेचीही अनेक रूपे आहेत. जी.ए. कुलकर्णींनी लिहिल्याप्रमाणे सांगणारे जेवढे असतात, तेवढी रूपे एकच कथा धारण करते. तशीच एक कथा मीही सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**– भाग्यश्री परांजपे**
bree.paranjape@hotmail.com


ग्रंथाली

## अशांत भूमिकेचे अंतरंग
**डॉ. विजय जाधव**





**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**

## चांदणस्पर्श
**डॉ. हृषीकेश सोमण**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**

## अंतर्मन
**प्रविण शृंगारपुरे**




**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**



# गेट-टुगेदर

(डॉ. सुरेश व्यवहारे यांनी दिलेल्या कथाबीजावरील सत्यकथा.)

**डॉ. सचिन जम्मा**

असाच मी एके दिवशी कामात असताना फोन खणखणला. दिन्याचा फोन होता. फोन उचलला पलीकडून दिन्याचा आवाज कापरा येत होता. अलविदा मित्रा! मला माफ कर! तुला दिलेल्या वचनाला मी जागू शकलो नाही. मला जगणे अशक्य झाले आहे. मी आत्महत्या करतो आहे.

**''दिन्या,** केव्हा निघतोयस कोल्हापूरहून गेट-टुगेदरला?'' आमच्या मालवणच्या गेट-टुगेदरच्या आदल्या दिवशी मी सहज दिन्याला फोन केला. तिकडून दिन्याचा खूपच बारीक आवाज आला, 'मी येणार नाहीये गेट-टुगेदरला!' मला आश्चर्यच वाटलं. 'चल बे! असं कुठ असतंय व्हय! एवढ्या वर्षानंतर भेटायला लागलोय आपण अन् तू येणार नाही?' या माझ्या प्रश्नावरही दिन्याचे उत्तर तेच होते, जमणार नाही रे मला. मग मात्र मी खवळलो 'अबे जमणार नाही म्हणजे काय? तिथे येऊन उचलूनच घेऊन येतो बघ तुला'. मी थोडासा मूड हलका करण्याचा प्रयत्न करत होतो. दिन्या मात्र ढिम्म तसाच. पुढे काही बोलायलाच तयार नव्हता. पुढे दिन्यानं जे सांगितलं ते ऐकून मला आश्चर्य वाटलं. तो आर्थिक तंगीत होता. खरं तर माझ्या या जवळच्या मित्राला दिन्याला म्हणजेच दिनकर पाटलाला मी गेली कित्येक वर्षे भेटलोच नव्हतो. मोबाइलवर कधी गप्पा व्हायच्या परंतु त्याही जुजबीच.

दिन्या आणि मी रूममेट. कॉलेजमध्ये असताना खूप घट्ट मैत्री होती माझी, दिन्याची आणि पम्याची. पम्या म्हणजे प्रमोद शिंदे. तोही कोल्हापूरचाच. आम्ही तिघेही एकाच रूममध्ये राहायचो. खूप धमाल केली आम्ही त्या तीन वर्षांत. कॉलेजमध्ये अतिशय दंगेखोर म्हणून फेमस होतं आमचं त्रिकूट. खरं तर सुरुवातीला पम्या आणि दिन्या हे गाववाले म्हणून जवळचे मित्र होते, पुढे मी आणि दिन्या जास्त जवळचे मित्र झालो. आम्ही दोघेही प्रत्येक गोष्ट एकमेकांशी शेअर करायचो. अगदी माझी पत्नी आणि पूर्वाश्रमीची प्रेमिका वनिताबरोबरच्या माझ्या कॉलेजमधल्या प्रेमप्रकरणाची खडान्‌खडा माहिती दिन्याला असायची. आणि दिन्याच्या घरची प्रत्येक अडचण मला ठाऊक असायची. दिन्या तसा गरीब कुटुंबातला. मोठ्या कष्टाने इथपर्यंत आलेला. तसा हरहुन्नरी गडी. छान क्रिकेट खेळायचा. आवाजही मस्त होता त्याचा. नंतर कॉलेज संपल्यानंतर त्याने कोल्हापूरला जाऊन स्वतःची फाउंड्री चालू केली. मी सोलापूरला आलो आणि माझ्या व्यवसायात रमलो. जीवनाच्या दैनंदिन धकाधकीत दिन्याशी होणाऱ्या भेटीगाठी हळूहळू कमी झाल्या. पूर्वी फोनवर गप्पा व्हायच्या, परंतु पुढे व्हॉट्सॲप नावाच्या डिजिटल राक्षसाने या गप्पाही गिळंकृत केल्या. HBD आणि HMA या तकलादु संवादावर गाडी अडकून राहिली. कोव्हिडने या विसंवादात आणखी भर घातली. न भेटण्यासाठी एक सबळ कारण मिळाले. कोव्हिडनंतर मात्र सगळ्यांनाच आपली जवळची नाती पातळ होत आहेत याची जाणीव झाली. आणि मग जुन्या नात्यातली उसवलेली वीण घट्ट करण्यासाठी सगळेच कामाला लागले तसे आम्हीही लागलो. सगळ्यांनी मिळून एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जमू या, पुन्हा एकदा कॉलेजचे जीवन जगू या, धमालमस्ती करू या या हेतूने मालवणच्या गेट-टुगेदरची आखणी करण्यात आली. मालवणच्या अजितने यात पुढाकार घेतला. आम्हा ५० जणांची राहण्याची खाण्यापिण्याची चोख व्यवस्था केली. खूप वर्षांनंतर आम्ही सारे भेटणार होतो. आमच्या सगळ्यांच्याच आनंदाला उधाण आले होते, पण दिन्या येणार नाही म्हटल्यावर मात्र त्यात विरजण पडले.

मी मग पम्याला फोन केला. दिन्याची सविस्तर माहिती घेतली. ऐकून धक्काच बसला. दिन्याची फाउंड्री कोव्हिडच्या काळात बंद पडली. मोठं आर्थिक नुकसान झाल्याने फाउंड्री विकावी लागली. ज्या फाउंड्रीच्या क्षेत्रात दिन्याने राज्य केले त्याच भागात सध्या दिन्या कुठल्यातरी फॅक्टरीत तुटपुंज्या पगारावर नोकर म्हणून काम करत होता. दिन्याचा मुलगा इंजिनीयर झाला आणि अमेरिकेला गेला तो परत आलाच नाही. दिन्याची आणि त्याच्या बायकोची तो फोनवरून साधी चौकशीही करायचा नाही.'ा सर्व परिस्थितीमुळे दिन्या नैराश्याकडे ढकलला गेला. त्याला मानसोपचाराची गरज भासायला लागली. स्वतःच्या प्रकृतीकडेही त्याचे दुर्लक्ष झाले होते. सिगारेट, दारू नित्याचेच झाले होते. पम्याने त्याला बऱ्यापैकी आर्थिक मदत केली. त्यामुळे तो थोडासा सावरला होता परंतु तो इतरांना भेटायचे टाळायचा. तशी वेळ आलीच तर पळून जायचा. दिन्याने मला कधी कळवले नाही आणि पम्यानेही सांगायचे टाळले. त्यामुळे यातले मला काहीच माहीत झाले नव्हते. अशा परिस्थितीत तो कसा काय गेट-टुगेदरला येईल? पम्यानेच मला उलटा प्रश्न विचारला. हे सगळे ऐकून मला खरे तर खूपच वाईट वाटले. आपण आपल्याच जगात रमलो होतो, आपल्या अतिशय जवळच्या मित्राकडे आपले खूपच दुर्लक्ष झाले हा गिल्ट मला खायला लागला. मी त्याची भरपाई करण्याचे ठरवले.

'दिन्या, तू गेट-टुगेदरला येणार आहेस म्हणजे येणार आहेसच. आपल्या तिघांचे पैसे मी भरले आहेत आणि मी उद्या सकाळी माझी कार घेऊन कोल्हापूरला पोहोचतो आहे. तू, मी आणि पम्या आपण मालवणला माझ्या कारने जाणार आहोत. अँड दॅट्स फायनल! यापुढे या विषयावर चर्चा नाही.' मी दिन्याला फोन लावून एका दमात हे सगळे ऐकवले आणि फोन बंद केला. सकाळी सकाळी कोल्हापुरात पोहोचलो. पम्याला उचलले आणि मग दिन्याच्या घराच्या दारात उभे राहून हाक दिली दिन्या, मी आलोय रे! काही वेळाने दार उघडले गेले. कृश झालेला, डोळ्यांभोवती काळी वर्तुळे आलेला आणि केस पिकलेला दिन्या बघून मला गलबलून आले. मला दारात उभा पाहून दिन्याच्याही डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहायला लागले. कडकडून मिठी मारून दोघांनीही अश्रूंना वाट करून दिली.

बाजूला उभे राहून दिन्याची बायको आणि पम्या कौतुकाने आमच्याकडे पाहात होते. काही वेळाने आम्ही सावरलो आणि मग चहापाणी झाल्यानंतर आम्ही दिन्याला बॅग भरायला लावली. थोड्या वेळातच तिघे मालवणच्या मार्गाला लागलो. खूप वर्षांनी आम्ही तिन्ही यार एकत्र आल्यामुळे गप्पांना ऊत आला होता. तरीही दिन्या गप्प गप्पच होता. मीही त्याला फारसे उचकवले नाही. मालवणला पोहोचलो. अजितने एका छानशा रिसॉर्टवर राहण्याची सुंदर सोय केली होती. मी आणि दिन्या, मुद्दामहून एक रूम शेअर केली. शनिवारची सायंकाळ गेटटुगेदरमध्ये एकमेकांची ओळख पुन्हा एकदा करून घेण्यात आणि गप्पाटप्पांतच सरली. दिन्या मला चिकटून पण इतरांपासून दूर दूर राहत होता. फार कोणाशी बोललाही नाही तो. जेवण आटोपून आम्ही रूमवर आलो आणि मग मी मूळ विषयाला हात घातला. दिन्याच्या आयुष्यात काय घडले याची पुरेपूर माहिती घेतली. आर्थिक अडचण आणि कौटुंबिक त्रासामुळे दिन्याने तर चक्क आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला होता. दिन्याची कर्मकहाणी ऐकून खूपच वाईट वाटले. रात्री बराच उशिरापर्यंत मी दिन्याची समजूत काढत होतो. मी सांगत होतो ते त्याला पटत होते किंवा नाही हे मला कळले नाही, परंतु काही वेळाने आम्ही दोघेही थकून झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी मात्र दिन्यामध्ये थोडासा बदल जाणवला. गप्पाटप्पा, दंगामस्ती यामध्ये त्याचा सक्रिय सहभाग होता, जणू काही पूर्वीचा दिन्या आम्हाला गवसला. सायंकाळी झालेल्या दहा ओव्हरच्या लिमिटेड मॅचमध्ये दिन्याने चक्क चार विकेट काढल्या. रात्री आमच्या आग्रहाखातर त्याने माइकवर एक गाणे म्हटले. आम्ही सगळेच पूर्वीच्या कॉलेजजीवनात काही कालावधीसाठी परत गेलो होतो. पार्टीत झालेल्या दोन-चार पेगनंतर रात्री रूमवर कधी येऊन झोपलो ते कळलेच नाही. सकाळी नाश्त्यानंतर सगळ्यांनी एकमेकांची गळा भेट घेत पुन्हा लवकरच भेटण्याच्या आणाभाका घेतल्या. पम्या आणि दिन्याला मी कोल्हापूरला घेऊन निघालो. दिन्याचा मूड तसा बरा वाटला मला परत येताना. त्यानंतर फारसा छेडला नाही मी त्याला. घरी सोडताना मात्र आवर्जून सांगितले, 'कुठलाही अविचार करायचा नाही. तसे वचन दे मला! काही अडचण वाटलीच तर मला अर्ध्या रात्री फोन कर, मी लगेचच हजर होईन.' सोलापूरला आलो आणि गेट-टुगेदरच्या मूडमधून बाहेर पडून कामात व्यग्र झालो. अधूनमधून काही फोनही झाले. दिन्याचे बरे चालले असावे असे वाटत होते.

असाच मी एके दिवशी कामात असताना फोन खणखणला. दिन्याचा फोन होता. विचार केला, म्हटलं करू या थोड्यावेळाने. तासाभराने पुन्हा एकदा मोबाइल खणखणला. तेव्हा मला लक्षात आले की मी दिन्याला उलटा फोन केलाच नव्हता. कामाच्या गडबडीत विसरून गेलो होतो. फोन उचलला पलीकडून दिन्याचा आवाज कापरा येत होता. अलविदा मित्रा! मला माफ कर! तुला दिलेल्या वचनाला मी जागू शकलो नाही. मला जगणे अशक्य झाले आहे. मी आत्महत्या करतो आहे. ऐकून माझी पाचावर धारण बसली. कुठे आहेस तू दिन्या? काय हा वेडेपणा? उसने अवसान आणून मी त्याला विचारले. मी आता रंकाळ्याच्या काठावर एका कठड्यावर बसलो आहे आणि आपले बोलणे संपले की रंकाळ्यात जलसमाधी घेणार आहे. माझ्या आयुष्यात आता जगण्यासारखे काहीही उरलेले नाही. दिन्या सांगत होता. सगळे धैर्य एकवटून मी दिन्याशी बोलत होतो परंतु मोबाइल धरलेला माझा हात थरथर कापत होता. मला दरदरून घाम सुटला होता. काय करावे ते काही सुचत नव्हते. परंतु तेवढ्यात मला लक्षात आले की पम्याला कॉल करायला हवा. कोल्हापुरात असेल तर त्याची नक्कीच मदत होईल. दिन्याला तसाच बोलता ठेवून मी पम्याला कॉन्फरन्स कॉल लावला. सुदैवाने पम्या त्याच्या दुकानातच होता. दिनाच्या नकळत मी पम्याला या गंभीर परिस्थितीची कल्पना दिली आणि पटकन मोटारसायकल काढायला सांगून रंकाळ्याकडे पिटाळले. मी तसाच दिन्याशी मोबाइलवर बोलत राहिलो. अरे, पण असे अचानक झाले तरी काय की ज्यामुळे तू जीव द्यायला निघाला आहेस? त्याला बोलते ठेवण्यासाठी मी विचारले. काय सांगू तुला? माझ्या दिवट्याने चांगले पांग फेडले! अमेरिकेत राहून आम्हाला न कळवता एका परदेशी मुलीशी लग्न केले. साधे आम्हाला लग्नाला बोलावले नाही किंवा तोही इकडे आला नाही. हेही आम्ही दोघांनी सहन केले. गेले काही आठवडे त्याची तिकडे आयटीतली नोकरी गेली म्हणून मला तो पैसे पाठवण्यासाठी तगादा लावत होता. त्याकडेही आम्ही दुर्लक्ष केले. परंतु आज तर हद्द झाली. माझ्या राहत्या घरातला अर्धा वाटा मागितलाय त्याने. राहतं घर विकून पैसे पाठवा म्हणतो आहे निर्लज्जपणे! सांग बघू, माझ्याकडे काही उपाय उरला आहे का? यावर माझ्याकडे खरे तर काही उत्तर नव्हते परंतु दिन्याला बोलते ठेवणे जरुरीचे होते अरे काळजी करू नकोस. मी पाठवीन पैसे तुला. उगाचच काहीतरी बोलायचे म्हणून मी बोलत होतो. दरम्यान माझा आणि पम्याचा फोन चालू होताच. दिन्याशी बोलत बोलत मी पम्या कुठपर्यंत पोहोचलेला आहे याचा अंदाज घेत होतो. दिन्याशी बोलताना मी तो नक्की कुठे बसलेला आहे याची माहिती काढून घेतली होती. ती माहितीही मी दिन्याच्या नकळत पम्याला पोहोचवली होती. 'तू काय माझ्या आयुष्यभर मला पुरणार आहेस का? आणखी किती मदत कराल तू आणि पम्या मला? खरे तर आपल्या गेट-टुगेदरपूर्वीच आत्महत्या करणार होतो मी. पण गेट-टुगेदरमध्ये तू जे बोललास, माझ्याशी प्रेमाने वागलास, म झी काळजी घेतलीस त्यामुळे पुन्हा एकदा जगावेसे वाटले होते रे मला! तुला खरे सांगू, आपल्या गेट-टुगेदरने माझ्या खटारा

गाडीत थोडेसे जगण्यासाठीचे पेट्रोल भरले होते. पण ते सारे संपले रे आता! आज माझी गाडी बंद पडते आहे. माफ कर मित्रा! पुढच्या जन्मी मात्र नक्की तुझा एक चांगला मित्र बनून जन्माला येईन मी! असा लेचापेचा कमकुवत मनाचा दिन्या राहणार नाही मी! खरेच माफ कर! रडत रडत दिन्या बोलत होता. मला आता प्रचंड भीती वाटत होती ती कोणत्याही क्षणी काहीतरी वाईट होईल. काहीही करून त्याला या क्षणी वाचवणे जरुरीचे होते. 'दिन्या, माझी शपथ आहे तुला! काय हा मूर्खपणा? माझे ऐक, ऊठ तिथून आणि दूर निघून ये रंकाळ्यापासून!' मी जवळजवळ ओरडलोच त्याच्यावर. 'नाही रे! आता ते शक्य नाही. सॉरी!' दिन्या बोलला आणि या वाक्यानंतर तिकडून त्याचा आवाज बंद झाला. मी इकडून किंचाळत होतो दिन्या, दिन्या, ऐक माझं! क्षणभर तिकडे स्मशानशांतता पसरली होती, इकडे माझा श्वास अडकला होता. माझ्याच हृदयाचे ठोके मला स्पष्टपणे ऐकू येत होते आणि मग फाडऽऽ असा आवाज आला. त्यानंतर आला तो पम्याच्या ओरडण्याचा आवाज, 'रां...! बांगड्या भर, बांगड्या! कोल्हापुरी गडी आन जीव देतोय म्हनं! लाज नाही वाटंत! पम्याचा आवाज ऐकून माझा जीव भांड्यात पडला. पम्या अगदी वेळेवर तिथे पोहोचला होता. पम्या तसा रांगडा गडी. तिथे पोहोचताच त्याने दिन्याच्या थोबाडात ठेवून दिली होती. दिन्याच्या हाताला पकडून दरादरा खेचतच त्याने रंकाळ्यापासून त्याला लांब आणले होते. आमच्या तिघांचेही फोन तसेच चालू होते. आता दिन्या, पम्या आणि मी तिघेही एकत्र फोनवर रडत होतो. कचाकचा भांडत होतो, एकमेकांना शिव्याही देत होतो. आणि काही वेळाने हसायलाही लागलो. चेहऱ्यावर हसू होते पण डोळ्यांत मात्र अश्रू होते. काही वेळातच तिघेही शांत झालो. पम्या दिन्याला घेऊन घरी पोहोचला होता. दिन्याला थंड करण्यासाठी पुन्हा एकदा आमच्या तिघांचेच गेट-टुगेदर करण्याचा प्लॅन आम्ही त्वरित केला कारण या गेट-टुगेदरने तर दिन्याला वाचवले होते.

**– डॉ. सचिन जम्मा**
drsachinjamma@gmail.com


ग्रंथाली

अस्वस्थ तांड्याची
# बुद्धिवादी समीक्षा
**संपादक : डॉ. रमेश राठोड**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**

# वैधव्याची समस्या
**डॉ. संभाजी खराट**




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**



# राधेचं भ्रमरगीत

**डॉ. स्मिता दातार**

राधेनं त्याची चलबिचल ताडली. ती हळुवारपणे म्हणाली, ‘कृष्ण असा लगेच उमगत नाही. तो मनात जपावा लागतो. तुमचा कण अन् कण कृष्णमय झाल्याशिवाय कृष्ण कळणार नाही.’ उद्धव तिच्याकडे बघत असतानाच तो भ्रमर पुन्हा राधेच्या हातावर बसला. राधा खुद्‌कन हसली. किती सुंदर दिसली ती उद्धवाला.

**राधा** यमुनेकाठी निश्चल बसली होती. तिची घागर रिकामीच पाण्यावर हेलकावे घेत होती... तिच्या रित्या आयुष्यासारखी. तिचे कमळासारखे डोळे यमुनेच्या डोहासारखे काठोकाठ भरले होते. डोळ्यांतले अश्रू बाहेर येऊ न देण्याची कला मात्र ती इतक्या वर्षांत शिकली होती. कृष्ण मथुरेला जाऊन बराच काळ लोटला होता. कृष्णाशिवाय गोकुळ सुनं झालं होतं. कृष्णाचे मातापिता, नंदराजा आणि यशोदाराणी या काळात अकाली वृद्ध झाले होते. गोकुळाचं अवघं तेज मथुरेत निघून गेलं होतं. गोकुळवासियांचे नित्य व्यवहार सुरू होते. अजूनही गायी डोंगरावर चरायला जात होत्या. परंतु आता त्या बासरीच्या सुरात न हरवता, संध्याकाळी वेळेत परत येत होत्या. गोप गुरं राखत होते, शेती करत होते, पण सगळे मावळतीला मुक्या जनावरांपाठी मुके होऊन परतत होते. गोपी तर एखाद्या डेऱ्यातल्या ताकात नुसता घुसळण खांब फिरावा आणि लोणी निघू नये, तशा मुकाट कामं करून जीव थकवून घेत होत्या. आता गोकुळातल्या सणांमध्ये ती ऊर्जा, तो जल्लोष उरला नव्हता. कृष्ण आपल्याला, या गोकुळाला विसरला नसेल ना, एवढा एकच विचार राधेच्या मनात रुंजी घालत राहायचा. तिला खात्री होती की तिचा श्यामसखा तिला विसरला नसेल. तरीही तिचं मन कधीतरी कावरंबावरं होई. शेवटी विरह वैरी असतो. खरं तर गोकुळ काही मथुरेपासून फार दूर नव्हतं. कृष्णाला भेटून येणं शक्य होतं, पण त्यानं तिला तसं सांगितलं नव्हतं. आणि त्याने तसं सांगितलं नाही, याचा अर्थ तिने समजून घेतला होता. कृष्णाच्या मथुरेतल्या पराक्रमाच्या गाथा तिच्या कानावर येत होत्या. ती आता फक्त त्याच्या स्मरणाचे मणी जपणार होती.

राधेचं जीवन स्तब्ध झालं होतं. म्हणायला तिचा संसार होता, पण त्यात तिचं मन कधीच रमल नव्हतं. कृष्ण मथुरेला गेल्यापासून अनयनं, तिच्या पतीनं मात्र तिची साथ सोडली नव्हती. त्यांच्यातलं पतीपत्नीचं नातं आता पितापुत्रीसारखं झालं होतं. राधेनं कृष्ण कृष्णनाम जपावं आणि अनयनं मोठ्या मनानं ते ऐकून घ्यावं. अनयने तिला भरवावं, जोजवावं, रानोमाळ कृष्ण कृष्ण करत फिरणाऱ्या राधेला हात धरून घरी आणावं. कृष्ण आपल्याला, गोकुळाला सोडून गेला आहे, हे तिच्या बुद्धीला आकलन व्हायलाच सुरुवातीचा काही काळ लागला होता. तरीही राधा जिवंत होती. गोपी जिवंत होत्या. गोकुळ होतं, तिथेच होतं. त्या वातावरणात कृष्ण कृष्ण असं नाम तेवढं ऐकू यायचं. कारण अवघं गोकुळ त्याचा जप करायचं. त्याला कोणीच विसरलं नव्हतं.

आणि अवचित एक भ्रमर आला. तो राधेभोवती गुणगुण करत होता. राधेला त्याच्या मधुर रवात विलक्षण मोहिनी जाणवली. हा भ्रमर आकारानं अंमळ लहानसा होता. त्याच्या पायावरचे परागकण तिच्या हाताला लागले. ती त्या भ्रमराला स्पर्श करणार, इतक्यात बल्ली आणि बिरु दुरून तिच्याच दिशेनं तिला धावत येताना दिसले. थोडा दम खाऊन बल्ली म्हणाली, 'राधाराणी, मथुरेहून एक अतिथी आलेत, अगदी आपल्या कान्हाचं रूप. तसेच सावळे, लांब लांब गुडघ्यापर्यंत असलेल्या हातांचे, तशाच लांबट डोळ्यांचे. आपल्या कान्हाचं तेज नाही त्यांना आणि माथ्यावर मोरपीस ही नाही; पण बाकी आपल्या कान्हासारखेच.' बल्लीची छाती अजून धपापत होती.

आपल्या कान्हासारखेच.. आपला कान्हा. राधेला बल्लीचे पुढचे शब्द जणू ऐकू येईनासे झाले.

'ते रथातून आलेत. खूप दागिने घातलेत त्यांनी. नंदराजा आणि यशोदामय्या त्यांचं स्वागत करताहेत. तू पण चल.' बिरु राधेचा हात धरून तिला ओढायला लागला. कृष्ण निघून गेल्यापासून राधेचं नंदवाड्यात जाणं कमीच झालं होतं. कधीतरी यशोदाराणीच्या सेवेला ती जायची, पण वाड्यात आता सजीवपणा उरला नव्हता. वाड्यात गेलं की उगीच तिला कृष्णाचा पदरव ऐकू यायचा, कोणी हळूच आपली वेणी ओढून गेलं की काय असं वाटायचं. वाड्यातल्या शिगोशीग भरलेल्या लोण्याच्या डेऱ्यात एकदा बोटं उमटलेली तिनं पाहिली. आसपास तर कुणीच नव्हतं. हे भास आहेत, हे राधेला पक्कं ठाऊक होतं.'शोदेच्या रिकाम्या मांडीवरची कृष्णाची वाकळ बघून मात्र तिचा जीव गलबलायचा. म्हणून नंदवाड्यात जाणंच ती टाळायची. तरी बल्ली आणि बिरुच्या आग्रहासाठी ती वाड्यात गेली. अवघा गवळीवाडा तिथे त्या पाहुण्याला बघायला लोटला होता.

तो उद्धव होता. कृष्णाचा चुलतभाऊ आणि मथुरेतला सखा. कृष्णाचे काका, राजा देवभानचा पुत्र, उद्धव यादव. उद्धव बृहस्पतींचा शिष्य होता. राजा नंद, गावकऱ्यांना अतिथीची ओळख करून देत होते. थेट कृष्णाचीच कद काठी, पण चेहरा? अहं, माझ्या कृष्णाच्या चेहऱ्यावरचं ते मंद स्मित, ते तेजाळ, खट्याळ डोळे.. नाही, हा तर मुळीच कृष्णासारखा नाहीये.

'मी कृष्णसखा, उद्धव' तो उपस्थितांना नमस्कार करत होता. आणि राधेची नजर त्याच्या गळ्यातल्या कमळांच्या माळेवर पडली. ती कमळं नुकतीच उमलली होती. गोकुळातल्या कमळांपेक्षा अधिक टपोरी, अधिक रसरशीत होती ती.

उद्धव वृष्णियांचा मंत्री होता. कंसाचा वध केल्यावर कृष्णानं त्याचे मातापिता, वासुदेव आणि देवकीला कारागृहातून मुक्त केलं होतं आणि उग्रसेनमहाराजांना गादीवर बसवून तो सिंहासनापासून अलिप्त झाला होता. मंत्रिमंडळात वृष्णियांचे

नातेवाईक आणि काही विचारी अधिकाऱ्यांची नेमणूक करून आपण सांदिपनीऋषींच्या आश्रमात जायला मोकळा झाला होता. तिथून आल्यावर मथुरेची घडी बसवताना उद्धव आणि कृष्ण यांच्यात मैत्री झाली होती. उद्धव बुद्धिमान, प्रशिक्षित मंत्री होता. अक्रूराकडून उद्धवाने गोकुळाविषयी ऐकलं होतं. अक्रूर कृष्णाला मथुरेला नेण्यासाठी गोकुळात गेला, तेव्हा तिथल्या लोकांचा कृष्ण किती लाडका आहे, हे त्यानं अनुभवलं होतं. अक्रूरानं मथुरेत हे सगळ्यांना सांगितलं. गोकुळातल्या गोपी कशा कृष्णासाठी तहानभूक विसरतात, गोप कसे जीव ओवाळून टाकायला तयार असतात, हे सगळं ऐकून उद्धवानं कृष्णाला विचारलं, 'बन्धो, गोकुळवासीयांचं हे तुझ्यावर असलेलं प्रेम म्हणायचं की भक्ती? माझं ही तुझ्यावर प्रेम आहे. पण मी असं वागत नाही.' कृष्ण त्यावेळी सांदिपनीऋषींच्या आश्रमातून परत आला होता. जरासंधाची मथुरेवर सतत आक्रमणं होत होती. कृष्णाची राजकीय बांधणी चालू होती. जरासंधाला थोडं बेसावध ठेवावं, असं कृष्णाला वाटत होतं. कृष्ण उद्धवाला म्हणाला, 'उधो, प्रेम म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी तू काही दिवस गोकुळाला जाऊन ये. ते सगळे माझी आठवण काढत असतील, त्यांना माझं क्षेमकुशलही सांग. तुलाही जरा हवापालट होईल. मला तर आता उसंत मिळेल असं वाटत नाही.'

कृष्णाचा सांगावा घेऊन उद्धव गोकुळात आला होता.

उद्धव नंदवाड्याबाहेर रथातून उतरतानाच एक गोप धावत आला आणि म्हणाला, 'महाराज, जरा पलीकडून उतरावं. या बाजूला पाऊल ठेवू नये, इथे आमच्या कान्हाची पावलं पडायची, त्याची चरणधूळ तिथे आहे. जरा लांबून या. आमच्या गायी पण कान्हाच्या पाऊलखुणा टाळून चालतात.' उद्धवाला गोकुळात पहिलं पाऊल टाकायच्या आधीच तिथे असलेलं कृष्णाचं अस्तित्व जाणवलं. नंदानं त्याला अदबीनं वाड्याच्या सोप्यावर नेलं. तिथे असलेल्या झोपाळ्याला दोन गोपिका सजवत होत्या आणि दोघी त्याला मंद मंद झोके देत होत्या. एक सुंदर स्त्री हातात पंखा घेऊन वारा घालत उभी राहिली. नंदानं उद्धवाला बाजूच्या चंदनी मेजावर बसवलं. झोपाळ्यावर कोणीच बसलं नाही. गोपी त्यांच्या मनातल्या कृष्णाला झोके देताहेत हे उद्धवानं ताडलं. वारा घालणारी ती स्त्री, तिचं नाव राधा होतं, ती गोशाळेचा पूर्वीचा मुखिया, वृषभानूची लेक, अनय नावाच्या मुख्य गवळ्याची पत्नी होती. नंद-यशोदेच्या बोलण्यातून उद्धवाच्या हे लक्षात आलं. राधेची नजर त्या झोपाळ्यावरून एकदाही हटली नाही. मात्र त्या स्त्रीच्या सौंदर्यात काहीतरी उणीव होती.

दूध आणि दह्यानं ओतप्रोत गोकुळात, त्याच्या वास्तव्याच्या कालावधीत उद्धवाला कोणीही दुधाचे पदार्थ दिले नाहीत, कारण त्यावर त्यांच्या कृष्णाचा हक्क होता. आता दूध, दही केवळ लहान मुलांना द्यावं, असं कोणी न ठरवताच ठरलं होतं. प्रत्येक घरातून एक तरी 'कृष्ण' नावाचं मूल त्याला भेटत होतं. बाकी उद्धवाच्या आदरातिथ्यात काहीही कमी होत नव्हतं.

उद्धवमहाराजांना कदंबवनात सहलीसाठी तरुण गोप घेऊन आले. त्यांना गोकुळातली यमुना बघायची होती. उद्धवानं या यमुनेचा उल्लेख कृष्णाच्या तोंडून ऐकला होता.'मुना तर मथुरेतही होती. मग इथे ती वेगळी का भासत होती? नंदमहाराजांनी सगळ्यांना यमुनेकाठी बोलावलं. तिथे काही गोपींसह ती स्त्री, राधाही आली होती. राधा या यमुनेकाठच्या आठवणीत रंगून गेली होती. तिच्या बोलण्यातून तिने जणू तिथे त्यांची कृष्णासोबत चालणारी रासलीला उद्धवाच्या डोळ्यांसमोर उभी केली. कृष्णाच्या मुरलीच्या सुरांवर गोपींचे वाजणारे लयबद्ध नूपुर, जणू यमुनेत कोणी सहस्र दीप सोडले आहेत असं यमुनेत पडणारं चांदणं आणि बासरीच्या सुरांनी धुंदावलेला आसमंत. आतादेखील त्या आठवणींनी राधा कृष्णाजवळ पोचली होती. त्या क्षणीच उद्धवाला जाणवलं, हिच्या सौंदर्यात कृष्णाची छाया उणी आहे. ही कृष्णाच्या फक्त उल्लेखानं तेजाळून उठते. उद्धवाच्या उडत उडत कानावर होतं, की कृष्णाची कोणी स्त्री सखी गोकुळात आहे. ती हीच असावी, राधा.

रानातून चालताना गोपी त्यांच्या कथा उद्धवमहाराजांना ऐकवत होत्या. कोणाला बालपणीचा लंगडा कृष्ण आठवत होता. तर कोणाला वसंतोत्सवात रंगांनी भिजवणारा कृष्ण आठवत होता. राधा तिच्या हालअपेष्टांचं वर्णन करत होती. कृष्णाचं फक्त नाव घेतलं तरी तिच्या पाठीवर उठणारे छडीचे वळ, कृष्णाला भेटायचं म्हणून घरी तिच्यावर सासू आणि नणंदांनी बसवलेला सक्त पहारा, कृष्णासाठी गावासमोर सहन केलेली मानहानी आणि कृष्णासाठी त्यागलेला संसार.. राधेच्या पोटी पोर नव्हतं. तिच्या आणि कृष्णाच्या नसलेल्या शारीर संबंधाविषयी समाजात बोललं गेलं होतं. तिच्याकडे समाजानं बोटं दाखवली होती. शेवटी एकदा पिंगला नावाच्या वेश्येनं सगळ्यांना गप्प बसवलं होतं. गावातून कोण कोण पिंगलेकडे जातात, याची जंत्रीच तिनं सादर केल्यानं गाव गप्प बसलं होतं. राधा कृष्णाच्या प्रेमाला, भक्तीला गोकुळानं आनंदानं स्वीकारलं नसलं तरी एक स्त्रीपुरुष मैत्रीचं वेगळं उदाहरण म्हणून मान्य केलं होतं.'ात तिचा पती अनय याचंही अस्तित्व पणाला लागलं होतं.'ा सगळ्या ताणतणावामुळे राधेचे वडील वृषभान आणि अनयची आई गंगा, यांचं अकाली निधन झालं होतं. एका कृष्णप्रेमापायी राधेनं खूप सोसलं होतं. उद्धव तिच्या एकेका कथेनं हेलावून जात होता.

तिथून परत येताना एक हिरवागार पर्वत उद्धवाला दिसला. ग्रीष्माच्या काहिलीत हिरवा पर्वत? उद्धवाला आश्चर्य वाटलं. हा तोच गोवर्धन पर्वत होता, जो कृष्णानं त्याच्या एका करंगळीवर तोलून धरला होता आणि सगळं गोकुळ त्याच्या छायेखाली

सुखरूप ठेवलं होतं. आजही कृष्णाच्या स्पर्शाने पुनीत झालेला तो पर्वत सदाहरीत असायचा. राधेच्या स्वरांतून कृष्णाविषयीचं प्रेम, अभिमान पाझरत होता. दरवर्षी इंद्राला द्यावा लागणारा पशुबळी आणि भेटी नाकारून कृष्णानं इंद्राशी भांडण केलं होतं. गोकुळातल्या ज्येष्ठांचा रोष पत्करला होता. राधा ही कथा सांगत असताना, सगळ्याच गोपी आणि गोपांना ती कथा उद्धवाला ऐकवायची होती. त्यांच्या कृष्णाचं नाव घेताना ती भोळी माणसं थकत नव्हती. कर्मकांडाला विरोध करणारा, गोकुळातल्या त्याच्या परिवाराचं हित बघणारा कृष्ण, त्याच्या आराधनेसाठी ही माणसं काय करत असतील? चालता चालता राधेच्या पायात काटा रुतला, कृष्णा... असं विव्हळत तिनं तो काटा काढून दूर फेकला. 'पाहिलंत महाराज, असा द्वाड आहे तो, मी तुमच्याशी बोलत राहिले ना, त्याचं नाव घेतलं नाही ना, म्हणून केला त्यानं खट्याळपणा..' राधा थोडीशी लंगडत चालायला लागली. उद्धवाला एकेक प्रत्यय येत होता.

मथुरेतही कृष्ण तसाच वागत नव्हता का? त्याची राजकीय चाल कधीतरी उद्धवाला पटायची नाही. कारण उद्धव, गुरू बृहस्पतींच्या विद्यापीठातून शिकून आलेला अग्रणी स्नातक होता. कृष्ण साधा गवळी, ज्याला राजकारणाचा अनुभव नव्हता म्हणून कृष्णाचं मत सभा लगेच उचलून धरायची नाही. आणि अचानक उद्धवाला आठवलं, आताही जरासंध, कृष्णाला ठार करण्यासाठी मथुरेवर सतत आक्रमण करत होता. कृष्ण मंत्र्यांच्या सभेत म्हणाला होता, 'शत्रू बलाढ्य असेल तर कधीतरी आपण दोन पावलं मागे जाऊन लहान व्हावं, भले त्यात पळपुटेपणा वाटला तरी चालेल. प्रजेच्या हितासाठी प्रसिद्धीचा, शौर्याचा, वैयक्तिक स्वार्थ बघायचा नसतो. माझ्या एकट्यासाठी मथुरेच्या सगळ्या प्रजेला संकटात ओढू नये.'

कृष्णाचा हा स्वार्थत्याग, प्रजेवर प्रेम की पळपुटेपणा? कृष्णाच्या या नीतीला मीच सभेत विरोध केला होता. म्हणून त्यानं मला गोकुळात पाठवलं? आणि तो.. पळणार आहे? कुठे? मला कृष्ण उमगला नाही? उद्धव अचानक उठून उभा राहिला.

राधेनं त्याची चलबिचल ताडली. ती हळुवारपणे म्हणाली, 'कृष्ण असा लगेच उमगत नाही. तो मनात जपावा लागतो. तुमचा कण अन् कण कृष्णमय झाल्याशिवाय कृष्ण कळणार नाही.' उद्धव तिच्याकडे बघत असतानाच तो भ्रमर पुन्हा राधेच्या हातावर बसला. राधा खुद्कन हसली. किती सुंदर दिसली ती उद्धवाला.

'राधादेवी, आपण येणार माझ्यासोबत मथुरेला? कृष्णाची भेट होईल.' उद्धव राधेला म्हणाला.

'नाही महाराज. कान्हा इथून गेला तेव्हा मी खूप दुःखी झाले होते. जणू माझा आत्माच कोणी हिरावून नेलाय. परंतु मग मला, आम्हाला सगळ्यांना त्याचं अस्तित्व चराचरात जाणवायला लागलं. तो आमच्यासोबतच असायचा. आमचं हित पाहायचा. तो इथून गेला तरी गोकुळ संपन्नच राहिलं. कारण त्यानं आखून दिलेल्या मार्गावर सगळे चालताहेत. तो या पंचमहाभूतांत सामावलेला आहे. तो या कदंबवृक्षाखाली आहे, तो यमुनेकाठी आहे, तो गोठ्यात आहे, तो गोपींच्या घड्यात आहे, तो मय्याच्या वाड्यात आहे, तो जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आहे. सुषुप्ती, स्वप्न, जागृती, आमच्या प्रत्येक अवस्थेत तोच आहे. तो आमच्यातच वास करतो. तो आमच्या दृष्टीपासून दूर आहे. परंतु त्याला मनात आणलं, तर तो आपल्या जवळच असतो. त्याचं ध्यान केलं तर त्याची भेट होतेच. हळूहळू माझा राग, लोभ, मोह सारं नष्ट झालं. आता असते फक्त हुरहुर. त्याच्यात सामावून जाण्याची परिपूर्णतेची हुरहुर. आता कृष्ण जगज्जेता होईल. राजकुमारी त्याला वरतील. त्याचा लौकिक संसार होईल. तरी आम्ही सूक्ष्मरूपात एकमेकांसाठी असूच. स्वार्थ त्यागणं म्हणजेच प्रेम ना महाराज?'

उद्धवाच्या डोळ्यांत कुणी अंजन घातलं होतं. या राधेनं कृष्णाच्या गाभ्याला, त्याच्या विचारांना, त्या अमृताला स्पर्श केलाय. हे सगळं मला आकळावं म्हणून पाठवलस ना मला इथे कृष्णा? उद्धवाचा गळा दाटून आला.

कृष्णाच्या आराधनेची गरज मला आहे. राधेला, या गोपींना नाही कारण तो त्यांच्या मनातच आहे.

राधेला उद्धवाची अवस्था कळत होती. तो भ्रमर पुन्हा राधेभोवती गुणगुण करायला लागला. आता राधा हसली.

तिला वाटलंच होतं की असा भ्रमर तिनं गोकुळात कधी पाहिलेला नाही. त्याच्या पायांना माखलेले केशरकण गोकुळातल्या फुलांतले नाहीत. ते मथुरेतल्या फुलातले आहेत. म्हणजे तो भ्रमर... उद्धवाच्या गळ्यातल्या माळेतील कमळातून आला होता. तो काळा भ्रमर, कृष्ण.. काळा जादूगार.. ..

भ्रमरा, कृष्णा, तू इतक्या दूर आलास? माझ्या मनातलं कळलं तुला? राधा कशी आहे बघायला आलास की तुझ्या राधेला दर्शन द्यायला?


कृष्णा.. तुझ्या स्मरणात मी आहे आणि माझ्या स्मरणात तू..

आणि एक सांगू, मला जगायला इतकं पुरेसं आहे.

त्या भ्रमरानं आणलेले परागकण राधेनं अलगद बोटानं तिच्या कुंकवावर टेकवले. राधा त्या भ्रमराशी, तिच्या कृष्णाशी तन्मयतेनं बोलत होती. तेजाची पुतळी झाली होती. भ्रमर गुणगुण करत होता.

आणि उद्धव त्या भ्रमरगीताचा साक्षी होता.

**– डॉ. स्मिता दातार**
drsmitadatar@gmail.com



# आहुती

**विजय खाडिलकर**

आधी माझा लेक गेला नि आता हापण...?
माझा नातू पोरकाच ऱ्हायला! माझं पत्रिकेचं ज्ञान
चुकीचं होतं..? ह्या पोरीच्या नशिबात वैधव्यच
लिहिलेलं होतं..? दुसरं लग्न थांबवायला हवं होतं..!

**टांग्याच्या** टापा दाराशीच थांबलेल्या ऐकून तिला वाटलं बहुतेक अप्पाच परतले.

दोन दिवस उलटून गेले होते, अप्पा घरातून निघून गेल्याला. म्हणजे बेपत्ता झाल्याला.

वेळ दुपारची म्हणजे अप्पांच्या रोजच्या आन्हिकाचीच. म्हणून तिला जरा आशा वाटली.

चुलीतलं लाकूड मागे ओढून दाराशी आली तो सदू टांगेवाला अंगणाचं केंबळाचं फाटक ढकलून आत आला. वृंदावनाच्या बाजूला असलेल्या चुलीतल्या राखेकडे बघत म्हणाला, ''का वो ताई, अप्पा न्हाईत तं चुलीतली राख तशीच?'

''काय करू बाबा. इथं लक्ष कुणाचं आहे तिकडं? आधी त्यांचा पत्ता तर लागू दे. तुला कांही कळालं का कुठं?''

''तसं खास कायबी न्हाई. पर त्यो ढग्याचा बारकू बोलला का तेनं अप्पांसारकया कुनाला मिरजंकडं जाताना पायलं गाडीतनी.'' जोत्यावर टेकत तो बोलला.

''तो कुठं भेटला त्यांना का नुसता अंदाजच?''

''तसा अंदाजच म्हनायचा. त्यो गेल्ता तेच्या पाव्हन्याकडं.''

''म्हंजे काही आशा नाहीच. कुठे नि कशासाठी गेलेत त्यांनाच माहीत.''

''तुमी पोलिस पाटलाला खबर दिली न्हवं? मंग तेनं बाजूच्या गावातनी खबर दिलीच आसल.''

तिला मग चुलीची आठवण झाली. पोटाची खळगी भरायसाठी तरी काहीतरी शिजवायलाच हवं;

''बरं. ये तू आता. अप्पा घरातनं बाहेर पडल्यापास्नं धड पूजापण नाही केली. तुला पाणी देऊ का?

''उन्हाचा आलायस...ताक पी म्हटलं तर घरात जनावर नाही..'''

''माला नगं जी. माज्या जनावराला थोडं पानी पाजू द्यावं. घोडं तहानलं आसल.''

''मग दारातल्या हौदातनंच घे तुझी बादली भरून. वैरणकाडीपण टाकायची तर टाक. नि बस जरासा. नको जाऊ उन्हाचा. अप्पा गेल्यापास्नं घराला जाग कशी ती नाहीच.'' असं म्हणून ती आत वळली; अप्पांचाच विचार करत...

अचानक त्याना काय झालं कळेना.

सकाळचं आन्हिक उरकून ते जे देवळाकडे म्हणून गेले ते परतलेच नाहीत. माध्यान्ह टळून गेली तरी. खरं तर ते लवकर परततात. कारण अंगणातली तुळशीवृंदावनाजवळची चूल पेटवून आधण चढवतात; वैश्वदेवाची आहुती द्यायच्या भातासाठी. बाजूच्याच कुंडात चुलीतलेच निखारे घालून तोंडानं मंत्र पुटपुटत तीन वेळा स्वाहा म्हणत तुपाच्या हातानं आहुती देतात.

कित्तीक दिवस म्हणजे वर्षं त्यांचं हे वैश्वदेवाला आहुती देणं चालू होतं. म्हणजे ती माघारी आली त्याच्या आधीपास्नं. पुढे तिची आई गेली तरी त्यात खंड पडला नव्हता.

ती म्हणालीसुद्धा त्यांना, 'अप्पा आता तरी थांबवा हे सगळं. घरात मुलगा नाही. कशाला जाऊ दिलात त्याला पोलिसात? कोण चालवणार हे सगळं पुढं? मी ही अशी मागे आलेली नि त्यातून निपुत्रिक. आणि आता मागायचं तरी काय आहे त्या वैश्वदेवाकडं? सगळ्या घराचाच होम झाल्यावर!...'

'काय मागणार आता देवाकडं? ते पोर जिथं असेल तिथं सुखरूप असो म्हणायचं.'

'ते काय आपल्या हातात राह्यलं नाही आता. त्याचं काय व्हायचं ते आता त्या बापाकडं. इथं असता तर मी तरी संभाळला असता.'

'इथं गावढ्या गावात कोण त्याचं शिक्षण करणार होतं. आणि खायला काय घालणार होतीस? शेतं पडलीयेत कुळांकडं.'

'अहो अप्पा, आता कॉलेजात जायला लागेल तो. करतील का ते सगळं नीट? म्हणून काळजी वाटते! एवढंच. इथं कोल्हापुरातच होती तंवर खुशाली कळत तरी होती त्याची. पण बापानं लग्न लावून दिलं तिचं नि संबंधच संपला म्हणायचा.'

'मग काय करायला हवं होतं त्यानं? पंचविशीच्या आतली पोर. अवघ्या तीन वर्षांच्या पोराला घेऊन कशी दिवस काढणार होती? मी हा बिनकामाचा. झालं ते बरंच म्हणायचं. मी केलेली चूक त्यानं सुधारली. नाही तर तू तरी कशाला राह्यली असतीस इथं गोवऱ्या थापीत.'

'माझं मरो. व्यंग म्हणून एकानं टाकल्यावर दुसरा कोण पत्करणार होता मला?'

अप्पांनी फक्त एक सुस्कारा सोडला. विषय संपला. हे असंच व्हायचं. आठवावं ते कमीच...

''ताई मी जातो बरं का. ठेसनाकडं जाऊन बघतो; काय सवारी भेटती का. आता रिक्षा झाल्याधरनं आमचा धंदा पार बसलाच म्हनायचा.''

जाता जाता बाहेरून सदू बोलला तशी ती भानावर आली. चुलीतली मागे ओढलेली लाकडं मागेच होती. जाळच नाही लागला तर भात शिजायचा कधी नि जेवायचं कधी. लाकडं पुढे करून पुन्हा जाळ करायसाठी फुंकणी शोधायला लागली. वाटलं

गावात रेशनचं दुकान झाल्यापास्नं लोक रांगा लावून घासलेट आणतात. पण जेव्हा केव्हा गाडी येईल तेव्हाच! त्यापेक्षा हे चूल फुंकणं परवडलं! दळणाची कटकट नको म्हणून बुडकुलंभर भात शिजवणंच बरं वाटायचं.

केव्हातरी भाकरी टाकायची! तीही घरचेच जोंधळे होते म्हणून. गिरणीतनं दळून आणायला रोख पैसे कोण देणार...

पूर्वी बरं सुरुवातीला केव्हातरी का होईना नवऱ्याकडनं शंभर-सव्वाशेची मनीऑर्डर यायची. पूर्वी म्हणजे दुसरं लग्न करायसाठी एकदाच येऊन नवऱ्यानं कागदांवर सह्या घेतल्या, त्याच्यानंतर काही दिवसांनी त्याला घटस्फोट मिळाला तेव्हा पोटगी द्यायचं कबूल केलं होतं त्यानं कोर्टात.

तिला आठवलं पायातलं व्यंग माहीत असूनही त्यानं पत्करली ह्याचं आई-अप्पांना कोण कौतुक. कारण घरची शेती होतीच. शिवाय साखर कारखान्यात नोकरीलाही होता. गाळपाच्या सीझनला गाड्या भरभरून ऊस घालायला माणसं यायची तेव्हा तर त्याला उसंत नसायची.

संचालक मंडळी सगळी राजकारणात. त्यामुळं मॅनेजरला त्याच्यासारख्या माणसांवर अवलंबून राहावं लागे. सुरुवातीला तिचं सासरी छान चाललं होतं. पुढं त्याचं काय बिनसलं तोच जाणे. त्यानं म्हणे आईवडिलांच्या सांगण्यावरनं लग्नं केलं. पण, नंतर तिला कळलं कोल्हापुरात कोणा पुढाऱ्याच्या मुलीशी त्यानं सूत जमवलं होतं. कॉलेजातच. तेच पुढं जमलं वाटतं.

ही फक्त दहावी झालेली. आणीबाणीनंतर इंदिराबाई पुन्हा निवडून आल्या तेव्हा. खरं तर त्याला बहुतेक तिची लाज वाटायला लागली असावी. दोनच वर्षांत दिली पाठवून माहेरी. तेव्हा अनंता दहावीला बसलेला. पुढे कॉलेजला म्हणून गेला खरा शहरात, पण वसतिगृहाचा खर्च अप्पांना झेपणारा नव्हता. त्यात ती परत आली म्हणून तिच्या आईनं अंथरूण धरलेलं. अप्पांची कमाई अशी फारशी नव्हतीच. धान्य शेतावरनं यायचं, पण एरवी अप्पा खालच्या पडवीत पंचांग घेऊन बसत, ज्योतिष सांगायला नाहीतर पत्रिका बनवून द्यायला. त्यात काय मिळणार होतं असं. नाही म्हणायला गोव्याच्या मुक्तिसंग्रामात तुरुंगात गेलेले पोर्तुगिजांच्या, त्याबद्दल महाराष्ट्र सरकारकडनं पेन्शन मिळत होती.

तेव्हा ते नुकतंच लग्न झालेलं असूनही गेलेले! आई केव्हा केव्हा तिला सांगायची. तिचा जन्म गोवा स्वतंत्र झाल्यावरचा. म्हणूनच तिचं नांव मुक्ता ठेवलेलं. लोकांनी आईला चिडवलंसुद्धा होतं.

'काय यमुनाबाई, बळवंतरावांनी शेवटी मुक्ती दिली म्हणायची तुम्हाला!'

हा टोमणा होता. अप्पा तेव्हा कुठल्यातरी चळवळीत नेहमी बाहेरच असत म्हणून. पुढं चिनी युद्ध हरल्यावर भाऊ झाला म्हणून तेव्हाही लोक असंच काहीतरी बडबडली. पण अप्पांचा स्वभाव शांतच. सतत ज्योतिषावरची पुस्तकं वाचायचे नि कुंडल्या मांडायचे. अगदी राजकीय व्यक्तींच्यासुद्धा. लहान असताना तिला अशाच पत्रिकांच्या नकला करायला सांगायचे! त्यांच्याच डेस्कावरची दौत-टाक घेऊन. अक्षर चांगलं होतं म्हणून. ती मग स्वत:चाही अभ्यास तिथेच बसून करायची. आई मग ओरडायची. तिला नि अप्पांनाही.

'काय तिला सारखं डेस्काजवळ बसायला सांगता? घरातली कामं कधी येणार मग?'

'ती तर पुढं करायचीच आहेत. पण शिकतेय तोवर अभ्यास करू देत तिला. अनंताचं कांही लक्षण ठीक नाही वाटत.'

अप्पांच भाकीत थोडंफार खरं होतं. अनंता रखडतच बारावी झाला नि पोलिसदलात भरती झाला. तेव्हा ती नुकतीच मागे आलेली होती. अनंता तिच्या नवऱ्याला जाब विचारायला कोल्हापुरातही जाऊन आलेला. पण, नुकतीच मिसरूड फुटलेल्या त्याला कोण दाद देणार.

अप्पांच्या सत्त्याग्रही मित्रांच्या ओळखीचाही उपयोग झाला नव्हता. तिच्या नवऱ्याला राजकारण्यांचा पाठिंबा होता. अनंता निघून गेला नि पुढं केव्हातरी पोटगी सुरू झाली. पैशांच्या तंगीत अप्पांना कोर्टकचेऱ्या करायला नकोत म्हणून तिनंच कागदांवर सह्या दिल्या होत्या!

पण तिचं आयुष्य मात्र फुकट गेलं इथंच खस्ता खाण्यात. आई आजारी नि अप्पा खचलेले. अनंता निघून गेलेला. जमेल तेवढे दिवस शेतं संभाळली नि मग दिली कुळांकडं. त्यांना बरंच झालं. उसाचं हुकमी उत्पन्न घ्यायला. घरच्यापुरतं धान्य येत होतं. हाताशी पैसेही असायचे. गरजा भागल्यामुळे असेल पण मग सगळेच एकदम गप्प झालेले.

तडतड आवाज झाल्यावर ती भानावर आली. लाकडं पुन्हा जळत मागे आलेली नि वरच्या भाताचं पाणी सुकून खाली तो लागल्याचा आवाज यायला लागला होता. तिनं कपाळावर हात मारून घेत पदराच्या टोकानं भगुणं खाली ठेवलं, चुलीच्याच पुढ्यात नि तळावर बाजूनं भांड्यातलं पाणी मारलं.

आता कोळसा झालेली खरपुडी काढून मिळेल ते खायचं. तिथंच ताट ओढून बसली, उरलीसुरली शितं चिवडायला!

तिला अप्पांच्या वैश्वदेवाची आठवण झाली. त्यांचा मुटकाभर भात बऱ्याचदा लागायचा. पण ते चार-पाच आहुत्या देण्यापुरता काढून घ्यायचे. नि मग नेहमीसारखं 'इदं न मम' म्हणायला तेवढं पुरायचं. मात्र ते अगदी सूर्य माथ्यावर आला की.

सगळ्याच बाबतीत त्यांनी मग 'इदं न मम' म्हणायला

सुरुवात केली की काय तेच जाणोत!

अप्पांच्या काळजीमुळे इच्छा नसूनही थोडं वाट्याला येईल ते खावं नि स्वस्थ बसावं.

नशिबावरचा राग काढायसाठी तिनं गेल्या दोन दिवसांत पूजासुद्धा केली नव्हती!

आईसुद्धा असाच त्रागा करायची, मरायच्या आधी. म्हणायची, 'काय एवढं लंकेचं राज्य दिलंय तुमच्या त्या वैश्वदेवानं? लेक माघारी आलेली नि एकुलता एक पोर गेला पोलिसात. तेही आता अमरावती का कुठं. तिकडं त्या नक्षलवादी का कोणाशी सामना. सतत जिवाला घोर.'

'अग, तू नको घोर लावून घेऊ. काही नाही होणार त्याला. मी पत्रिका पाह्यलीय त्याची.'

'स्वत:ची पाह्यल्यवतीत का कधी? तिकडं गोव्यात गेलावतात तेव्हा लाठ्या पडल्याच ना.'

'पण आलो ना सुखरूप. तसाच येईल तोही.'

'येऊं दे तरी एकदा. पाहावंसं वाटतंय. आणि आला तरी तिकडं बिऱ्हाडात. पोराला तरी घेऊन ये म्हणावं. जोजवीन, मांडीवर घेईन आणि पाहीन एकदा डोळेभरून... माझं काय खरं नाही आता.'

तिच्या मनात आलं.

आईला तसं झालं काहीच नव्हतं. मग गेली कशानं एवढ्या लवकर? खंगतच गेली. खाणंपिणंही कमी होत गेलं.

तिच्या मनात अनंता दूर गेला त्याचा सल होता की त्याला काही होईल ह्याची काळजी? पण एका परी ती नशीबवानच म्हणायची. नातू बघण्याचं सुख मिळालं; पण तो पोरका झालेला पाहाण्याचं दु:ख टळलं!

ती गेली नि पुढं मग अनंता तिकडच्या चकमकीत मारला गेला. जीपच उडवली म्हणे त्या नक्षलवाद्यांनी.

आई असती तर त्या धक्क्यानंच गेली असती. किंवा मग अंथरूणच धरलं असतं तिनं.

प्राक्तन एकेकाचं. अप्पांनी मात्र स्वत:ला सांवरलं खरं. म्हणजे त्यांना सावरून उभं राहणंच भाग होतं. आपली जबाबदारी होती ना डोक्यावर.'

मग ते एकदमच शांत झाले. अगदी अलिप्तच! कोल्हापुरात जाऊन सुनेची चौकशी करून आले!

नातवालाही भेटून आले. परंतु अनंताच्या सरकारकडनं मिळणाऱ्या पैशांबद्दल अवाक्षरही काढलं नाही त्यांनी.

एवढे स्थितप्रज्ञ झाले!

विचार करता करता बसल्या जागीच तिला पेंग यायला लागली. कसाबसा घासभर भात वाढून घेत जेवली नि खरपुडी कावळ्यांना घालायला बाहेर आली. दारच्या चाफ्याखाली हात धुऊन तिथेच टेकली, रोजचा चूल सारवायचा शिरस्तासुद्धा मोडून. तिला एकदमच ग्लानी आल्यासारखंच झालं.

कशाबशा दोन पायऱ्या चढून माजघरात आली नि आडवी झाली तरी डोक्यातलं विचारचक्र कांही थांबेना...

सुरुवातीला ट्रेनिंगला गेलेला अनंता पुढं अमरावतीला गेला. ते ऐकून आई आणखी खचली.

आधी जावयाचे प्रताप कळल्यामुळं मुलीची काळजी होतीच. आता मुलाचीही काळजी करायला लागली. मधेच केव्हातरी सुटीत आला तेव्हा पुण्याजवळच्या ओतूरकडची मुलगी ठरवून लग्न करून गेलासुद्धा. अप्पांना फारसं काही बघावंच लागलं नाही, त्या दोघांच्या पत्रिकांशिवाय. वेगळ्या शाखेची असूनही अप्पा काही बोलले नाहीत. त्यांच्या मते पत्रिका चांगली होती. असेलही, पण तिच्या दृष्टीनं अनंताचं काय? पुढचं अघटित अप्पांना समजलं नसेल?

अनंता अंगानंही भरला होता. मुलगीही चांगली वाटली. जोडी तशी छान वाटली.

लग्न तसं जगावेगळंच म्हणायचं. मुलीचं वऱ्हाड मुलाच्या दारात! पुणेकर मंडळी आलेली कोल्हापुरात. आईला पुण्याला नेता येणार नव्हतंच! पण आपण तरी कुठं जाणार होतो करवली म्हणून मिरवायला? कुणी नवरानवरीच्या पदराला गाठ मारताना किंवा सोडताना नाव घ्यायला सांगितलं तर आफतच. सोडलेल्या नवऱ्याचं काय नाव घेणार. लोक नाकं मुरडतातच. उगाच हात दाखवून अवलक्षण कशाला. झालं ते बरंच म्हणायचं..

तसं लवकरच ठरवलं त्यानं लग्नाचं. पंचविशीत मुलगा झालासुद्धा. भावजय बहुतेक वेळ तिकडेच होती! माहेरी... आईला एकदा नातू दाखवून गेली. पुढं आईनंही डोळे मिटले. समाधानानं का काळजीनं तिलाच ठाऊक. अप्पा तर अगदी निर्विकार झाल्यासारखेच.

आधी माहेरी होती ओतूरला ती कोल्हापुरात येऊन राहिली बिऱ्हाड करून. जवळ मावशी का कोण होती. त्याला सारखं कुठं कुठं फिरावं लागायचं. आला की येऊन भेटून जायचा. पण ते तेवढंच. राहायचा नाही कधीच. कारण पुढं शिकवलं नाही म्हणून त्याचा बहुतेक अप्पांवर राग होता. पण अप्पांनी दुर्लक्ष केलं. काहीच बोलले नाहीत. अगदी एवढ्या जवळ असूनही वेगळं बिऱ्हाड का केलंस असंही विचारलं नाही. बहुतेक एकटाच यायचा पण आलाच भेटायला तर थोडं धान्यधुन्य पाठवून द्यायचे.

आई गेली तेव्हा तर त्याचं कुठं लांब पोस्टिंग झालेलं. मग अप्पांनाच सगळं करावं लागलं!

पेंगणाऱ्या डोळ्यांवर तळहाताची झापडं घेऊन ती मधेच कानोसा घेत असावी... कसलाही आवाज नाही तो टांग्याचा आवाज नि सदूची हाळी.. एकदमच..

आणि अचानक आखाड्याचा बांबू सरकवल्याचा आवाज आला नि ती दचकली..

तिला वाटलं, अप्पाच सदूच्या टांग्यातनं आले.. ती उठून बसली.. आता तर गाडीबिडीची वेळ नाहीच.. मग हे आले कुठून.. सदूनं आवाज दिला..

''ताई ओ ताई...''

''काय रे सदू..? आत्ता कुठून येतोहेस..?''

तो धापा टाकत झटकन खाली बसला, कावऱ्याबावऱ्या नजरेनं भोवताली बघत म्हणाला, पाणी द्या आधी.. थरथरत्या हातानं पाणी पिऊन थांबला.. पडवीच्या पायरीवर लोटा ठेवून मुक्ताच्या चेहऱ्याकडे बघतच राह्यला, काहीतरी आक्रित झाल्यासारखा घाबरून...

''अरे, बोल कांहीतरी...''

''कालीज घट करा...अप्पा अप्पा...''

पुढे मग तो जे सलग बोलू शकला ते ऐकून मुक्तानं पायरीवरच बसकण मारली नि कपाळावर हात आपटायला लागली. त्याच्या म्हणण्यानुसार तो ढग्याचा बारकू कोल्हापुरातनं गावात आलाय, त्याच्याकडून ह्याला कळालं, की...

'अप्पा गेले!'

थोडं भान आल्यावर तो पुढे बोलायला लागला... मुक्ता मुकीच झालेली.. तिच्या डोळ्यांपुढे आपलं भवितव्य दिसायला लागलं..

''मागच्या टायमाला तेनं कलं ते खरं होतं अप्पा खरंच मिरजेला गेले होते, सुनेच्या दुसऱ्या नवऱ्याकडे...''

पुढे त्यानं सांगितलेली हकिगत अशी...

त्या तिघांचा मोटारसायकलवर ॲक्सिडंट झालेला! मागे लेकराला घेऊन बसलेली सुनबाई, दोघं जण ॲडमिट होती, पण ती लेकराला पोटाशी धरून पडली नि दोघंही वाचली.. आणि हेल्मेट असूनही नवरा गंभीर होता. तो पुढे गेलाच..!

त्याच्या घरच्यांनी सगळी व्यवस्था केली.. दोन दिवस.. अप्पा तिथेच थांबले, नातवासाठी, सुनेच्या वडिलांजवळ.. त्यांनी स्वत:ला सावरायचा खूप प्रयत्न केला नि भ्रमिष्टासारखे स्वत:शीच बोलायला लागले..

''आधी माझा लेक गेला नि आता हापण...? माझा नातू पोरकाच ऱ्हायला! माझं पत्रिकेचं ज्ञान चुकीचं होतं..? ह्या पोरीच्या नशिबात वैधव्यच लिहिलेलं होतं..? दुसरं लग्न थांबवायला हवं होतं..!''

अप्पांना ॲडमिट करावं लागलं इतका तीव्र धक्का होता. सून शुद्धीत आल्यावर लेकराला घेऊन बसली. अप्पा मात्र त्या धक्क्यातून सावरलेच नाहीत. व्याह्यांनी त्यांना समजावायचा खूप प्रयत्न केला. तेव्हा म्हणाले म्हणे,

''माझ्या स्वातंत्र्यसैनिकाच्या नातवाचं कसं होणार?'

स्वत:ला सावरत मग व्याही एवढंच म्हणाले म्हणे, 'माझी मुलगी मला जड नाही. आपल्या लेकराला ती बघेलच. मी आता तिला ओतूरलाच घेऊन जातो. कोल्हापूर काही तिला लाभलं नाहीच. दोनदोन संसार मोडले तिचे. तुम्हीपण चला आमच्याबरोबर.'

तेव्हा किंचित भानावर येत म्हणाले, ''मुक्ता, माझी मुक्ता तिकडे एकटी पडलीय. पेजपाणी करून खाते नि राहाते. माझं काय राहायलंय आता. सगळ्या घराचा विस्कोट झालाय. वैश्वदेवाला एवढी वर्षं आहुती देतोय. वंश टिकावा, पुढे चालावा म्हणून, ते हे असं?... आता शेवटची आहुती दिली की मीही जायला मोकळा..!''

एवढं सलग बोलले नि छाती दाबून बेशुद्धच झाले.. मानसिक धक्काच एवढा तीव्र होता की अप्पा तिथेच गेले. व्याह्यांची पंचाईत झाली. आधी जावई, तेही दोनदा. आणि आता हे व्याहीसुद्धा! त्यांनी निरोप पाठवला पण बॉडी ठेवता येत नाही तर आणणार कशी? त्या जावयाच्या माणसांनी मदत केली.

हे सगळं होईपर्यंत दोन दिवस उलटले. अप्पांचे उर्ध्वदेहिक व्याह्यांनी मुलीच्या हाती, लोकांच्या मदतीनंच केलं. नि तिसऱ्या दिवशी तिथेच अस्थिविसर्जनही केलं. सुन्न झालेल्या सुनेनं ते सगळं लेकराला कडेवर घेऊन केलं. ते मुलीला नि नातवाला घेऊन घरी गेले.

ते लोक आधी कोल्हापुरात घर आवरायला नि तिथून मग पुण्याला गेले असतील... आठवडा उलटला...

हे सगळं सदू प्रत्यक्ष पाह्यल्यागत पण थांबून थांबून सांगत होता, तरी मुक्ताचं लक्षच नव्हतं. तिला आपला भविष्यकाळ दिसायला लागला..एकच वेडी आशा निर्माण झाली, माहेरच्या वंशाचा दिवा केव्हातरी येईल.

तोवर तिचं लक्ष पायरीखाली असलेल्या अप्पांच्या वैश्वदेव करण्याच्या राख सांचलेल्या होमकुंडाकडे गेलं. तशी ती तिरमिरीत उठली नि ओट्यावरचा तांब्या घेऊन त्यातलं पाणी तिनं कुंडातल्या विस्तव विझलेल्या राखेवर ओतलं, स्वत:शीच बडबडत म्हणाली,

'वैश्वदेवा, हे तुला शेवटचं अर्घ्य.. आता आहुती नाही.. हीच पूर्णाहुती!'

सदू कुंडातल्या राखेकडे नि मुक्ताकडे... दोन्हीकडे आळीपाळीनं पाहात राह्यला..!

**– विजय खाडिलकर**

भ्रमणध्वनी : ९८२१२२२०४२



# अर्धविराम

**शिल्पा गडमडे-मुळे**

मी विचार केला खरंच, आपण अजून एकत्र का आहोत? कारण प्रेमापेक्षा मौन नांदत आहे आपल्या संसारात. तू तुझ्या विश्वात गुंतून गेलास आणि मी माझं विश्व हरवत गेलं. सुरुवातीला मी तुझ्याकडे यायचा रस्ता शोधत होते, आता मी माझाच शोध घेतेय.

**‘‘साहेब** घरी नाही जायचं?’’

रमेशच्या आवाजानं मानवनं मान वर केली.

त्याने थकलेली, शून्यात भिरभिरणारी नजर वर करून पाहिलं. अलीकडेपर्यंत कीबोर्डवर सराईतपणे चालणारी बोटं, मीटिंग, डेडलाइन, मेल आणि कॉलच्या तालावर नाचणारी माणसं केव्हाच आपापल्या घराच्या दिशेनं निघून गेली होती. पण मानव तिथेच थांबून राहिला होता. आपल्या सभोवतीचं गजबजलेलं वातावरण केव्हाच निवळून गेलं होतं हे मानवला लक्षातदेखील आलं नाही. आता ऑफिसमध्ये एक शांतता पसरली होती. कधी संध्याकाळ झाली, कधी अंधार झाला, काळोखाच्या सावल्या कधी दाट झाल्या हे त्याला कळलंच नाही. रमेशनं आवाज दिल्यावर त्याला आता आपणही ऑफिसबाहेर पडलं पाहिजे याची जाणीव झाली.

तो उठला, त्यानं लॅपटॉपची बॅग खांद्यावर घेतली आणि ऑफिसातून बाहेर पडला.

बाहेर हवेत अजूनही उकाडा होता. समोर रस्त्यावर पिवळसर दिव्यांच्या मंद प्रकाश पडला होता. रात्री खूप उशीर झालेला असावा, कारण रस्त्यावरची वाहतूक विरळ झाली होती. सतत धावणारी, कुणालातरी गाठायची धडपड करणारी माणसं, उजाडताच पुन्हा धावायच्या तयारीनं आपापल्या घराकडे परतली होती. छोट्या डोळ्यांतली मोठी स्वप्नं घेऊन. त्या स्वप्नांच्या मागे घेतलेली मोठी धाव, मोठ्या शहरासाठी नवीन नव्हती.

मानवदेखील अनेक वर्षं असंच जीवन जगत होता. शाळा-कॉलेजमध्ये कायम पहिल्या पाचांत असणारा, अभ्यासात हुशार, उत्कृष्ट गिटार वाजवणारा, वक्तृत्वात निपुण आणि सतत काहीतरी नवीन शिकण्याची जिद्द असलेला. त्याचं नेहमी कौतुक व्हायचं. त्याच्या यशस्वी आयुष्याचं स्वप्न, त्याच्यासोबत त्याच्या आई-वडिलांनी आणि शिक्षकांनीदेखील पाहिलं होतं.'ा सगळ्यात खेळ, मित्र यांच्यासाठी त्याला वेळ कधी काढताच आला नाही.

कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असतानाच त्याची कॅम्पस हायरिंग झाली होती. एका मोठ्या कंपनीत त्याला आकर्षक पगाराची नोकरी मिळाली आणि त्याच्या नव्या प्रवासाची सुरुवात झाली. हळूहळू तो नव्या नोकरीत, नव्या आयुष्यात रुळू लागला.

नोकरीला लागून वर्ष झालं असावं, तेव्हा त्याची ओळख मीराशी झाली. मीरा त्यांच्या ऑफिसमध्ये नुकतीच रुजू झाली होती. एका छोट्या गावातून आलेली मीरा पहिल्यांदाच मुंबईसारख्या मोठ्या शहरात आली होती. गगनचुंबी इमारती, अखंड वर्दळ, आणि सतत धावणाऱ्या लोकल ट्रेनची गती, हे सगळं तिच्यासाठी नवं होतं.

त्यांची पहिली भेट ऑफिसच्या कॅफेटेरियामध्ये झाली. त्या दिवशी मोठ्या प्रोजेक्टसाठी टीम मीटिंग होती. सकाळपासून वेगवेगळ्या टीमसोबत कॉल आणि मीटिंगमध्ये तो पूर्णपणे अडकला होता. संध्याकाळच्या सुमारास या सगळ्या गडबडीत त्याला जेवायला वेळच मिळाला नाही. तो पटकन कॉफी घ्यावी आणि सोबत काहीतरी खावं म्हणून कॅफेटेरियामध्ये आला. या ऑड वेळेला कॅफेटेरियामध्ये गर्दी कमी होती. कॉफी आणि खायला काहीतरी घेऊन मानव एका कोपऱ्यात बसला. मनात पुढच्या मीटिंगची तयारी सुरू होती. तेवढ्यात एक मुलगी ट्रे हातात घेऊन त्याच्या शेजारच्या टेबलाजवळ येऊन बसली. जांभळ्या रंगाचा साधीशी नक्षी असलेला कुर्ता, लांब केस आवळून बांधलेले, चेहऱ्यावर बावरेपण आणि डोळ्यात निरागस भाव घेऊन असलेली मीरा..

‘‘इथं बसू शकते का?’’ तिने हळू आवाजात विचारलं.

‘‘हो, जरूर.’’ मानव म्हणाला.

सुरुवातीला जरा वेळ ती गप्प होती, नंतर हळूहळू बोलायला लागली- मी मीरा.. कंपनी जॉईन करून दोन आठवडेच झालेत मला. तुमचं नाव? किती वर्षांपासून काम करताय इथे? मुंबईचेच का?’’

तिनं विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देईपर्यंत किंवा द्यायचा विचार करेपर्यंत तिचा पुढचा प्रश्न येऊन धडकत होता.

‘‘बापरे! किती हे प्रश्न. पण मी आता जरा गडबडीत आहे. संध्याकाळी भेटूया? मग तुला वेळही मिळेल, आणि मला उत्तरं देण्याची संधीही.’’ मानव हसून म्हणाला.

तिला जरा बुजल्यासारखं झालं.

संध्याकाळी मानवच्या मीटिंग संपल्या, काम आवरलं तोवर मीरा थांबली होती. तिला या नव्या शहरात परकं वाटत होतं. मानवनं पुढे केलेला मैत्रीचा हात तिनं विश्वासानं पकडला. त्या भेटीनंतरही ते अनेकदा भेटले. मीरा नेहमीच मोठ्या शहराच्या गमतीशीर गोष्टी सांगायची- कधी रस्त्याच्या नावांनी गोंधळल्याच्या, तर कधी पहिल्यांदाच मोठ्या कॅफेत कॉफी ऑर्डर करताना अडखळल्याच्या. मानवला तिच्या साधेपणाची आणि मनमोकळ्या हसण्याची सवय होऊ लागली.

ओळख ते मैत्रीचा प्रवास एकत्र आयुष्य व्यतीत करण्याच्या स्वप्नापर्यंत जाऊन पोहोचला.

लग्न झालं.. मीरा शेअरिंगच्या छोट्याशा खोलीतून मोठ्या फ्लॅटमध्ये आली. लहान जागेमध्ये खूप माणसांच्या सोबतीत वाढलेली मीरा, मोजून दोन माणसं असणाऱ्या मोठ्या घरात आली.

सुरुवातीचे काही महिने दोघांसाठीच स्वप्नासारखे होते.

नव्या घराची गोडी, एकमेकांसोबत घालवलेले खास क्षण, आणि सहजीवनाची सुरुवात. पण लग्नाच्या काही महिन्यांनंतरच मीराला जाणवायला लागलं, मानव खूप व्यग्र असतो. त्याचे कॉल, मीटिंग, रिपोर्ट या त्याच्या दिनक्रमात घराकडे लक्ष द्यायला त्याला वेळच नव्हता. मीरानं नोकरी सोडली. मला आपल्या घराकडे लक्ष द्यायचं आहे, आपल्या दोघांनाही ऑफिसच्या कामात घराकडे बघायला वेळ मिळत नाही, असं म्हणत तिनं स्वतःला घरामध्ये गुंतवून घेतलं. सुरुवातीला तिला घर सजवणं, नवनवीन पदार्थ शिकणं, पुस्तकं वाचणं या सगळ्यात आनंद मिळायचा. पुढे हळूहळू सगळे दिवस एकसारखे वाटू लागले.. ती घरात रमवून घेण्याचा प्रयत्न करत होती आणि मानव कामात बुडाला होता.

नव्याची नवलाईही हळूहळू सरली.

घरी आल्यानंतर मानव थकलेला असायचा. मीरा दिवसभराच्या आपल्या अनुभवांबद्दल सांगायला जायची, तेव्हा तो म्हणायचा, 'मीरा, आपण नंतर बोलूया का?' मी थकलोय.

''मीरा, आज फार कंटाळा आलाय.''

''सारखं काय गं बोलायचं असतं तुला.''

''मला आज अजिबात वेळ नाही.''

''मीरा, उद्या बोलूया.''

''हूं.''

असा संवाद खुंटत गेला.

ती कुठल्या तरी भावनिक गोष्टी शेअर करायचा प्रयत्न करायची, तेव्हा तो म्हणायचा, 'हे सगळं तुझ्या मनाचं खूळ आहे. आपलं सगळं व्यवस्थित चाललं आहे.'

कधी भांडणं विकोपाला गेली, सगळं असह्य झालं की ती रडायची. त्यावेळी तिला शांत करायला मानव येत नसे. ती मुसमुसत त्याच्या शेजारी झोपी जाताना तो 'काय झालं?' हे विचारायचं साधं सौजन्य दाखवत नसे. त्यावेळी तिला त्याच्या मिठीत शिरायचं असायचं पण तो तिच्याकडे पाठ फिरवून झोपून जात असे. दुसऱ्या दिवशी त्यावर चकार शब्द नसे. आणि तिनंदेखील त्यावर बोलू नये अशी त्याची अपेक्षा असे. तिनं विषय काढलाच तर तो उठून ऑफिसला जात असे.

तिला गाणी आवडायची. ती गुणगुणत असेल तर त्यात काहीतरी बोलून पार विचका करून टाकत असे.

हळूहळू ती गप्प बसायला लागली.

हळूहळू तिनं वाट पाहणं थांबवलं.

आता ती एकटी होती. अगदी त्याच्या शेजारी असूनसुद्धा.

रोज सकाळी त्याला टिफिन द्यायचा, घर आवरायचं, बाकी कामं बघायची. त्यांच्या बोलण्याचे विषय विजेचं बिल, जेवणाचा बेत, येणारे पाहुणे याच्या आसपास फिरू लागले. यानं एकवेळ घर चालू शकेल, पण नातं फुलणार नाही हे मीराला कळत होतं परंतु ती त्याबद्दल काहीच करू शकत नव्हती.

हा आधी असाच होता का?

की मीच खूप अपेक्षा करत होते? असे वेगवेगळे प्रश्न मीरा स्वतःला सतत विचारत असे.

ती काही बोलायचा प्रयत्न करायची, तेव्हा तो गुंतलेला असे त्याच्या मोबाइलमध्ये, लॅपटॉपमध्ये किंवा मेलमध्ये..

दहा-बारा दिवसांपूर्वी कुठल्यातरी क्षुल्लक कारणावरून त्यांचं भांडण झालं. वादाची कारणं क्षुल्लकच असत. संध्याकाळी परत येईपर्यंत ती नेहमीप्रमाणे शांत होईल, असा विचार करत तो नेहमीप्रमाणे उठला आणि ऑफिसला निघाला. तिचं शांत असणं म्हणजे सगळं सुरळीत चालू आहे असं त्याला वाटत असे.

तो घरातून निघताना तिच्या मोबाइलमधून वैभव जोशीची कविता बॅकग्राऊंडला सुरू होती-

एक क्षण येतो असा की बोलणे संपून जाते,<br>
राहाते आभाळ हाती चांदणे हरवून जाते..<br>
गैरसमजांचा ऋतू डोकावतो नात्यात जेव्हा<br>
जागच्या जागी मनाचे रोपटे वाळून जाते..

तो संध्याकाळी घरी परत आल्यावर नेहमीप्रमाणे घरात दिवे, संध्याकाळच्या जेवणाची गडबड, असं काहीच जाणवलं नाही.

'मीरा.' मानवने आवाज दिला, पण उत्तर आलं नाही.

डायनिंग टेबलवर त्याला एक कागद दिसला.

कागदावर लिहिलं होतं, मला थोडा वेळ हवा आहे...

मानव त्या शब्दांचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नात हरवला. पहिल्यांदाच घर रिकामं असल्याचं जाणवलं. तिच्या नसण्यानं तयार झालेली घरातली शांतता वेदनादायक वाटायला लागली. त्यानं वैतागत ती रात्र कशीबशी काढली. पुढचे काही दिवस घरात एक नीरव शांतता पसरली होती. आता उत्तरं शोधायची वेळ त्याची होती.

एक दिवस गेला, दोन दिवस गेले..आणि पाहता पाहता दहा दिवस होऊन गेले. जिला आपण कायम गृहीत धरलं तिच्या नसण्यानं तो पार हादरून गेला होता.

आज ऑफिसमधून आल्यानंतर तो थेट बाल्कनीत आला.. टोकाशी उभा राहिला.. आजूबाजूला पाहिलं.. नेहमी त्याच्या डोळ्यांना दिसणारा रस्ता, त्याच्याएवढीच पण उंचावरून दिसणारी मुंग्यांएवढी माणसं.. त्याला जगणं निरर्थक वाटू लागलं. तेवढ्यात त्याचा फोन वाजला..

स्क्रीनवर नाव होतं मीरा calling.

त्यानं पटकन मोबाइलकडे धाव घेतली.

''तू कुठे आहेस? कशी आहेस? न सांगता कुठे निघून गेलीस?''

मानवनं एका मागोमाग एक प्रश्न विचारायला सुरुवात केली.

त्यावर तेवढ्याच शांतपणे मीरा म्हणाली,

''मानव मी इथे आहे, विपश्यना सेंटरमध्ये. माझ्या आत खूप गोंधळ होता. तो समजून घेण्यासाठी मी आले होते. इथे लक्षात आलं की गोंधळ फक्त माझ्या मनात नाही.. आपल्या नात्यातदेखील आहे.''

मानव यावर काहीच बोलला नाही.

ती स्पष्टपणे पुढे बोलू लागली.

''मी विचार केला खरंच, आपण अजून एकत्र का आहोत? कारण प्रेमापेक्षा मौन नांदत आहे आपल्या संसारात. तू तुझ्या विश्वात गुंतून गेलास आणि मी माझं विश्व हरवत गेलं. सुरुवातीला मी तुझ्याकडे यायचा रस्ता शोधत होते, आता मी माझाच शोध घेतेय.

''आपल्याला एकमेकांची खरंच गरज आहे का? माझं सुख, माझं दुःख तुझ्यापर्यंत काहीच पोहचत नाही. आपण एका घरात राहतो, एकमेकांच्या सोबत नाही.'' तिचा कंठ दाटला होता..

एक एक शब्द बोलताना तिला कष्ट पडत होते.

''म्हणूनच मला हे स्पष्ट सांगायचंय–

''आता आपण आपल्या नात्याला अर्धविराम देऊ या..

एकमेकांच्या सोबतीनं पुढे जाता येईल असं वाटलं तर पुन्हा एकत्र यायचा प्रयत्न करू नाहीतर अर्धविरामापाशीच नात्याला पूर्णविराम देऊ.

''पण मला पुन्हा हरवायचं नाही.''


फोन कट झाला.

मानव बाल्कनीत उभा राहिला. अंधाराच्या पटलावर त्याला केवळ एकच गोष्ट दिसत होती 'अर्धविराम'. नातं थांबलेलं, पण संपलेलं नव्हतं. कदाचित, अजूनही पुढे जाण्याची शक्यता असलेलं.

**– शिल्पा गडमडे–मुळे**
shilpa.gadmade@gmail.com

ग्रंथाली

## युद्धलिपी
**विलास अंभोरे**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**

## रंग जीवनाचे
**सुधा हुजूरबाजार–तुंबे**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये.**
**टपालखर्च ५० रु.**



# चिमामांदा गोन्झी
## लोकप्रिय (नायजेरियन) लेखिका

संजीवनी खेर

नायजेरियाची चिमामांदा ही लेखिका आजची एक अत्यंत लोकप्रिय लेखिका आहे. वसाहतवादाच्या समाप्तीनंतरची ही एक तेजस्वी स्त्रीवादी लेखिका समजली जाते. लहान वयात तिची वाचनाची आवड घरातील, शाळेतील इनिड ब्लिटन आणि इतर इंग्लिश लेखकांच्या लेखनाने बनली होती. तिने तिच्या नायजेरियन भाषेतील लेखन वाचायला सुरुवात केली त्यात तिला स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा शोध लागला. तिच्या लेखनातील आदर्श होता, चिनुआ एचेबी आणि बूची अमेनेडा या तेथील प्रसिद्ध लेखकद्वयाचा. कारण त्यांच्या लेखनात असलेली आपल्या मातीतील माणसे, त्यांचे वागणे, रूढी, राजकारण तिला लेखनाला प्रवृत्त करू लागले. त्यातच तिच्या लेखनाचा उगम शोधता येईल. ती आजच्या काळातील ऑडिओ आणि प्रिंट माध्यमातील सर्वात जास्त ऐकली आणि वाचली जाणारी नायजेरियन लेखिका समजली जाते.

तिचा जन्म इनुगू, या नायजेरियातील गावात ईगबो (तेथील प्रतिष्ठित जमात) कुटुंबात १५ सप्टेंबर १९७७ रोजी झाला. एनसुक्का विश्वविद्यालयात तिचे १-२ वर्षे वैद्यकीय शिक्षण झाले. १९व्या वर्षी ती पुढील शिक्षणाकरता अमेरिकेत गेली. तिथे तिने कनेक्टिकट, ड्रेक्सल, जॉन हॉपस्कीन आणि येल विश्वविद्यालयात शिक्षण घेतले. २००९मध्ये तिने नायजिरियन डॉक्टर इव्हार इसेजी याच्याशी विवाह केला. त्यांना तीन मुले आहेत. एक मुलगी आणि दोन जुळे मुलगे आहेत.

तिने चार कादंबऱ्या, दोन लघुकथा संग्रह, आठवणींचा संग्रह, कविता, नाटक तसेच वृत्तपत्र, मासिके आणि नियतकालिकांत अनेक लेख लिहिले आहेत. तिला जागतिक कीर्ती मिळाली ती तिच्या 'परपल हिबिसकस' या कादंबरीने. त्यात नायजेरियातील अस्थिर राजकीय परिस्थिती, श्रीमंत घरातील धार्मिक मुस्कटदाबी, त्यात एका तरुण मुलीचे (जी या कादंबरीची निवेदक आहे) वयात येणे, मुलाने बंड करणे, आईने या साऱ्याचा शांतपणे सूड उगवणे, ह्या घटना





चिमामांदा गोन्झी


तिने कौशल्याने विणल्या आहे. तिच्या 'लेट अस ऑल बी फेमिनिस्ट' या पुस्तकाने तिचे वैचारिक विश्व जगासमोर आले. तिचे म्हणणे सर्वांना पटावे असेच आहे. त्यात केवळ स्त्रीवाद नाही तर सर्वांनी माणुसकीने वागावे हेच ध्वनित होते. धर्म, जात -तिथे जमात-देश, लिंग यांच्या यापलीकडे माणूस म्हणून वागणे आजच्या जगात अवघड पण अत्यावश्यक आहे हे ती दाखवून देते.


तिच्या लिखाणाइतकेच तिचे वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व प्रभावी आहे. आजच्या शब्दांत सांगायचे तर ती एक

महत्त्वाची इनफ्लूएन्सर आहे. तिची वस्त्रप्रावरणे म्हणजे अभिजनात एक फॅशन स्टेटमेंट असते. तिच्या रंगाच्या स्त्रीने कसे राहावे, कशी केशरचना करावी, ह्याची एक पठडी ठरून गेली होती; पण तिने केलेले ड्रेस आणि उंच व कुरळ्या केसांच्या रचना खूप प्रशंसा मिळवत आहेत. २०१८ सालचे शॉर्टी पारितोषिक तिला नायजेरियन पद्धतीच्या वेषभूषेसाठी मिळाले होते. तिचे वेगवेगळ्या विषयांवरील टेड टॉक्स जसे 'वी ऑल शुड बी फेमिनिस्ट' तुफान लोकप्रिय झाले होते. तिच्या पुरस्कारात अॅकेडेमिक आणि साहित्यिक अवॉर्ड आहेत तसेच मकार्थर फेलोशिप अमेरिकन, अकादमी ऑफ आर्ट्स अँड सायन्सेस यांचा समावेश आहे. तिचे आई आणि वडील दोघेही उच्च शिक्षित होते. सहा मुलांतील ती पाचवी आहे. इग्बो ख्रिस्ती पद्धतीने तिने आपले नाव अमांदा असे केले होते. तिचे आई वडील २०२०-२०२१मध्ये वारले. पण मुले चांगली शिकली. अमेरिकेत राहत होते तेव्हा वडील गणिताचे प्राध्यापक होते. पत्नी ग्रेस हिने समाजविज्ञान आणि मानववंशशास्त्रात पीएच.डी. केले आणि नोकरी केली. त्यानंतर ती दोघे नायजेरियाला परतले. काही काळ यादवीच्या दरम्यान त्यांनी बायफ्रा सरकारमध्ये काम केले. ग्रेसनेही सरकारी नोकरी केली. ती त्यांच्या देशातील पहिली रजिस्ट्रार होती.

बायफ्रा यादवीत जे जे घडले ते चिमामादाच्या वडिलांनी टिपून ठेवले होते. तिनेही तेव्हाच्या घटनांची नोंद तिच्या लेखनातून घेतली होती. खास करून तिच्या लघुकथांमध्ये ते प्रकर्षाने दिसते. समाजात कशी दुफळी माजवली जात होती. भिन्न धर्माची माणसे शत्रू मानून त्यांच्या हालचालींकडे पाहिले जात होते. प्रत्यक्ष जगण्यात मात्र माणसं एकमेकांना मदत करत होती. दंगलीतील त्यांना होणाऱ्या सर्वांच्या वेदना सारख्या होत्या. बायफ्रा युद्ध १९६७मध्ये सुरू झालं आणि १९७०पर्यंत चालले. त्या काळात शहरांची, गावांची झालेली धूळदाण तिने पाहिली होती, जी मन विदीर्ण करणारी होती.




या साऱ्या घटनांचा तिच्या मनावर खोलवर परिणाम झाला. तिने इग्बो आणि इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू ठेवला. नायजेरियन शाळेतून, विश्वविद्यालयातून तिने उत्तम गुणांनी शिक्षण पुरे केले. तिला अनेक बक्षिसे मिळाली. ती 'कॅम्पस' या विश्वविद्यालयीन प्रकाशनाची संपादक होती. १९९७मध्ये 'डिसिजन' हा तिचा पहिला काव्यसंग्रह तिच्या वयाच्या १९व्या वर्षी प्रकाशित झाला. त्यानंतर ती अमेरिकेला राहायला गेली. पेन्सिल्व्हानिया विश्वविद्यालयात तिचे पहिले नाटक 'फॉर द लव ऑफ बायफ्रा' प्रकाशित झाले. यात तिने युद्धाची पार्श्वभूमी घेतली आहे. सुरुवातीचे लेखन तिने आमादा एन अडीची या नावाने केले आहे.

याच काळात तिने आपले लघुकथांचे पुस्तक प्रकाशित केले. 'माय मदर, द क्रेझी आफ्रिकन' या पुस्तकात दोन एकमेकांहून अगदी वेगळ्या असणाऱ्या संस्कृतींचा संघर्ष टिपला आहे. कॉलेजातील अभ्यास सुरू असतानाच तिने तेथील नियतकालिकांत लेखन सुरू ठेवले होते. तेव्हा ती आपल्या डॉक्टर बहिणीकडे राहत होती. बहीण व्यवसायानिमित्त सामान्य लोकांत मिसळत होती त्यामुळे तिचे अनुभव तळागाळातील लोकांच्या संघर्षाविषयी असत. तिचेही अनुभव लेखिका ऐकत होती. एकूणच कलर्ड लोकांचे अमेरिकेत राहणे, छुपा रंगभेद तिला जाणवत होता. आज अमेरिकेत ह्या विषयाने उग्र रूप धारण केलेले दिसतेय.

लेखिकेने लिहिलेली पहिली कादंबरी 'परपल हिबिसकस' -जांभळे जास्वंद- वाचकांनी डोक्यावर घेतली. ह्या कादंबरीला प्रथम प्रकाशनाचे कॉमन वेल्थ पारितोषिक मिळाले होते. त्यातील कथानकाचे सामर्थ्य वाचकाला पुस्तक हातातून खाली ठेवू देत नाही. तिची पात्रे ही ढोबळ नाहीत तर गुंतागुंतीची आहेत. त्यातील त्यांचे वागणे एका परीने अत्यंत मृदू दिसते तर दुसऱ्या बाजूने अत्यंत क्रूर असते. त्यामुळे ती माणसे चांगली की वाईट हे ठरवणे अशक्य होते. कथानक प्रामुख्याने चार व्यक्तींभोवती फिरते. आई, वडील, मुलगी आणि भाऊ.

ही सर्व कथा निवेदिका 'कंबिली' वाचकाला कथन करते. म्हणजेच गोष्ट तिच्या दृष्टिकोनातून सांगितली गेलीय. ही पौगंडावस्थेतील नायजेरियन तरुणी आहे. सधन घरातील

ही मुलगी आहे. नायजेरियातील वसाहतवादानंतरचा हा काळ आहे. धार्मिक अतिरेक, संस्कृती, प्रतिष्ठा हे सर्व भोवतालचे वातावरण आहे. खरे तर स्वत:ला, स्वत:च्या संस्कृतीला शोधायचा हा काळ होता. वसाहतवादाचे परिणाम फक्त सामाजिक वातावरणावरच होतात असे नाही तर समाजातील संस्था, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक सवयींवरदेखील होत असतात. त्यात एक तर लोकांच्या अस्मिता अधिक टोकदार होतात किंवा पार चिरडल्या जातात. ही कादंबरी ती अमेरिकेत असताना आणि स्वदेशाची आठवण येत असताना लिहिली गेली आहे. त्यात थोडी स्मरण कातरता आहे. तिच्या कादंबऱ्या जसे 'हाफ ऑफ अ यलो सन' 'अमेरिकाना' यांचे तीसहून अधिक भाषांत अनुवाद झाले आहेत.

कंबिली आणि तिचा भाऊ जाजा दोघे वडिलांचा आदर करत असतात. पण मुलगा म्हणून वडिलांची जाजाकडून, कॅथलिक परंपरा काटेकोरपणे चालवण्याची अपेक्षा असते. ते गावातील खूप धनवान, प्रतिष्ठाप्राप्त गृहस्थ असतात. त्यातून चर्चमधील व्यवहारातही त्यांच्या मताला मान असतो. चर्चमधील प्रार्थना, प्रवचने, रीतिरिवाज यांचे आपल्या मुलाने काटेकोरपणे पालन करावे अशी त्यांची अपेक्षा असते. तर जाजा त्याच्या वयाला अनुसरून त्याकडे दुर्लक्ष करत असतो. त्यामुळे तो वडिलांच्या रागाला बळी पडत असतो. कंबिलीचे आपल्या वडिलांवर प्रेम असते. ते तिचे खूप लाड करत असतात पण काही चुकले तर भयंकर वाटावी अशी शिक्षाही करत असतात. देवाच्या दारी कुठलीही चूक ही शिक्षेला पात्र असते आणि त्याखेरीज त्याचे परिमार्जन होत नाही असे त्यांचे ठाम मत असते. कॅथलिक धर्मातील एखाद्या विधीला हजर नसणे, त्यातील विधीचे नीट पालन न करणे हे त्यांच्या मते घोर पाप असते. त्यासाठी ते तापलेल्या पाण्यात कोवळ्या मुलीचे पाय भाजेपर्यंत बुडवून ठेवतात.

आपल्या प्रिय पत्नीला आणखी मुले नाहीत म्हणून जसे इतर पुरुष करतात तसे दुसरी बायको करत नाहीत. परंतु त्यांच्या दृष्टीने अनुचित असे तिच्याकडून काही घडले तर ते तिला बेदम मारतही असतात. त्यात तिच्या अवघडलेल्या स्थितीचा विचार करत नाहीत. मुलांना आईच्या अंगावर आलेल्या माराच्या वळांवरून कळत असे पण ती काही सांगत नाही. युजिन आणि मुलांची आई बिट्रीयास हे चांगले जोडपे असल्याची बतावणी करत असतात. युजिनचे वडील हे स्थानिक धर्माचे पालन करत असतात पण युजिनना ते नापसंत असते. त्यामुळे आपल्या आजोबांकडे मुलांनी दहा मिनिटांपेक्षा अधिक बसलेले त्यांना खपत नसे. अगदी शेजारी त्यांचे घर असूनही कारनेच मोठेपणा दाखवायला ते मुलांना पाठवत असतात, ड्रायव्हर त्यांच्यावर हेरगिरी करत असतो.

दुसऱ्या बाजूला आपल्या सहकारी पत्रकार संपादकाला सरकारच्या तावडीतून सोडवण्यासाठी जिवाचे रान करतात.

मुलांची आत्या इफिओमा अत्यंत मोकळ्या स्वभावाची असते. ती आपल्या वडिलांच्या पारंपरिक देवदेवतांच्या पूजेची कदर करत असते. त्यांनी कॅथलिक व्हावे असा जोर त्यांच्यावर आणत नसते. वेळप्रसंगी त्यांच्याकडे राहून त्यांची सेवा करत असते. युजिनना हे सारे अजिबात पसंत नसते. वडिलांनी धर्म बदलला नाही याचा राग ते सतत बाळगून असतात. मुलांना मात्र आत्याच्या घरचा मोकळाढाकळा माहोल खूप आवडत असतो. तिथे मतप्रदर्शनाला, मोठ्याने हसण्याला बंदी नसते. आजोबांचे वेगळेपण जपत, त्यांचे प्रेम, त्यांची माया, त्यांचे वृद्ध झालेले हात डोक्यावरून फिरवून घ्यायला आवडत असते. त्यांच्या परिसरातील फादर, इग्बो परंपरेतील गाणी आपल्या चर्चमध्ये गात असतात. त्यात त्यांच्या कॅथलिक धर्मव्यवस्थेला अडसर येत नसतो. हाच मोकळेपणा मुलांना आवडत असतो. तिच्या घरच्या वातावरणात वडिलांच्या धाकाने असलेला जखडलेपणा नसतो. इग्बो संस्कृतीही त्यांच्या परिसरातील संस्कारांचा भाग असतोच.

कंबिली हे सारे पाहत असते. आपले निष्कर्ष काढत असते. एकीकडे वडिलांबद्दल आदर आणि भीती असते. दुसरीकडे आत्याकडील- इफिओमाकडील- खुल्या हवेच्या परिणाम असतो. वयात येतानाच्या भावना उसळ्या मारत असतात. तिला तरुण फादर अमादी यांचे आकर्षण वाटत असते. पण ते प्रेम अस्फुटच राहते.

या कादंबरीत जास्वंदीच्या जांभळ्या रंगाचा वापर लेखिकेने विचारस्वातंत्र्य, मोकळेपणा, आनंद दाखवण्यासाठी केला आहे. कंबिलीच्या भावाने, जाजाने, आत्याच्या बागेतील जास्वंदीच्या फांद्या कापून आणून फ्रीजमध्ये ठेवलेल्या असतात, आपल्याही बागेत लावण्यासाठी. त्या त्यांच्याकडे लागू शकत नाहीत. तो बदल होणे असंभव असते. एकीकडे वडील वर्तमानपत्र आणि फॅक्टरीच्या लोकांना मदत करतात, बातमीच्या स्वातंत्र्यासाठी सरकारचा राग ओढवलेल्या संपादकाला सोडवून आणतात. मजुरांचे संसार चालवायला पैसे देतात. आपल्या माणसांची सुटका करतात, पण घरी मात्र पत्नीच्या गर्भपातानंतरही त्यांची दंडेली सुरूच असते.

इफिओमा आत्याकडे राहायला आल्यावरची घटना तिच्या नजरेसमोर तरळत होती- बाबांनी मला अगदी मरेपर्यंत मारले होते. बेल्टने जमिनीवर पाडून लाथेने तुडवत. अपराध काय होता? वास्तविक माझा नव्हता तर जाजाचा होता पण मी आपल्यावर ओढवून घेतला होता. तो म्हणजे आजोबांचे एक पेंटिंग त्याने घरी आणले होते. तो म्हणत होता, 'माझे हात नि चेहरा किती आजोबांसारखा आहे न?' झाले! हे बोलायला आणि बाबा यायला एकच गाठ पडते. 'कुणी केला हा अपराध? ते कडाडतात. 'मी मी' आम्ही दोघेही ते

स्वीकारायला तयार होतात. पण बाबांनी मला जे झोडपले ते मी थेट हॉस्पिटलात गंभीर रुग्णांच्या वॉर्डमध्ये दाखल होते. फादर अमाडी माझी अत्यंत प्रेमाने, आस्थेने चौकशी करायला येत होते. मला जखमांनी वेदना होत होत्या पण त्यांच्या येण्याने मी खूप सुखावत होते. त्यांचा चेहरा माझ्या अगदी जवळ येई. ते असेच माझ्याजवळ असावेत अस वाटे. त्यासाठी असे पडून राहायला लागले तरी चालणार होते.

माझ्या मैत्रिणी तशाही फादर अमादीवरून चिडवत होत्याच. मी रोमांचित होत होते. ह्या भावनांचा प्रत्यक्षात काय परिणाम होणार होता हे मलाही उमगत नव्हते. सध्या हे दूरचे प्रेम आवडत, लुभावत होते हे नक्की. हृदय धडधडे, मन भिरभिरे नुसते त्यांच्या नावाने. देवा काय करू मी? कुठे लपवू माझे प्रेम? अमादीशी चिरस्थायी संबंध होण्याची शक्यता त्याच्या कॅथलिक धर्मगुरू असल्याने दूरची वाटत असते. तरी त्यांच्याबद्दल वाटणारी ओढ अस्वस्थ करणारी असते.

बाबा युजिनचे वागणे दिवसेंदिवस अधिक क्रूर होत चाललेले असते. त्यांच्या मागे समाजातले, व्यवसायातले अनेक व्याप असतात. त्याचा ताण असतो आणि त्याचा राग ते पत्नी-मुलांवर काढत असतात. मुलगा जाजा त्यांच्या हाती लागत नसतो. पत्नी मात्र त्यांच्या तावडीत सापडते. ह्यावेळीही असेच होते. तिला ते बेदम मारतात. त्यात ती रक्तबंबाळ होते. खरे तर तिचा गर्भपात होतो. तशीच ती आपल्या नणंदेकडे येते. साहजिकच सगळे बावरतात. ही मात्र आपल्या पतीच्या चांगुलपणाचे वर्णन करू लागते. त्यांचे काही चूक नाही, त्यांच्यावर समजातील कामाचे खूप ताण आहेत, इत्यादी. ते लोकांना मदत करतात. त्यांचे संसार चालवायला मदत करतात पण इफिओमाला काही पटत नाही. ती तिला जरा ठाम राहायला सांगत असते. ही मात्र दुसऱ्या दिवशीही युजिन तिला घरी न्यायल्या आल्यावर त्यांच्याबरोबर जाते. सारे हतबुद्ध होतात.

एक दिवस अघटित होते. युजीन ऑफिसात काम करत असताना अचानक टेबलावरच कोसळतात. घरी निरोप येतो मुले घाबरतात. या दरम्यान मुले आणि पत्नी आत्याकडेच राहत असतात. मुले आपल्या आत्याकडे अधिक खुश असतात. आपल्या घरीही असे वातावरण असते, तर बरे झाले असते, असे त्यांना वाटत असते, पण ते होणे नसते. यादवीच्या भीतीने त्यांना तिथेच ठेवलेले असते. युजिनचा असा अचानक अंत होतो. त्यांना अन्नातून विषबाधा झालेली असते. आता संशयाची सुई घरच्याभोवतीच फिरू लागते. त्यांच्या चहामधून उंदराचे विष पोटात गेलेले असते. पोलिस घरी येतात. तेव्हा जाजा पुढे येतो. 'माझंच हे कृत्य' म्हणतो. आई 'नाही नाही' करत असते, पण तो खुणेने तिला शांत राहायला सांगतो. आपण मोठे वकील करू नि तुला सोडवू असे आई सांगते. घरातले सगळेच त्यांच्या मायलेकी दोघी जणी त्याचा डबा घेऊन तुरुंगात जात असतात. त्याच्या पाठीशी असतात. लवकर म्हटले तरी कोर्टाच्या कामात वेळ लागत असतो. अखेर त्याची सुटका होते. इकडे राजकारणानेही कूस बदललेली असते. अगोदरच्या सरकारने युजिनचा काटा काढला असा निर्णय लागतो.


सगळे जण आत्यासह अमेरिकेला जायची योजना आखतात. 'तिकडे गेल्यावर आपण आत्या इफिओमाकडे जांभळी जास्वंद लावू' अशी योजना जाजा करू लागतो. इथेच कादंबरी संपते.

चिमामंडाचे कथा सांगायचे कौशल्य आपल्याला पानोपानी जाणवते. तेच कौशल्य तिच्या लघुकथांमध्येही जाणवते. अधिक काटेकोरपणे ती स्वभाव, घटना, परिणाम रेखाटते की वाचणारा त्यात गुंतून जातो. जागतिक पटलावरची ही महत्त्वाची लेखिका आहे. तिची पुस्तके आणून वाचा.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

॥ग्रंथाली॥

**गझलकार चंद्रशेकर सानेकर यांची पुस्तके**



**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**



**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**



**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवाची शानदार सांगता...

ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवाची सांगता पुण्यात ४ ते ६ एप्रिल रोजी सांगीतिक मैफल आणि साहित्याचा उत्सव करून उत्साहात पार पडली.

बालगंधर्व रंगमंदिरात विदुषी, पद्मश्री अश्विनी भिडे-देशपांडे आणि भुवनेश कोमकली यांच्या गायनाने सांगता समारंभाची सुरुवात झाली. त्यांचे गायन सुरू असताना प्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांनी त्यांचे पोर्ट्रेट चितारले. कार्यक्रमात या दोन कलावंतांना ते कुमार केतकर, श्रीहर्ष फेणे, राजीव श्रीखंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मध्यंतरानंतर डॉ. मृण्मयी भजक आणि सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रेझेंटेशन करत ग्रंथालीची पाच दशकांची वाटचाल आणि भविष्याची धोरणे याबद्दल माहिती दिली. दहा कोटी रुपयांचा कॉर्पस निधी उभारून संस्थेला पुढील काळासाठी बळकट करण्याची घोषणा केली. या कॉर्पससाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यातून डिजिटल माध्यमातून काही उपक्रम आणि साहित्यविषयक, शास्त्रीय भान रुजण्यासाठी शालेय पातळीवर पर्यावरणविषयक सजगता यावी याबद्दल वातावरण निर्माण करण्यासाठी उपक्रम योजण्याबद्दल माहिती दिली.

५ आणि ६ एप्रिल २०२५ रोजी ज्योत्स्ना भोळे सभागृह आणि श्रीराम लागू रंग-अवकाश येथे जयवंत दळवी, गंगाधर गाडगीळ आणि विद्याधर पुंडलीक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या व्यक्तित्व आणि साहित्य याचा स्मृतिजागर साजरा झाला. रामदास भटकळ, कुमार केतकर यांच्या मार्गदर्शनात त्याची आखणी करण्यात आली.

या कार्यक्रमांनी अभिजात साहित्याचा पुनःप्रत्यय दिला तो सर्वच कलावंतांनी सादर केलेल्या तितक्याच अभिजात अभिवाचनामुळे आणि कसदार अभिनयामुळे. सुहास जोशी, प्रदीप वेलणकर, स्वाती चिटणीस आणि प्राजक्त देशमुख यांनी 'नातीगोती', 'बॅरिस्टर' नाटकांतील प्रसंग उभे केले. शैलेश दातार यांनी 'बॅरिस्टर' नाटकाच्या निर्मितीची विजया मेहता यांनी लिहिलेली आठवण उद्धृत केली. 'ठणठणपाळ', 'अलाणे फलाणे' यांचे वाचन आणि त्यांनी जागवलेल्या दळवी यांच्या आठवणींनी रसिकांना आनंद दिला. गंगाधर गाडगीळ यांच्या 'रहस्य आणि तरुणी' हे नाटक, 'दुर्दम्य'मधील उताऱ्याचे वाचन, 'कडू आणि गोड' कथेचे अभिवाचन, 'स्मृतिचित्रे', 'ठणठणपाळ', वासंती गाडगीळ यांच्या आत्मचरित्रातील उतारा यांचे प्रमोद पवार, ऐश्वर्या नारकर, पुष्कर श्रोत्री, अनिता दाते, मधुरा वेलणकर-साटम आणि रजनी वेलणकर यांनी तितक्याच ताकदीने सादर केले. तिसऱ्या दिवशी, रविवारी सकाळी विद्याधर पुंडलीक यांच्या 'पोपटी चौकट' नाटिकेचे बहारदार अभिवाचन अभिजित खांडकेकर व गौतमी देशपांडे यांनी केले. चंद्रकांत काळे यांनी आईच्या व्यक्तिचित्रणाचे तर मोनिका गजेंद्रगडकर यांनी त्यांच्या आई रागिणी पुंडलीक यांच्या आत्मकथनातील विवाह जुळतानाच्या वर्णनाचे हृद्य वाचन केले. कार्यक्रमाची आणि सुवर्णमहोत्सवाची सांगता पुंडलीक यांच्या 'चक्र' या दीर्घांकाने झाली. प्रमोद पवार दिग्दर्शित पूर्वा पवार, विशाखा म्हामणकर, मोहित वैद्य अभिनित या प्रवेशाने रसिकांना मुग्ध केले.

दळवी, गाडगीळ आणि पुंडलीक यांचीही पोर्ट्रेट विजयराज बोधनकर यांनी उत्कृष्ट चितारली. ती त्यांच्या वारसांना सुपूर्द करण्यात आली.

राजीव जोशी यांच्या लेखन-दिग्दर्शनातून साकारलेली या तिन्ही साहित्यिकांवर आधारित लघुचित्रफीत दाखवण्यात आली. या तिन्ही साहित्यिकांच्या व्यक्तित्व आणि लेखनाची झलक दाखवणाऱ्या पुस्तिकांचे प्रकाशन झाले. डॉ. लतिका भानुशाली यांनी त्या संपादित केल्या आहेत. अभिजित खांडकेकर आणि अनिता दाते यांनी गाडगीळ व पुंडलीक यांच्या कार्यक्रमांचे निवेदनही उत्तम केले. त्याच्या संहिता राजीव नाईक, मोनिका गजेंद्रगडकर आणि कुमार केतकर यांच्या साहाय्याने अरुण जोशी यांनी लिहिल्या होत्या.

सुनील महाजन (संवाद, पुणे,) राजेश देशमुख, शुभांगी दामले (महाराष्ट्र कल्चरल सेंटर), पुणे महानगरपालिका, यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सारस्वत बँक, शाश्वत रिॲल्टी, बँक ऑफ महाराष्ट्र, वसंत विहार रिॲल्टी प्रा. लि., प्रशांत कॉर्नर यांच्या सहयोगाने हे कार्यक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. याला पाठबळ दिले अभिजित गाडगीळ, कल्पना गुटमन आणि चित्रा गाडगीळ, गिरीश दळवी, मोनिका व अभिजित गजेंद्रगडकर यांच्या बहुमोल सहकार्याने. पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त राजीव नंदकर, मोहन काळे, एनसीआरएचे अध्यक्ष डॉ. जे. के. सोळंकी, अजित कवडे, शाश्वत रिल्टीचे श्रीकांत सूर्यवंशी, वसंत विहार रिल्टी प्रा. लि.चे अंकुर पंधे, प्रशांत कॉर्नरचे सकपाळ यांच्या व्यक्तिगत आस्थेने कार्यक्रमांचे आयोजन करणे सोपे झाले. धनश्री धारप यांचे को-ऑर्डिनेशन, समीर कदम यांचे व्हिडिओ एडिटिंग, हेमंत जोशी यांचे कलानिर्देशन, योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे, आर्या करंगुटकर, सौमित्र शिंदे, किशोर कांबळे, हरिप्रसाद जयस्वाल यांचे सहकार्य होते.

●

# ऐल तटावर पैल तटावर : कादंबरी विशेष




**सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे**

कवयित्री सुनंदा भोसेकर आणि ललित लेखिका राणी दुर्वे ग्रंथाली प्रतिभांगण येथे एप्रिल २०२४ पासून 'ऐल तटावर पैल तटावर' हा साहित्यविषयक कार्यक्रम सादर करीत आहेत. १९६०पासून ते आजतागायत लिहिल्या गेलेल्या साहित्याचा वेध या कार्यक्रममालिकेतून घेण्यात येत आहे. सोमवार, २४ मार्च २०२५ रोजी या कार्यक्रमाच्या दहाव्या व अकराव्या भागात सुनंदा आणि राणी यांनी कादंबरी विशेष हा भाग सादर केला. आशय व रचना या दोन्ही अंगांनी कादंबरीत कोणती स्थित्यंतरे येत गेली, कादंबरी या साहित्यप्रकारात कोणते नवे प्रयोग केले गेले याचे साध्यासोप्या भाषेत विवेचन व विविध कादंबऱ्यांमधील निवडक उताऱ्यांचे अभिवाचन या कार्यक्रमात करण्यात आले.

'कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली व त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्र, प्रसंग-अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेली साहित्यकृती असते, जिच्यात एखाद्या पोटसमूहाचे, पोटसंस्कृतीचे तपशिलांसह दर्शन घडवत संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा उभा-आडवा छेद घेतलेला असतो.' अशा भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीविषयक विश्लेषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. १८५७ मध्ये बाबा पदमनजी यांनी लिहिलेली 'यमुनापर्यटन' ही कादंबरी ते आज २०२५मधील कादंबरी म्हणजे जवळपास पावणेदोनशे वर्षांचा कादंबरीचा मोठा पट आहे. त्यापैकी १९६०पासूनच्या आजतागयत लिहिल्या गेलेला या कादंबरीचा पट राणी आणि सुनंदा या दोघींनी उलगडला. फडके-खांडेकर वळणाची कादंबरी आशय व मांडणीच्या अंगाने कशी बदलत गेली हे उलगडताना गोनीदांच्या 'पवनाकाठचा धोंडी', श्री.ना. पेंडसे, माडगुळकर यांच्या प्रादेशिकतेच्या अंगाने जाणाऱ्या कादंबऱ्या, आनंद साधले, सुमती क्षेत्रमाडे, बा. भ. बोरकर, शिवाजी सावंत, रणजित देसाई, ना. स. इनामदार, विश्वास पाटील, मधु मंगेश कर्णिक, भाऊ पाध्ये, राजन गवस, रंगनाथ पठारे, मकरंद साठे, शांता गोखले, पु.शि. रेगे, कमल देसाई, अनंत सामंत, कृष्णात खोत, माधव सावरगावकर, नंदा खरे, अभिराम भडकमकर, प्रसाद कुमठेकर सचिन कुंडलकर, नामदेव कांबळे, किरण गुरव, देविदास सौदागर अशा विविध लेखक लेखिकांच्या कादंबरीलेखनाची वैशिष्ट्ये मांडत अभिवाचनाच्या अंगाने कादंबरी विशेष भाग अधिकाधिक रंगत गेला. ग्रामीण, दलित, प्रादेशिक, स्त्रीवादी, आधुनिक, ऐतिहासिक, पौराणिक, गुढकथा असे विविध प्रवाह एकत्रित येत कादंबरी अधिकाधिक कशी समृद्ध होत गेली याचा प्रत्यय प्रेक्षकांना 'ऐल तटावर पैल तटावर' ऐकताना आला. संपूर्ण कार्यक्रममालिका ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

**– अश्विनी भोईर**
समन्वयक, ग्रंथाली-प्रतिभांगण

# ‘ऐल तटावर पैल तटावर’ कार्यक्रमाचा समारोप




वांद्रे येथील ‘ग्रंथाली प्रतिभांगण’ येथे आरोग्य, सामजिक, साहित्यिक, पुस्तक प्रकाशने, चित्रप्रदर्शन असे विविध उपक्रम व कार्यक्रम घडत असतात. बॉलीवूडमधील कलाकारांसाठी प्रसिद्ध असलेल्या मुंबईतील ब्रॅण्ड स्टॅण्ड या उच्चभ्रू वस्तीच्या परिसरात मराठी माणसांचे एक सांस्कृतिक-सामाजिक केंद्र म्हणून ‘प्रतिभांगण’मराठी भावजीवनावर आपला ठसा उमटवत आहे. तेथे घडणाऱ्या विविध कार्यक्रमांपैकी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेल्या ‘ऐल तटावर पैल तटावर’ या साहित्यविषयक कार्यक्रममालिकेने एप्रिल महिन्यात एक वर्ष पूर्ण केले. एप्रिल २०२४ मध्ये कवयित्री सुनंदा भोसेकर व ललितलेखिका राणी दुर्वे यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. १९६०पासून आजतागायत लिहिल्या गेलेल्या मराठी वाङ्मयाचा डिजिटल दस्तऐवज ही या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना. या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून राणी आणि सुनंदा यांनी ‘अभ्यासोनी प्रगटावे’ या उक्तीप्रमाणे लेखन करून ‘ऐल तटावर पैल तटावर’ कार्यक्रम सादर केला. ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर ‘ऐल तटावर पैल तटावर’ ही संपूर्ण कार्यक्रममालिका उपलब्ध आहे. कुठेही दुर्बोधता न येऊ देता लालित्यपूर्ण विवेचन आणि निवडक उताऱ्यांचे अभिवाचन या अंगाने २०२४-२५ या काळात सादर केला गेलेला साहित्यविषयक कार्यक्रम ही साहित्यजगतात घडलेली एक महत्त्वपूर्ण घडामोड आहे. मराठी साहित्याचे विद्यार्थी, मराठी वाचक, अभ्यासक व एकूणच येणारी काळातील मराठी भाषेविषयी आस्था असणाऱ्या भावी पिढीसाठी एक अभ्यासपूर्ण दस्तऐवज ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात ‘ऐल तटावर पैल तटावर’ कार्यक्रमाच्या माध्यमातून निर्माण झाला, हे या कार्यक्रमाचे खूप मोठे यश आहे. याबद्दल सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे यांचे ग्रंथाली परिवारातर्फे मनःपूर्वक अभिनंदन.

या कार्यक्रममालिकेचा समारोपाचा बारावा भाग गुरुवार २७ मार्च २०२५ रोजी सुनंदा आणि राणी यांनी प्रतिभांगण येथे सादर केला. समारोपाच्या भागात राणी आणि सुनंदा या दोघींनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून काय साध्य झाले व काय साध्य करायचे आहे, याविषयी विचार मांडले. ‘आम्ही आमच्यापरीने साहित्याचा अधिकाधिक मोठा अवकाश कार्यक्रमातून मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु, मराठी वाङ्मयाचा अवकाश इतका व्यापक आहे की सगळ्याच पुस्तकांना, लेखक-लेखिकांना वेळेच्या मर्यादेत सादर होणाऱ्या कार्यक्रमात सामावून घेणे कठीण आहे. यामुळे मराठी भाषेच्या अभ्यासकांनी असा दस्तऐवज तयार करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करणे आवश्यक आहेत’, असे विचार सुनंदा आणि राणी यांनी मांडले.

‘ऐल तटावर पैल तटावर’ कार्यक्रमाच्या समारोपाच्या भागास आवर्जून उपस्थित असलेले लेखक व संशोधक प्रदीप कर्णिक यांनी आपल्या छोटेखानी मनोगतात राणी दुर्वे यांची लालित्यपूर्ण शैली व सुनंदा भोसेकर यांची अभ्यासातील शिस्त आणि दोघींमध्ये असलेली संशोधकाची दृष्टी यामुळे या कार्यक्रमाने एक उंची गाठली अशा भावना व्यक्त केल्या. कवयित्री अलका बिर्जे-डिग्गीकर यांनी कविता सादर करून या कार्यक्रमाबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रम समन्वयक अश्विनी भोईर यांनी सुनंदा व राणी यांना लिहिलेल्या हृद्य पत्राचे अभिवाचन केले. ग्रंथाली विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी मनोगतातून ग्रंथालीची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचा शेवट सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या मनोगताने व कवितेने झाला. अरुण म्हात्रे यांनी प्रतिभांगणसारख्या उपक्रमशील वास्तू ठिकठिकाणी होणे ही काळाची गरज आहे व त्यासाठी ग्रंथालीने पुढाकार घेऊन पावले उचलावीत, असे मत व्यक्त केले.

**– अश्विनी भोईर**
समन्वयक, ग्रंथाली-प्रतिभांगण

# काहीतरी विशेष : थॅलेसेमिया व सिकल सेल आजारावर सर्वंकष चर्चा




डॉ. ममता मंगलानी यांच्याशी संवाद साधताना सुधा तुंबे


दिव्यांग आणि विशेष व्यक्ती यांच्या समस्या व पुनर्वसन यावर आधारित 'काही तरी विशेष' कार्यक्रमाच्या अकराव्या भागात डॉ. ममता मंगलानी यांनी थॅलेसेमिया आणि सिकल सेल आजार या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. मंगलानी या बोरिवली येथील एमसीजीएम-कॉम्प्रेहेन्सिव्ह थॅलेसेमिया केअर, पेडियाट्रिक हेमॅटॉलॉजी-ऑन्कोलॉजी आणि बीएमटी सेंटरच्या संचालक आहेत. १९८१मध्ये नायर रुग्णालयापासून डॉ. मंगलानी यांनी वैद्यकीय कामास सुरुवात केली. यानंतर सरकारी रुग्णालयांमध्ये प्राध्यापक, रजिस्ट्रार अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात त्या हेमॅटॉलॉजी-ऑन्कोलॉजी बालरोग विभागाच्या त्या विभागप्रमुख राहिल्या आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून सुरू झालेले, पेडियाट्रिक एचआयव्ही क्लिनिक हे देशातील सरकारी रुग्णालयात सुरू झालेले पहिले क्लिनिक. बोन मारो अथवा थॅलेसेमिया उपचार घेतलेल्या निम्न आर्थिक स्तरातील बालरुग्णांसाठी 'होम अवे होम' ही सुविधा सरकारी रुग्णालयात सुरू करण्यात डॉ. मंगलानी यांचे योगदान राहिले आहे. सामाजिक बांधिलकी राखून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉ. ममता मंगलानी यांची मुलाखत लेखिका सुधा तुंबे यांनी बुधवार, ९ एप्रिल २०२५ रोजी ग्रंथाली प्रतिभांगण येथे घेतली .

'थॅलेसेमिया आणि सिकल सेल हे दोन्ही आनुवंशिक आजार आहेत. ते पूर्णतः बरे करण्याचे ठोस उपचार नाहीत. परंतु थॅलेसेमियाबाधित अनेक रुग्ण आनंदी जीवन जगत असतात, याची अनेक उदाहरणे आपल्याला समाजात दिसतात.' असे डॉ. मंगलानी मुलाखतीत म्हणाल्या. थॅलेसेमिया व सिकल सेल या दोन्ही आजारांची लक्षणे व स्वरूप, त्यावर दिले जाणारे उपचार, सामाजिक प्रश्न, वैवाहिक समस्या अशा विविध पैलूंची चर्चा काही तरी विशेष कार्यक्रमातून झाली. डॉ मंगलानी यांनी मुलाखतीदरम्यान प्रेक्षकाना पुढील तीन गोष्टींचे आवाहन केले. रक्तदान करा, स्टेम सेल डोनर व्हा व विवाहापूर्वी आवश्यक त्या रक्तचाचण्या अवश्य करा, असे आवाहन डॉ. मंगलानी यांनी केले. डॉ. ममता मंगलानी यांची संपूर्ण मुलाखत 'ग्रंथाली-प्रतिभांगण' यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल.

**– अश्विनी भोईर**
समन्वयक, ग्रंथाली-प्रतिभांगण




# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**कराची ते पंचवटी**
**प्रिया श्रीकांत**




**निर्वासितपणाची डायरी**

'कालचक्र सतत पुढे धावत असते. जे त्याच्याबरोबर गेले ते पुढे गेले. जे पाठीमागे राहिले ते मागेच राहिले. काही व्यक्ती आपणच निर्माण केलेल्या विश्वात मग्न असतात कायम. त्यांच्याकरता काही बदल होत नसतो. एक संथपणा, एक लय, एक ताल, जे नेहमीसारखे एक असते. अशा विश्वात राहणाऱ्या व्यक्ती जेव्हा अचानक जाग्या होतात तेव्हा त्यांची अवस्था बिकट होते.'

१९४७मध्ये आपण स्वतंत्र झालो त्यावेळी पाकिस्तानात असलेल्या हिंदू समाजाला, विशेषतः सिंधी समाजाला तेथील सर्वस्व सोडून केवळ जीव बचावून भारतात आश्रय घ्यावा लागलेला आहे. भारतातदेखील त्यांची अवस्था रेफ्युजी अथवा निर्वासित या संभावनेने केली गेलेली आहे. एक उपरे म्हणून या देशात राहताना त्यांना किती आपत्तींना सामोरे जावे लागले, त्यात आर्थिक बाजू तर होतीच, परंतु सामाजिक स्तरावरही त्यांना अनेक दाहक चटके सहन करावे लागलेले आहेत. अशा आगीतून होरपळून निघालेल्या एका कुटुंबाची कहाणी आपल्याला 'कराची ते पंचवटी' या आत्मकथनातून वाचायला मिळते.

स्वातंत्र्याच्या त्या काळात कराची येथे वास्तव्याला असलेल्या सिंधी कुटुंबीयांना अनेक दहशतींना सामोरे जावे लागले. आपले सर्वस्व, अगदी अब्रूसह गमवावे लागले. त्यातून कसेबसे वाचलेले जीव बोटीने भारतात दाखल झाले. त्यातला पहिला प्रवास हा पुण्यापर्यंत झाला आणि तेथून नंतर तो नाशिकला. तात्पुरत्या स्वरूपात उभारल्या गेलेल्या छावणीतले आयुष्य, आणि त्यानंतर काही मदतीने व स्वतःच्या हिमतीने काबाडकष्ट करून उभे राहिलेले आयुष्य प्रिया श्रीकांत यांनी या पुस्तकात आपल्यासमोर ठेवलेले आहे. सिंधी कुटुंबातील पुरुष आणि महिला यांनी सतत चिकाटीने अनेक उद्योग करून आपला चरितार्थ चालवला. त्यातील अम्मा या सुशिक्षित असल्याने त्यांना सिंधी शाळेत शिक्षिका म्हणून काम करण्याची संधी मिळाली. दादा ऊर्फ एस. परशुराम यांनी मोठ्या चिकाटीने स्थलांतर होण्यापूर्वी आवश्यक असणारी सर्व शासकीय कागदपत्रे मिळवली. त्यामुळेच त्यांना पुढील आयुष्यात उभे राहण्याचे बळ मिळाले. एक सुस्थितीत असलेले सुखी कुटुंब कराचीमध्ये आनंदाने नांदत असताना अचानक फाळणीचे क्रूर रूप राक्षसाप्रमाणे समोर आले आणि त्यांनी या कुटुंबाची धूळधाण उडवली. तरीही कच न खाता आपल्या पायांवर हे कुटुंब उभे राहिले. सहा मुली आणि एक मुलगा यांचा सांभाळ करताना परशुराम यांनी फोटोग्राफीचा उद्योग करून आपले अस्तित्व कायम राखण्याचा प्रयत्न केला.

आपल्या समाजात जात हा विषय फार मोठा आहे. त्यातून लग्नकार्याच्या प्रसंगी तर तो प्रामुख्याने पुढे येतो. एस. परशुराम यांनी भारतात आल्यानंतर कधीही आपली जात उघड केली नाही. ते मानवजात हीच सर्वश्रेष्ठ जात आहे असे समजून वागत राहिले. मात्र त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले.

विस्थापित झाल्यानंतर निर्वासित म्हणून जगत असताना येणाऱ्या अनुभवांचा स्वाद सुखदायी असू शकत नाही, हे ओघाने आलेच. उदात्ततेच्या कितीही कल्पना आपल्या कुटुंबावर बिंबवल्या तरीही समाज त्याचे समाजपण सोडत नाही. तो त्याच्याच प्रवाहाप्रमाणे चालत राहतो आणि काठावरील जगणाऱ्यांना त्यात ओढत राहतो, त्याला पर्याय नाही हेही यातून सिद्ध होते. एस. परशुराम आणि त्यांचे कुटुंब हे आजच्या बदलत्या काळात स्वतःच्या पायांवर उभे राहू शकले हे मान्य करत असताना त्यांनी जे भोगले, त्यांच्या वाट्याला आले ते पाहता आजचा समाज आधुनिक झाला आहे असे म्हणता येईल काय, असा प्रश्न उभा राहतो.

प्रिया श्रीकांत अतिशय संयमाने आणि तितक्याच दृढपणे आपल्या कौटुंबिक प्रवासाचा एक आलेख आपल्यासमोर हळुवारपणे सकारत जातात. त्यांचे बालपण, शिक्षण, कौटुंबिक नाते, त्यात असलेला ओलावा, शेजार, काम करणारी महिला, त्याकाळचे नाशिक, त्यात होत गेलेला बदल, या बदलाचा स्वीकार करताना झालेली ओढाताण, या सगळ्यांचे चित्र खूप समरसतेने केलेले आहे. त्यांचे संपूर्ण शिक्षण येथेच झालेले असल्याने सिंधी, मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा त्यांना अवगत झालेल्या आहेत. त्यामुळेच त्यांना हे लेखन करताना कुठलीही अडचण आलेली नाही. त्यांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा डोळस आहे. त्यातून त्याला जोड मिळाली आहे ती भोसला मिलिटरी स्कूलमध्ये त्यांनी घेतलेल्या ट्रेनिंगची. आपल्या कुटुंबातील प्रसंग सांगत असताना, स्वतःच्या आयुष्याविषयी व्यक्त होत असताना, आपल्या भोवती असणाऱ्या इतरांची व्यक्तीचित्रे साकारताना त्या थेट अंत:करणापर्यंत त्यांचा शोध घेतात. निसर्गप्रेम हा तर त्यांचा खूप जिव्हाळ्याचा विषय. त्यात एकरूप होणे यासारखा आनंद नाही हे त्यांची भावना. त्यामुळेच त्या प्रत्येकावर आपलेपणाने प्रेम करतात. अनेक कटू प्रसंगी खंबीरपणे उभे राहतात. यातूनच त्यांचा वैचारिकपणा किती प्रगल्भ आहेत याचाही अनुभव या लेखनातून दिसून येतो.

प्रिया श्रीकांत यांनी या पुस्तकाची मांडणी कालखंड नोंद करून केलेली आहे. आपल्या वडिलांची जात कोणती हा प्रश्न त्यांनी संपूर्ण कथानकात सतत समोर ठेवलेला असून त्याचे उत्तर त्या शेवटी उघड करतात, यातून त्यांची लेखनशैली आणि भाषेवरील प्रेम दिसून येते.

सिंधी समाजाची एकूण मानसिकता आणि त्यांची चिकाटी वृत्ती, कुठल्याही प्रसंगावर मात करत पुढे जात राहण्याची धडपड, या पुस्तकामुळे अधिक प्रकर्षाने दृढ झाली आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

## माझ्या काल-शराचा प्रवास

**डॉ. संगीता गोडबोले**



**अज्ञाताशी-अदृष्टाशी सामना**

'संध्याकाळच्या प्रयोगांसाठी आकाश स्वच्छ असावे लागते. शहरातील दिव्यांचा प्रकाश किंवा धूळ असून चालत नाही. म्हणून सतराव्या शतकात शिवाजीराजांनी बांधलेल्या सिंहगडावर हे काम करण्यास आमच्या प्रोफेसरांनी सांगितले. सिंहगड २२०० फूट उंचीचा होता आणि त्याच्या मध्यावर वीजपुरवठा नसलेले काही बंगले होते. त्यामुळे तिथे खरोखर मिट्ट काळोख असे. त्यातला एक बंगला लोकमान्य टिळकांच्या कुटुंबांचा होता. १९५४ सालच्या एप्रिल आणि मे या दोन महिन्यांकरता तो भाड्याने घेण्यात प्रोफेसरांना यश आले होते.'

थोरामोठ्यांची, विशेषतः वेगवेगळ्या क्षेत्रात अत्युच्च स्थानी असलेल्या व्यक्तींची, चरित्र-आत्मचरित्र वाचणे नेहमीच आनंददायी असते. त्यातून वैज्ञानिकांचे चरित्र-आत्मचरित्र हा आणखी एक वेगळाच भाग आहे. वैज्ञानिक त्यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असताना त्यांचे संशोधन सिद्ध करण्यासाठी किती पातळीवर बौद्धिक कसरत करत राहतात, उपलब्ध असणारी उपकरणे नेहमीच पुरेशी असतात असेही नाही. तसेच ज्या ठिकाणी संशोधन करायचे ती जागा, वातावरण आणि इतर सोयी सुविधा या सुद्धा योग्य असतीलच असे नाही. या सगळ्यांवर मात करून जे आपले संशोधन पूर्ण करतात आणि हे वेगळे मानदंड निर्माण करतात, त्यांचे ते अनुभव वाचत असताना देखील आपण आश्चर्यचकित होतो. डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांचे ARROW OF MY TIME हे चरित्र असेच आहे. ध्यास आणि ध्येय त्याच्या जोडीला प्रचंड इच्छाशक्ती यांच्या जोरावर एक वैज्ञानिक म्हणून मिळवलेले यश अत्युच्च म्हणावे असेच आहे.

डॉक्टर कुलकर्णी यांनी नाईट एअर ग्लोसंबंधी केलेले संशोधन हे खगोलशास्त्रातील महत्त्वाचे संशोधन आहे. त्याविषयी ते लिहितात, 'पृथ्वीच्या वातावरणाच्या वरच्या स्तरातील अनेक मापदंडाचा अंदाज वेगवेगळ्या उंचीवर उगम पावणाऱ्या रात्रीच्या अंधुक प्रकाशाच्या तीव्रतेच्या मोजमापावरून काढता येतो. सर्वसाधारणपणे या उत्सर्जनास नाईट एअर ग्लो म्हटले जाते. पृथ्वीच्या वरच्या वातावरणातील ॲटोमिक ऑक्सिजन, मॉलिक्युलर ऑक्सिजन, हायड्रोजन आणि सोडियम यांसारख्या धातूंमध्ये आपसात होणाऱ्या वेगवेगळ्या रासायनिक प्रक्रियांमुळे नाईट एअर ग्लोची निर्मिती होते. ही उत्सर्जनी अत्यंत अंधूक असून नुसत्या डोळ्यांना दिसत नाहीत म्हणून संवेदनशील उपकरणाद्वारे ते पाहावे लागतात. याकरिता मी फोटोमीटरचे डिझायनिंग केले आणि तो तयार हे केला. तो स्प्रिंगहिल मेटिऑर वेधशाळेत बसवला. या उपकरणाची (फोटोमीटर) माहिती आणि त्याच्या वापराने मिळालेले रिझल्ट समाविष्ट असलेला पेपर पुढे 'नेचर' या विख्यात जर्नल मध्ये संपादित संपादित करण्यात आला. हे उपकरण आपोआप डाटा गोळा करत असे. यामुळे नाईट एअर ग्लोचे संशोधन जनक डॉक्टर कुलकर्णी ठरलेले आहेत.

फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी, पीआरएल ही भारतातील अंतराळ कार्यक्रम सुरू करणाऱ्या संस्थांची जननी. वैश्विक किरणशास्त्रज्ञ डॉक्टर विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथे स्थापन केलेली ही संस्था. डॉक्टर कुलकर्णी यांनी येथे भारतातील अवरक्त किरण खगोलशास्त्राचा (इन्फ्रारेड ॲस्ट्रॉनॉमी) व अंतराळ विज्ञान यामध्ये संशोधनासाठी प्रचंड मोठे योगदान दिलेले आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या फोटोमीटरची रेखाटने करून ते पीआरएलमध्ये तयार करण्यास सुरुवात केली. आणि त्यांच्यामुळेच येथे इन्फ्रारेड ॲस्ट्रॉनॉमीची नवीन शाखा सुरू झाली. माउंट अबू येथे इन्फ्रारेड वेधशाळा आणि आवश्यक असणारी टेलिस्कोप उभारण्यात त्यांचा ध्यास यशस्वी झालेला आहे.

डॉक्टर पी.व्ही. कुलकर्णी यांनी खगोलशास्त्रामध्ये नवनवीन प्रयोग केले त्यांच्या या संशोधनाचे स्वागत आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आले. ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडियाचे प्रेसिडेंट पद त्यांच्याकडे चालून आले ते यामुळेच. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या अनेक संशोधन पेपरचे स्वागत तर झाले आहेत तसेच अनेक सन्मानही त्यांच्याकडे चालत आलेले आहेत.

त्यांचे हे चरित्र इंग्रजीमध्ये त्यांनी लिहून ठेवलेले असले तरी ते प्रकाशित झालेले नव्हते. त्याचा मराठी अनुवाद डॉक्टर संगीता गोडबोले यांनी केल्यामुळे हे चरित्र आपणास वाचण्यासाठी उपलब्ध झाले.

खरे तर एका वैज्ञानिकाचे लेखन हे क्लिष्ट आणि त्यांच्या व्यावसायिकतेशी संबंधित असल्याने काहीसे बोजड वाटण्याची शक्यता होती. परंतु गोडबोले यांनी अतिशय सुलभपणे हा अनुवाद केला असून, ज्या ठिकाणी इंग्रजी शब्दांचा अनुवाद बोजड ठरण्याची शक्यता होती तिथे त्यांनी ते शब्द मूळ इंग्रजीत आहेत ते तसेच ठेवलेले आहेत. तसे खूप मोठे अवघड काम होते, परंतु डॉक्टर गोडबोले यांनी अतिशय आपुलकीने जिव्हाळ्याने ते पार पाडलेले आहे. त्यामुळेच हा अनुवाद न वाटता त्यांचे स्वतःचे मूळ लेखन आहे असाच भास वाचताना होतो. वास्तविक हे लेखन पृष्ठ क्रमांक १५६ वर संपलेले आहे. त्यापुढे डॉक्टर कुलकर्णी यांच्याशी संबंधित असणारे व्यावसायिक आणि अन्य नात्याने जोडलेले नातेवाईक यांच्याकडून आठवणी स्वरूपात ते लेखन (काही इंग्रजी) मिळवले आणि ते सोबत जोडले आहे. जोडीला फोटो मिळवले आहे. त्यामुळे हे आत्मचरित्र पूर्ण स्वरूपात सफल संपूर्ण झालेले आहे. डॉक्टर संगीता गोडबोले या एमबीबीएस, डीसीएच, बालरोगतज्ज्ञ आहेत. विविध नियतकालिकांसाठी त्यांनी लेखन केलेले आहे. लेखिका, कवयित्री, गीतकार म्हणून त्यांचा लौकिक आहे. अनेक मान्यवर गायक व संगीतकार यांच्या स्वर-संगीतसाजांनी त्यांच्या गीतांना सजवलेले आहे. आकाशवाणीवरील कार्यक्रमातही त्यांचा सहभाग असतो.'शिवाय सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग आहे.

वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात आवड असणाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरावे असे हे आत्मचरित्र असून त्याचे आशयघन मुखपृष्ठ सजवले आहे सुप्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांनी.


**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २५० रुपये**




# ग्रंथपान

**मराठी भाषा : लेखन–मार्गदर्शन**

**सलील वाघमारे**




**भाषेचे अंतरंग समजावून सांगणारा ग्रंथ**

'कोणत्याही भाषेत शब्दांचे दोन प्रकार असतात. एक, सिद्ध शब्द आणि दोन, साधित शब्द. भाषेचा व्यवहार जसजसा वाढत जातो, तसतसे त्या भाषेतील मूळ शब्द अपुरे पडू लागतात. यामुळे मूळच्या म्हणजेच सिद्ध शब्दांना उपसर्ग किंवा प्रत्यय लागून, समास होऊन किंवा शब्दांची पुनरावृत्ती होऊन, इतर भाषेतील शब्द जसेच्या तसे किंवा त्यात काही बदल करून नवीन साधित शब्द तयार होतात.'

मराठी भाषेत लेखन करताना अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यातला सगळ्यात महत्त्वाचा विषय असतो तो शुद्धलेखन. शुद्धलेखन करताना भाषेतील शब्दांचा चपखल वापर होणे आवश्यक असते. त्यासाठी शब्दांचे त्यांच्या उगमापासून त्यांच्या प्रत्यक्ष संदर्भित उपयोगात येईपर्यंतच्या सर्व टप्प्यांवरील ज्ञान अचूक असणे आवश्यक असते. जोडीला व्याकरणाच्या अभ्यासाची आवश्यकता असते. तसेच त्यातील शुद्धलेखनासाठीच्या सर्व चिन्हांचा उपयोग कसा करायचा, हे माहीत असणे तितकेच महत्त्वाचे ठरते. या प्राथमिक गरजा ओळखता आल्या तर मराठी भाषेतील लेखन व्याकरणदृष्ट्या शुद्ध होऊ शकते. हे लेखन निर्दोष व्हावे यासाठी व्याकरणकार मो रा वाळिंबे, अरुण फडके ते यास्मिन शेख यांच्यापर्यंतच्या अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी मार्गदर्शन करणारे ग्रंथ सिद्ध केलेले आहेत. तरीही त्यात सातत्याने भर पडत आहे ही स्वागतार्ह बाब म्हणायला हवी. असेच स्वागत आपण करणार आहोत ते 'मराठी भाषा : लेखन मार्गदर्शन' या ग्रंथाचे. ग्रंथकर्ते आहेत सलील वाघमारे.

सलील वाघमारे यांनी हा ग्रंथ सिद्ध करताना अनेक बाबींचा सर्वांगीण आणि चिकित्सक असा अभ्यास केलेला आहे. शुद्धलेखन म्हणजे केवळ ऱ्हस्व–दीर्घ यांच्याकडेच कटाक्षाने पाहणे, इतके मर्यादित हे क्षेत्र नाही. भाषेत येणारे अनेक टप्पे आहेत, ज्यांच्याकडे डोळसपणे व चिकित्सकपणे पाहण्याची गरज असते. ती कोणती, यांची ओळख हा ग्रंथ करून देतो. व्याकरणदृष्ट्या वाक्यरचना शुद्ध कशी असावी, यासाठी पृष्ठक्रमांक १७६पासून सुरु होणारे 'सुयोग्य वाक्यरचना' हे प्रकरण अवश्य वाचावे. लेखनाविषयी असणारा काटेकोरपणा कसा असायला हवा, याबाबत आपण तितकेसे जागरूक नसतो, ती जागरूकता हे प्रकरण वाचल्यानंतर नक्कीच स्पष्ट होते. पृष्ठ क्रमांक १५६पासून सुरू होणारे 'विरामचिन्हे' हे प्रकरण म्हणजे आपणच आपल्या प्रतिबिंबाला निरखून पाहण्यासारखे आहे. भाषेतील आणि लेखनातील अर्थ योग्यरीत्या समजण्यासाठी या विरामचिन्हांना पर्याय नाही. वाक्याच्या शेवटी येणारी विरामचिन्हे, वाक्यांच्या मध्ये येणारी विरामचिन्हे, यांची एकूण संख्या सोळा इतकी येते. त्यांच्या नेमक्या जागा त्यांना बहाल करणे हाच सुयोग्य लेखनाचा खरा पाया आहे. अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी यांचा उपयोग आवश्यक कसा आहे, त्याची अनेक उदाहरणे इथे दिलेली आहेत. सहज आकलन होण्यासाठी लेखकाने किती प्रयत्न केलेले आहे, याचा प्रत्यय यातून येतो.

शब्दांना नीट समजून घेण्यासाठी संधी, समास, साधित शब्द, विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यये या नियमांना अगोदर समजून घ्यायला हवे. तसे झाले तर लेखनातील अनेक चुका टाळता येऊ शकतात. लेखकाने त्यांचे मार्गदर्शन अतिशय सोप्या पद्धतीने केलेले आहे. आपल्या सोयीसाठी इथे सामान्य रूप व संख्या विशेषण स्वरूपात १०५ अंकांचे अक्षरी स्वरूपात विश्लेषण केलेले आहे. त्याचप्रमाणे राहणे, पाहणे, वाहणे, यांचा वापर नेमका कसा करावा, हे कुणी आपल्याला सांगू नये, इतका आपला विश्वास स्वतःवर असतो. तरीही याबाबत सुसूत्रता आढळत नाही. याचे कारण आपण या शब्दांकडे जाणीवपूर्वक पाहत नाही, हे होय. लेखक त्यांच्या मूळ धातूंना प्रत्यय लावून क्रियापदांची विविध रूपे कशी तयार होतात, त्यांची उदाहरणे देऊन आपल्याला समजावून सांगतात. शब्दांमध्ये येणारा 'त्व' आणि 'त्त्व', यांचे नेमके स्थान कसे असायला हवे, 'तज्ञ' आणि 'तज्ज्ञ' यात व्यंजनसंधीचा नियम कसा आहे, ह्या साध्या वाटणाऱ्या गोष्टी इथे लेखकाने स्पष्ट केलेल्या आहेत.

आतापर्यंत कुठल्याही भाषालेखन मार्गदर्शनात न आलेला विषय म्हणजे 'शब्दांमधील योग्य अंतर' हा होय. (पृष्ठक्रमांक १९९). लेखनात एकसूत्रता असायला हवी, त्यासाठी एक प्रकारची शिस्त असावी लागते. अक्षरांमध्ये समान अंतर असणे ही बाब सुंदर हस्ताक्षरासाठी महत्त्वाची ठरते. अक्षराला वेलांटी, उकार, काना, मात्रा, विसर्ग, तसेच शब्दानंतर विरामचिन्हे लिहिताना काही अक्षरांना विशिष्ट जागा न सोडल्यामुळे लेखनसौंदर्य व शिस्तीला धरून दिसत नाही. यासाठी कुठे, किती अंतर सोडावे व कुठे सोडू नये याबाबतची माहिती ग्रंथामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. अशा स्वरूपाचे मार्गदर्शन कुणी केल्याचे वाचनात आलेले नाही, ते प्रथमच येथे वाचायला मिळाले, याचा आनंद वेगळाच. हे सर्वच मार्गदर्शन लेखन करणाऱ्या व टंकलेखन करणाऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे.

सदरचा ग्रंथ सिद्ध करताना लेखकाने या क्षेत्रातील पूर्वाश्रमीच्या तज्ज्ञ मंडळींच्या मार्गदर्शनाचा हात हाती घेतलेला आहेच. यात शासनाने तयार केलेल्या नियमावलीचाही संदर्भ आहे. परंतु लेखकाने स्वतःच्या अनुभवाने आणि प्रात्यक्षिकाने यात चिंतनशील अशी भर घातलेली आहे आणि ही निःसंशयपणे त्यांची स्वतःची आहे. खूप परिश्रमपूर्वक प्रत्येक घटकाकडे लक्ष देऊन त्याला न्याय देण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. यात सुलभता आणि सहजता कायम राहील आणि ज्यांच्यासाठी आपण हे लेखन करत आहोत त्यांना त्याचा उपयोग उत्तम प्रकारे व्हावा, हे भान त्यांनी जपलेले आहे. त्यामुळेच याचे संदर्भमूल्य वाढलेले असून तो कायमस्वरूपी प्रत्येकाकडे संग्रही असायला हवा, असे आवर्जून सांगावेसे वाटते.

या ग्रंथासाठी सुप्रसिद्ध भाषा व व्याकरणतज्ज्ञ यास्मिन शेख यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभलेली आहे. प्रा. रमेश पानसे यांनी पुस्तकाबद्दल कौतुकोद्गार काढलेले आहेत.


सलील वाघमारे यांनी मनोगतातून त्यांची भूमिका मांडली आहे.


या पुस्तकाचे मुखपृष्ठ शिरीष घाटे यांनी सजवलेले आहे.

**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २१० रुपये**

# ग्रंथपान

**पेरिप्लस ऑफ हिंदुस्थान**
**खंड १ व खंड २**
**सुनंदा भोसेकर**




**अखंड हिंदुस्थानाची प्रदक्षिणा**

'सर थॉमस रो, हा इंग्लंडचा राजा जेम्स पहिला, याचा प्रतिनिधी, मुघल बादशहा जहांगीर यांच्या दरबारात इ. स. १६१६ च्या जानेवारी महिन्यात आला. भारताच्या आणि इंग्लंडच्याही इतिहासात ही घटना अत्यंत महत्त्वाची होती. म्हणजे थॉमस रो जहांगीराच्या दरबारात आला आणि लगेच इतिहासाचा प्रवाह बदलला असे नाही; पण एका शेवटाची सुरुवात झाली असे म्हणायला हरकत नाही.'

हिंदुस्थानाचा गतकालीन आढावा किंवा शोध घ्यायचा झाला तर अनेकदा आपल्याला परदेशातून आलेले प्रवासी आणि त्यांनी लिहून ठेवलेली प्रवासवर्णने ही महत्त्वाची साधने उपलब्ध होती. आपल्या ज्ञात अभ्यासक्रमाचा एकूण आढावा घेताना ठरावीक असे हु एन त्संग, बर्नियर, वास्को द गामा यांसारख्या काही प्रवाशांची नावे माहीत होती. प्रत्यक्षात हिंदुस्थानात आलेल्या परदेशी प्रवाशांची संख्या यापेक्षा खूप अधिक आहे आणि त्यांनी त्या काळाचे केलेले वर्णनदेखील खूप विस्तृत असे आहे याची आपल्याला कल्पना नव्हती. ठरावीक असे काही जाणकार जे इतिहासाचे आणि प्रवासवर्णनाचे व्यासंग असलेले होते, त्यांना कदाचित ही नावे माहीत असू शकतील. यांतील एक आहेत सुनंदा भोसेकर. त्यांनी मात्र ठरवून प्रवासवर्णने हा एक आपल्या व्यासंगाचा भाग निश्चित केला आणि त्यातून त्यांना जे सापडले ते निश्चितच अचंबित करणारे होते. आपल्या व्यासंगातून ज्याचा शोध लागला आणि ज्याचा संबंध हिंदुस्थानच्या अंतरंगाला समजून घेण्यासाठी आहे तो ऐवज आपल्या वाचकांसाठी खुला केला तर निश्चितच उपयुक्त ठरू शकेल, या उद्देशाने त्यांनी वेधक असे जे लेखन केलेले आहे, त्याचे नाव 'पेरिप्लस ऑफ हिंदुस्तान' होय.

'पेरिप्लस ऑफ हिंदुस्थान' या ग्रंथाचे लेखन दोन खंडात झालेले आहे. पहिला खंड हा इसवी सनपूर्व ३०२ ते इसवी सन १५२४ या कालखंडाचा आहे. या कालखंडात सर्वप्रथम आलेला प्रवासी म्हणजे मॅगेस्थेनिस. त्याचा कालखंड आहे इसवी सनपूर्व ३०२ ते इसवी सनपूर्व २८८. हा चंद्रगुप्त मौर्यांच्या दरबारात ग्रीक राजदूत होता. त्याने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव आहे 'इंडिका'. त्यानंतर 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' हे प्रवासवर्णन लिहिणारा इजिप्शियन ग्रीक आणि रोमन साम्राज्याचा नागरिक असलेला एक अज्ञात खलाशी. पुढे होते फाहिआन, युआॅन च्वांग, यी जिंग अँड कंपनी, अल्बेरूनी, मार्कोपोलो, जोर्डिनो काटालानी, इब्न बतूता, निकोलो द कोन्टी, अब्दुल रझाक, अफनासी निकितीन, आणि शेवटचा वास्को द गामा.

या कालखंडात हिंदुस्थानची त्यावेळची सामाजिक परिस्थिती, रीतिरिवाज, कौटुंबिक जीवन, चालीरीती, जातिव्यवस्था, धार्मिक, व्यापार, चंद्रगुप्त, सातवाहन, चोला, यांचा कालखंड, सम्राट अशोकाने बांधलेले स्तूप, बौद्ध तीर्थस्थळे, नालंदा विहार, असा मोठा तपशील या प्रवाशांच्या वर्णनांमध्ये नमूद केलेला आहे.

सुरुवातीच्या काळात गझनीचा महमूद याने केलेल्या आक्रमणाच्या आणि केलेल्या लुटींचा संदर्भ आपणास ठाऊक परंतु त्याच्या या स्वाऱ्यांच्या काळातच आलेला प्रवासी म्हणजे अल्बेरूनी. याने केलेली भ्रमंती आणि सखोल अभ्यास यातून जो ग्रंथ साकारला गेलेला आहे त्याचे नाव आहे, 'तहकीक- ए-हिंद'. सर्व विषयांचा समावेश असलेला हा ग्रंथ आहे. त्याकाळी भारतात प्रचलित असलेल्या ब्राह्मणवादाचा गाभा जाणून घेणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. ज्यांना कोणाला हिंदूंशी धार्मिक विषयांवर चर्चा करायची असेल किंवा त्यांच्याशी इतर काही व्यवहार करायचा असेल त्यांना हे पुस्तक संकलित माहिती म्हणून उपयोगी पडेल, ही त्याची स्पष्ट भूमिका होती, असे लेखिका त्याच्यावरील लेखात निरीक्षण नमूद करतात. हा कालखंड मुघलपूर्व आहे.

दुसरा खंड आहे इसवी सन १५०० ते १६८१. हा कालखंड मुघल साम्राज्य, आदिलशाही, निजामशाही, विजयनगरचे साम्राज्य, छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या कारकिर्दीने व्यापलेला आहे. राजांच्या आणि सत्तेच्या काळात ज्या अनेक घडामोडी घडलेल्या आहेत, त्या पाहता त्याकाळच्या 'इतिहास संदर्भ साधने' म्हणून या प्रवासवर्णनांचा निश्चितच उपयोग झालेला आहे. या सगळ्यांची माहिती तपशिलाने या खंडात येते. त्यावरून त्या काळातील अनेक घटना आपल्या नजरेसमोर उभे राहतात. या कालखंडात आलेले प्रवासी द्युआर्त बर्बोझा, लुडविगो डी वर्थमा, गार्सिया द ओर्ता, डोमिंगो पेस, फर्नाओ नुनीस, फरिश्ता, राल्फ फिच, सर थॉमस रो, फ्रान्सिस्को पेल्सार्त, ज्याँ बतीस्त ताव्हेर्न्ये, फ्रान्स्वाँ बर्नियें, निकोलो मनुची आणि जॉन फ्रायर हे होत.

आलेले प्रवासी त्यांच्याविषयीची थोडक्यात माहिती, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, केलेल्या प्रवासाचा मार्ग, प्रवास करताना त्यांना सहन कराव्या लागलेल्या यातना, त्यांचा एकूण कालावधी, प्रदेश, हवामान, त्यांनी बजावलेली काम गिरी, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये, या सगळ्यांची माहिती यात अधिकाधिक देण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. प्रवाशाचे रेखाचित्र, प्रवासाचा मार्ग दाखवणारे नकाशाचित्र, आणि इतर आवश्यक असणारी रेखाचित्रे सोबत दिलेली आहेत. हे दोन खंड म्हणजे त्या काळाच्या हिंदुस्थानाचे संपूर्ण अंतरंग अगदी मोजक्या शब्दांत आपल्यासमोर उलगडून दाखवलेले आहे.

सुनंदा भोसेकर यांनी रिझर्व बँक ऑफ इंडिया येथे अधिकारी म्हणून सेवा बजावलेली आहे. त्या उत्तम कवयित्री आहेत. प्रस्तुत दोन्ही खंडांच्या प्रकाशनापूर्वी यातील लेख हे 'प्रहार' या दैनिकाच्या रविवार पुरवणीतून संक्षिप्तपणे प्रकाशित झालेले आहेत. प्रत्येकाच्या संग्रही असावा असा हा संदर्भ ग्रंथ ग्रंथालीने आकर्षकपणे प्रकाशित केला आहे.'तील रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांची आहेत. नकाशांची रेखाटने उन्मेश काळे यांची आहेत. पृष्ठरचना प्रदीप म्हापसेकर यांची असून संपादन साहाय्य आल्हाद गोडबोले यांचे आहे.

**दोन्ही खंडाची मूल्ये १५०० रुपये । सवलतीत ८०० रुपये**

## जन्मशताब्दी स्मृतिजागर...



RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.